# श्री

संपादन/संकलन : डॉ. विलास ज. पवार

'' माता पित्यांना'' प्रदक्षिणा घालून पृथ्वी
प्रदक्षिणा सार्थ होते हे सांगणाऱ्या श्रीगणेशाच्या
चरणी नतमस्तक होऊन गणेशभक्तीचा छंद
मनाला लावणारे माझे वडील कै. जयराम लक्ष्मण पवार
आणि आई श्रीमती. जयंवती जयराम पवार
यांना 'श्री' हे पुस्तक सविनय सादर....

ओम पब्लिकेशन

**: प्रकाशक :**

ओम पब्लिकेशन
एम / ३, पॅराडाईज टॉवर,
गोखले रोड, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दूरध्वनी : २५३६ ४१४१

**: नवीन आवृत्ती :**

२०१२

**: संकलन :**

ओमनी पी. आर. सर्व्हिसेस

**: मूल्य :**

५१ रुपये

**: मार्केटिंग / वितरण :**

Avidmedia™
Management & Marketing Pvt. Ltd.

# प्रस्तावना...

**दे**वपूजेतील उत्कटतेचा कळस! आरतीने गाठला जातो. आर्त आळवणी, भगवंतावरील अनन्यभाव, समर्पण, शरणागती, देवाचे गुणगान, कृपेची विनम्र याचना हे सर्व आरतीत एकवटलेले असते. घंटा टाळ आणि टाळ्या यांच्या लयीत म्हटलेल्या आरतीने वातावरण भावभक्तीने भारले जाते. निरांजनातील ज्योतीच्या प्रकाशात चरणकमळापासून मुखकमलापर्यंत देवाच्या अंगप्रत्यंगांचे मनोभावे दर्शन केले जाते. जणूकाही प्राणज्योतीने अर्थातच आत्मज्योतीने परत्माज्योतीला ओवाळले जाते. बाप्पा मोरया त्याचबरोबर अन्य देवतांच्या आरत्या याने मनाला जे सुख समाधान, शांतीचा प्रत्यय येतो तो अन्य कशामुळेही येत नाही.



आरती हे आपल्या श्रध्दायुक्त भावनांची गेय स्वरूपातली निर्मिती आहे. 'जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव' याची प्रचिती आरती अंतःकरणापासून गाणाऱ्यांना निश्चितपणे येते. काळाच्या ओघात आरतीबद्दल सुध्दा रिमीक्स होतात की काय याची भीती वाटू लागलेली आहे. तसा प्रयत्न अनेकांनी यापूर्वी केलेला आहे. पावित्र्य, संस्कार आणि शिस्तबध्दता किमान आरती गायनातून तरी नष्ट व्हायला नको. शुद्ध अंतःकरणाचा भाव, विनम्रमस्तक, भक्तिभावाने जोडलेले हात किंवा तालबध्द टाळ्या आरतीतल्या शब्दांचे योग्य उच्चार यामुळे म्हटली जाणारी आरती परमात्माला प्रसन्न करेलच पण त्याचबरोबर आत्मारामालासुध्दा सुखाची अनुभूती मिळेल.

मराठी भाषेच्या आरंभकाळापासून आरतीची रचना झालेली आढळते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संत श्रेष्ठींनी आरतीची रचना केलेली आहे. १२ व्या शतकातील महानुभाव कवींनी आरत्या रचल्या आहेत. आरती या शब्दाची व्युत्पत्ती शास्त्रदृष्टया विवेचन करताना हा शब्द 'आर्तिक्य', 'आयत्रिकम्' व 'आरती:' अशा संस्कृत शब्दापासून सिध्द झालेला असावा. ख्रिस्तपुराण या पुस्तकात फादर स्टिफन्स या मिशनरी कवीने हा शब्द वापरला आहे.


**इंग्रजे सारिखे मंटप - घर। बोंदू सिकविले परिकर।।**
**आणि धुपांचे आल्तार। सवर्नखचित।।११।।**
**पाट आरती दिव्य निर्मळ। बरवे सवर्नांचे झळाळ।।**
**ठेऊ सांगितले सकळ। करोनियां ।।१२।।**

आरतीच्या व पदांच्या ध्रुवपदात जयजयकार झालेला असतो. शिवाय 'ओवाळू' ओवाळीन अशा अर्थाचे शब्द ही असतात. स्थूलमानाने काकडारती (प्रात:काळी), पंचामृतपूजा (सकाळी), मध्यान्हपूजा (दुपारी), अपराहनपूजा (संध्याकाळी। आणि शेजारती (रात्री) ह्या सर्व विविध अवस्था सगुणोपासनेत विभागल्या गेल्या आहेत. या आरतीत दीपारती, धूपारतीम कर्पूरारती, पंचारती, निरांजन आरती या वस्तूंचा उल्लेख करून आरती ओळखली जाते.

इंग्रजी माध्यमाच्या प्राबल्यामुळे इंग्रजी येणाऱ्या पिढीसाठी या आरत्या जड वाटू लागल्या आणि त्या आरत्यांचा स्वर घरांघरातून कमी होऊ लागला. या आरत्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना म्हणता याव्यात यासाठी अल्पस्वल्प प्रयत्न या संग्रहित पुस्तकात केला आहे. 'श्री' हा गणेशपूजनासहित असलेला आरतीसंग्रह सर्व भक्तांचा पसंतीस उतरो हीच श्रीगणेशचरणी प्रार्थना. अगदी थोड्याच दिवसांत संपादन आणि संकलनाची जबाबदारी पार पाडली गेली आहे. जर काही त्रुटी, चुका असतील तर या अजान भक्ताला क्षमा असू द्यावी.

# गणाधीश जो

**''आधी वंदू तुज मोरया''** असे म्हणून कोणत्याही कार्याचा शुभारंभ आपण गणेशपूजनाने करतो. दु:खाचं हरण करून सुखकारकता निर्माण करणाऱ्या गणरायाला भक्तगण सुखकर्ता दु:खहर्ता असे म्हणतात. विलोभनीय रूपाने साक्षात्कार देणाऱ्या आपल्या दर्शनाने भक्तांना प्रसन्नतेचा अनुभव देणाऱ्या गणरायाची रूपे भारतात नव्हे तर इतर देशांमध्येसुध्दा निरनिराळया रूपात, आकारात आढळतात. भक्तांच्या इच्छेनुसार साकार झालेल्या गणेशाची विविध रूपे असली तरी गणेशांचे मूळ स्वरूप ॐकारच आहे. सर्वसामान्य ज्ञानोपासक, विद्योउपासक यांचे आवडते दैवत असलेले गणांचा पती, देवाधिकांचा स्वामी असलेल्या गणपतीतील ''ग'' या अक्षराचा अर्थ आहे. - बुध्दिला जे जाणवते ते सगळे आणि ''न'' या शब्दाचा अर्थ आहे. -आपल्या बुध्दीच्या आवाक्याच्या पलीकडे आहे ते सर्व काही म्हणजेच याचा अर्थ जे जाणता येत नाही आणि जे काही जाण्यासारखे आहे त्या सर्वांचा अधिपती म्हणजे गणपती. आपण ''गं गणपतये नम:'' असे म्हणून आपण गणेशास शरण जातो तेव्हा आमचे संरक्षण कर, आमची प्रगती होवो आणि त्यायोगे आमचे शाश्वत कल्याण होवो असा अर्थ अभिप्रेत असतो. ''ग'' या मूळाक्षराचा अर्थ गती, प्रगती असा आहे, ''अ'' या अक्षराचा एक अर्थ रक्षण असा आहे. तर ''म''ह्य महेश म्हणजेच शिवस्वरूप असून कल्याण तसेच सुख असा याचा अर्थ आहे. देवनागरी लिपी गणेशानेच निर्माण केली आणि विद्यार्जनास सुरुवात करताना ''श्री'' या अक्षरानेच करतो आणि ''श्री'' म्हणजेच गणराय. अथर्वशीर्षात



गाची प्रतिज्ञा आहे आणि त्या प्रतिज्ञेतून ज्ञान, कर्म आणि भ तिन्ही प्रवाह शेवटी गणेशभक्तीत विलीन होतात. माता, पिता, बंधू, सखा, सोयरा ही सर्व नाती मांगल्याच्या प्रतिक असलेल्या गणेशात आपल्याला दिसतात. म्हणून त्या मंगलपूर्तीची आराधना समाजातल्या सर्व थरात जवळजवळ, सर्वच घरात केली जाते. शब्द ब्रह्म ॐकाराचे प्रतीक असलेल्या गणेशाचे आपल्या भक्तावर प्रेम असल्याचे दाखले अनेक गणेशभक्तांना मिळाले आहे. गणरायाचे मनोभावे पूजन हे सर्व स्वप्नांना साकार करणारे आहे आणि संकटाना दूर घालविणारे ठरेल हे निश्चितच आणि म्हणूनच ''श्री'' या पुस्तकात गणेशपूजन आरत्या आणि काही अल्पस्वल्प माहिती संग्रहित केली आहे. फक्त गणेशोत्सवाच्या काळातच नाही तर आपल्या दैनंदिन जीवनातसुध्दा हे पुस्तक जवळ बाळगून गणेशभक्तीचा प्रसार व्हावा हीच त्या ''श्री'' गणपतीच्या चरणी प्रार्थना.

**चला सर्वजण मिळून बोलूया, 'गणपती बाप्पा मोरया.'**





# भावरंग


श्री गणेशपूजा ........................... १

श्री गणपती उपासनेची
साधने आणि महत्त्व ...................... ४०

आरत्या (मराठी) ........................ ४७

निवडक आरत्या (इंग्रजीलिपी) ............ ८२

श्री गणेश मंत्र आणि श्लोक ................ ९१

गणेश अथर्वशीर्ष ......................... ९९

श्रीगणपतीची लोकप्रिय गाणी .............. १०२

गणपती विषयक माहिती ................... १०६

इतर माहिती ............................ १२९



# पुजेचे प्रकार

**पुजेचे प्रमुख दोन प्रकार आहेत. १) षोडशोपचार**
**२) पंचोपचार**

पूजेचे षोडशोपचार या प्रकारात पहिले ध्यान झाल्यानंतर १) आवाहन (बोलाविणे) २) आसन ३) पाद्य (पाय धुण्याकरिता पाणी देणे) ४) अर्ध्य

(पाण्यात गंध, अक्षता व फुले वाहून देवाला वहाणे) ५) आचमन ६) स्नान (यात पंचामृत स्नान आणि महाभिषेक स्नान यांचा समावेश होतो.) ७) वस्त्र ८) उपवस्त्र ९) विलेपन - चंदन, हळद, कुंकू, बुक्का, शेंदूर इ. वाहणे १०) पुष्प (फुले व पत्री वहाणे) ११) धूप १२) दीप १३) नैवेद्य १४) प्रदक्षिणा १५) नमस्कार १६) मंत्रपुष्प (आरती, प्रार्थना इ. म्हणणे) या सर्व गोष्टींचा समावेश होतो.

**पंचोपचार -** पंचोपचार वरीलपैकी फक्त १) गंध २) पुष्प ३) धूप ४) दीप ५) नैवेद्य यांचा समावेश होतो. हे पूजेचे अतिशय संक्षिप्त रूप आहे.

★—— ★

## पुजेचे सामान्य नियम

१) पूजा ही जेवणापूर्वी साधारणपणे माध्यान्हाच्या सुमाराला स्नान करून - पवित्र होऊन, धूतवस्त्र नेसून प्रसन्नचित्ताने करावी.

२) पूजा करताना देवाशिवाय इतर कोणतेही विचार मनात आणू नयेत. आरडाओरडा, निरर्थक बडबड, मुलाबाळांवर रागावणे इ. गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात.

३) देव्हाऱ्याच्या आजूबाजूची जागा आधीच झाडूनपुसून स्वच्छ केलेली असावी. तसेच देव ठेवलेली जागा आपल्या आसनापेक्षा उंच असावी. देवाचे आसन आपल्या आसनापेक्षा उच्च प्रतीचे असावे.

४) देवाला अर्पण करावयाचा कोणताही नैवेद्य स्वच्छ व पाहताक्षणी मनाला आनंद देणारा असावा.

५) बाह्य उपचारापेक्षा अंतःकरणातील भावाकडे देवाचे लक्ष अधिक असते. त्यामुळे बाह्य उपचार कमी झाले तर चालतील पण पूजा करतेवेळी अंतःकरण निर्मळ असले पाहिजे.

३) पूजा करतेवेळी त्या ठिकाणी शांतता, स्वच्छता आणि नीटनेटकेपणा असल्यास साधकाच्या तसेच इतरांच्या मनावर चांगला परिणाम होतो.

★—— ★

## पुजेला आवश्यक साहित्य

बसण्यासाठी लाकडाचा पाट, पाण्यासाठी एक तांब्या किंवा लोटी, पंचपात्र किंवा फुलपात्र, तांब्याची किंवा पितळेची पळी, ताम्हण, समई, निरंजन, धुपारतीचे भांडे, उदबत्तीचे घर, पंचामृत व नैवेद्यासाठीच्या वाट्या, गंध, फुले इ. ठेवण्याकरिता ताट इतके किमान साहित्य पूजेला सूरूवात करण्यापूर्वी तयार ठेवलेले असावे.

★—— ★

## नवीन मूर्तीचे प्रयोजन

बहुतेकांच्या घरात देव्हाऱ्यात गणपतीची मूर्ती असते. तरीसुध्दा भाद्रपद शुध्द चतुर्थीला आपण गणपतीची मातीची मूर्ती आणून तिची प्राणप्रतिष्ठा करतो. प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर लगेच त्याचे विसर्जन करावे असा शास्त्रविधि आहे. तरिसुध्दा भक्तगण दिड, पाच, सात, दहा, इ. दिवस गणपती उत्सव साजरा करतात.

गणेश लहरी गणेश चतुर्थीच्या दिवशी जास्त प्रमाणात पृथ्वीवर येतात. त्याचे आवाहन रोजच्या पुजेतील मूर्तीत केल्यास त्यांच्यात प्रचंड शक्ति निर्माण होईल. अशा मूर्तीच्या पुजेचे साग्रसंगीत उपचार, त्यासाठी आवश्यक असणारी बंधने आपण वर्षभर पाळू शकत नाही. त्यासाठी दरवर्षी मूर्ती आणून तिची पूजा करून, विसर्जन केले जाते.

या गणेश लहरींचे तेज सर्वसामान्य व्यक्ति ग्रहण करू शकत नाही.

★—— ★

# गणपती पूजा

**ग**णेशचतुर्थीच्या दिवशी सामुदायिक उत्सवातील वैयक्तिकरित्या गणपतींच्या मातीच्या मूर्ती आणण्याची एकच धांदल उडते. कोणी तर आदल्या दिवशी सायंकाळपासूनच गजाननाची मूर्ती आपल्या घरी आणतात. मग चतुर्थीच्या दिवशी पुरोहिताची त्या सर्व मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात व पूजा सांगण्यात एकच तारांबळ उडते. कित्येकांची पूजा व्हायला सायंकाळचे चारही वाजतात. पार्थिव गणपतीचीही पूजा करावी लागली तर मराठीतून ती उपलब्ध असावी; या हेतूने त्या पूजेचा रसग्रहणासह मराठी परिचय येथे देत आहोत.

गणपतीची पूजा, सर्वसाधारणपणे माध्यान्ह समयी तृतीयायुक्त चतुर्थीला करावी असे पूजाशास्त्र सांगते. गणेशचतुर्थीला सकाळी पूजकाने अंगाला तीळ लावून पाण्याने स्नान करावे अशीही रूढी आहे.

गणपतीची पूजा करायची म्हणजे पूजासाहित्य तयार ठेवले पाहिजे. शास्त्रात पुष्कळ साहित्य सांगितले असले तरी जे साहित्य उपलब्ध असेल त्यावरच भाविकपणे भागवावे लागते. इतर सर्व गोष्टी पूजा करणाराने मनाने कल्पून वाहाव्यात. हळदीवुंग्कू, गुलाल, रांगोळी, फुले, दुर्वा, तुळशी, बेल, गूळखोबरे, पंचामृत (दूध, दही, तूप, मध आणि साखर), शेंदूर, गंध, जानवी, विड्याची पाने १५ ते २०, उदबत्ती, कापूर, नारळ, खारीक, बदाम, इतर फळे व दक्षिणेकरता सुटे पैसे, याखेरीज खालील फुले मिळाली तर उत्तमच १) लाल कमळ २) मंदार ३) चाफा ४) केवडा ५) गोकर्ण ६) जाई ७) जास्वंद ८) शेवंती ९) गुलाब आणि १०) पारिजातक किंवा प्राजक्त. यापैकी वरील फुले वाहताना स्वतंत्र मंत्र म्हटला जातो. जी फुले नसतील ती मनाने वाहावीत.

फुलांप्रमाणेच विविध प्रकारची पाने म्हणजे पत्रीही गणपतीच्या पूजेत लागते. गणपतीच्या पूजेत एकवीस संख्येला महत्त्व आहे पत्रीसुध्दा एकवीस प्रकारची आणायची. त्याची यादी अशी -१) मोगरा २) माका ३) बेलाची पाने ४) पांढऱ्या दुर्वा ५) बोरीची पाने ६) धोत्रा ७) तुळस ८) शमी ९) आघाडा १०) बोरली ११) कण्हेर १२) रूई १३) अर्जुनसादडा १४) विष्णुक्रांता १५) डाळिंब १६) देवदार १७) पांढरा मरवा १८) पिंपळ १९) जाई २०) केवडा आणि २१) अगस्ती यांची पाने.

गणपती पूजेचे शक्य असेल तेवढे साहित्य जमवल्यानंतर पूजेची सुरुवात करूया. प्रथम आपल्या घरात जे देव असतात. त्यांच्यापुढे इष्ट देवतांचे स्मरण करून, त्यांच्या मूर्ती देव्हाऱ्यात किंवा देवात असल्यास त्यांना हळदीकुंकू वाहून विड्याची दोन पाने, त्यावर एकदोन पैसे व एक सुपारी ठेवून या देवांना भक्तीभावाने नमस्कार करा. घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींनाही नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घ्या. आणि नंतर आसनावर बसा. शक्यतो पूर्वेकडे तोंड करून बसा आणि दोनदा आचमन करा. कोणत्याही देवतेच्या पूजेचे आरंभ करण्यापूर्वी आचमन, प्राणायाम व संकल्प या गोष्टी प्रास्ताविक म्हणून करावयाच्या असतात.

**आचमन** - आचमन म्हणजे पोटात पाणी घेणे. उजव्या हाताच्या अंगठ्याजवळील बोटे मिटून अंगठ्याच्या मुळावर टेकले म्हणजे तळहाताची जी आकृती होतो तिला गोकर्णाकृती म्हणतात. तळहाताच्या अशा गोकर्णाकृतीत डाव्या हातातल्या पळीने पळीभर पाणी घेऊन ते पोटात घेतले म्हणजे आचमन होते.

**प्राणायाम** - प्राण म्हणजे श्वासवायू आणि आयाम म्हणजे निरोध प्राणायाम म्हणजे प्राणवायुचा निरोध - प्राणवायु कोंडणे. प्राणायाम पूरक, कुंभक आणि रेचक या तीन कृतींनी पूर्ण होतो. पूरक म्हणजे श्वास आत

घेणे. वुंभक म्हणजे आत घेतलेला श्वास स्थिर करणे आणि रेचक म्हणजे स्थिर केलेला श्वास बाहेर सोडणे.

प्रथम उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी दाबून डाव्या नाकपुडीने श्वास आत घ्यावा. मग सर्व बोटांनी नाकपुड्या दाबून श्वास स्थिर करावा व उजव्या नाकपुडीवरील अंगठा काढून श्वास बाहेर सोडावा म्हणजे एक प्राणायाम पुरा होतो.

**संकल्प** - संकल्प म्हणजे कोणत्याही कृत्याचा हेतू सांगणे.

आता पूजेची सुरुवात होत आहे. पळीतून उजव्या तळहातावर पाणी घेऊन ते प्यायचे. असे दोनदा करायचे. या दोन्ही वेळी, विष्णुच्या संध्यावदनात आपण म्हणतो त्या चोवीस नावांतील पहिल्या तीन नावांचा उच्चार करायचा. खरे म्हणजे यजमानानेच ही नावे म्हणायची पण सोयीकरता गुरूजीच ती म्हणतात. यजमानाने फक्त आचमन करायचे.

ठीक आहे - गुरूजी नसेल तर तुम्हीच म्हणा.

कोणत्याही पुजेच्या आरंभी श्रीविष्णूची चोवीस नावे उच्चारून त्याला प्रणाम - नमस्कार कराचयावा असतो. ती नावे येणेप्रमाणे :-

| | |
|---|---|
| ॐ केशवाय नमः | ॐ केशवाला नमस्कार असो. |
| ॐ नारायणाय नमः | ॐ नारायणाला नमस्कार असो. |
| ॐ माधवाय नमः | ॐ माधवाला नमस्कार असो. |

चौथ्या नावाच्या म्हणजे गोविंदाला नमन असो असे म्हणून दर आचमनाचे शेवटी उजवे हातावर पाणी घेऊन ते पाणी ताम्हनात सोडावे. त्यानंतर विष्णुची चोवीस नावे म्हणून नमस्कार करायचा. (आपल्या पूजा विधिवर वेष्णव भक्तीचा प्रभाव केवढा मोठा आहे हे यावरून लक्षात येईल. विष्णूच्या चोवीस नावात संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न आणि अनिरूध्द ही नावे भागवत संप्रदायातील चार व्युहपुरूषांची आहेत. यात विष्णूच्या वामन, नरसिंह,

कृष्णा आदी अवतारांचा उल्लेख नाही. कदाचित् रामावताराला विशेष मान्यता या पुरोहितांनी बनविलेल्या धर्मशास्त्राच्या कालमानानंतर मिळाली असावी.)

१) ॐ केशवाला नमस्कार असो.
२) ॐ नारायणाला नमस्कार असो.
३) ॐ माधवाला नमस्कार असो.
४) ॐ गोविंदाला नमस्कार असो.
५) ॐ विष्णूला नमस्कार असो.
६) ॐ मधुसूदनाला नमस्कार असो.
७) ॐ त्रिविक्रमाला नमस्कार असो.
८) ॐ वामनाला नमस्कार असो.
९) ॐ श्रीधराला नमस्कार असो.
१०) ॐ हृषिकेशाला नमस्कार असो.
११) ॐ पद्मनाभाला नमस्कार असो.
१२) ॐ दामोदरला नमस्कार असो.
१३) ॐ संकर्षणाला नमस्कार असो.
१४) ॐ वासुदेवाला नमस्कार असो.
१५) ॐ प्रद्युम्नाला नमस्कार असो.
१६) ॐ अनिरूध्दाला नमस्कार असो.
१७) ॐ पुरुषोत्तमाला नमस्कार असो.
१८) ॐ अधोक्षजाला नमस्कार असो.
१९) ॐ नरसिंहाला नमस्कार असो.
२०) ॐ अच्युताला नमस्कार असो.
२१) ॐ जनार्दनाला नमस्कार असो.
२२) ॐ उपेंद्राला नमस्कार असो.
२३) ॐ हरीला नमस्कार असो.
२४) ॐ श्रीकृष्णाला नमस्कार असो.

(या चोवीस नावांच्या अर्थाचा विचार केला तर त्यात मूळ आदिपुरुष पाण्यावर झोपलेला नारायण आहे. लक्ष्मीचा पती म्हणजे माधव आहे. सर्व

वेदांचा ज्ञाता गोविंद आहे. सर्व जगाला व्यापणारा म्हणजे विष्णू आहे. मधुराक्षसाला मारणारा मधुसूदन, तर इंद्रियांवर ताबा असणारा इंद्र यांचा स्वामी हृषीकेश आहे. ज्याच्या बेंबीतून कमल उगवले असून त्यावर सृष्टिकर्ता ब्रह्मदेव विराजमान झाला आहे असा पद्मनाभ आहे. तर यशोदेने उखळीने पोट बांधून ठेवलेला दामोदर आहे. सर्व इंद्रियांवर ताबा ठेवणारा संकर्षण, वसुदेवाचा पुत्र वासुदेव, तसेच सर्व जगाचा स्वामी निरवुंश अनिरूध्द आहे. सर्व पुरुषांत श्रेष्ठ पुरूषसूक्तातील पुरुषोत्तम आहे. हिरण्यकशिपूला मारणारा नरसिंह आहे. तसाच नेहमी आत्मरूपापासून न ढळणारा अच्युत आहे. दु:खहरण करणारा हरी, तसाच मने आकृष्ट करणारा नीलवर्ण कृष्ण आहे.)

**या चोवीस नावांनंतर प्राणायाम करायचा.**

**प्राणायाम**

**ॐ प्रणवस्य परब्रह्म ऋषिः। परमात्मा देवता। दैवी गायत्री छंदः। प्राणायामे विनियोगः। ॐ भूः ॐ भुवः ॐ स्वः ॐ महः ॐ जनः ॐतपः ॐ सत्यम्।**

**ॐ भूर्भुवः स्वः। ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि। धियो यो नः प्रचोदयात्।।**

**ॐ आपो ज्योती रसोमृतं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम्।**

(जो आमच्या बुध्दीला प्रेरणा करतो त्या तेजस्वी सूर्याचें आम्ही ध्यान करतों.)

असे म्हणून प्राणायाम करावा.

**संकल्प**

**तिथिर्विष्णुस्तथा वारो नक्षत्रं विष्णुरेव च।**
**योगच्श्र करणं चैव सर्व विष्णुमयं जगत्।।**

प्रणवाचा परब्रह्म ऋषि, परमात्मा ही देवता गायत्री छंदाचा उपयोग करून प्राणायाम करायचा. त्या आधी पृथ्वीहून उंच असणाऱ्या सात लोकांची नावे उच्चारायची. ॐ भूः, ॐ भुवः, ॐ स्वः, ॐ महः, ॐ तपः, व ॐ सत्यम् । यानंतर सविता गायत्रीचा एकदा उच्चार करावा. त्या सविता देवाचे श्रेष्ठ तेज आम्ही आमच्यात साठवितो. तो आमच्या बुध्दीला चालना देवो, प्रेरक होवो.नंतर ॐ पाणी व अग्नी हेच रस आणि अमृत व भू भूवः स्व या ब्रह्माच्या व नंतर उजव्या कानाला लावावा. मग खालील दिलेले मंत्र हातात अक्षता (म्हणजे तांदूळ घेऊन हात जोडून आपली दृष्टी देवाकडे लावून म्हणावे.)

''ॐ श्रीमन् महागणाधिपतीला नमन असो. इष्ट देवतांना नमस्कार, कुलदेवतांना नमस्कार, ग्रामदेवतांना वदंन. ज्या ठिकाणी हे पूजाकार्य करीत आहे त्या स्थानदेवतांना नमस्कार. सर्व देवांना नमस्कार. सर्व ब्रह्म जाणणाऱ्यांना वदंन. (ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण) माझे हे पूजाकार्य विघ्न न येता होवो.''

सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्ननाश, गणाधिप, धूम्रकेतु, गणध्यक्ष, भालचंद्र आणि गजानन ही बारा नावे विद्याध्ययनाला सुरुवात करताना, लग्नात आणि घरात प्रवेश करताना अथवा घरातून बाहेर पडताना, लढाईच्या वेळी, संकटात सापडले असता जो कोणी म्हणेल किंवा नुसती भक्तीपूर्वक ऐकेल त्याच्या मार्गात कधीच विघ्ने येणार नाहीत. सर्व विघ्नांच्या शांतीकरता, पांढरेशुभ्र वस्त्र धारण करणाऱ्या, चंद्रासम रंगाच्या चार हात असलेल्या आणि प्रसन्नमुख अशा देवाचे ध्यान करावे.

त्यानंतर देवीला नमस्कार करायला. ''हे मंगलाचे मंगल अशा शिवकारक, (याचकांचे) सर्व अर्थ सफल करणाऱ्या, एकमेव आश्रयस्थान

असलेल्या त्रिनयनधारी, गौरवर्ण नारायण देवाच्या पत्नी किंवा शक्ती तुला नमस्कार असो.''

ज्यांच्या हृदयात मंगलाचे आश्रयस्थान असा भगवान हरी राहतो त्यांच्या सर्व कामांत केव्हाही त्यांचे अमंगल होत नाही.

जेव्हा हे लक्ष्मीरमणा, तुझ्या दोन्ही पावलांचे स्मरण करतो तोच खरा चांगला मुहूर्त, तोच खरा सुदिन, तेच तारकांचे बळ व तेच चंद्रबळ, तेच विद्याबळ आणि तेच दैवबळ (कोणतीही घटना सफल व्हायची तर ती घडताना तारका, चंद्र, विद्या आणि देव यांच्या शक्ती एकवटाव्या लागतात.)

ज्यांच्या हृद्यात नीलकमलाप्रमाणे श्यामलवर्ण जनार्दन विष्णु निवास करतो. त्यांना नेहमी लाभ व जय प्राप्त होतो. त्यांचा पराजय कुठून होणार ?

सर्व कार्य सिध्दीला जाण्याकरिता, विनायक, गुरू, सूर्य, ब्रह्मा, विष्णु व महेश्वर तसेच सरस्वतीला प्रथम प्रणाम करून योजिलेल्या किंवा इच्छित कार्यसिध्दिकरिता, देव व दानवांनीही ज्याचे पूजन केले होते अशा त्या सर्व विध्ने दूर करणाऱ्या गणाधिप म्हणजे गणांच्या स्वामीला नमस्कार असो. प्रारंभ केलेल्या कार्यात त्रिभूवनांचेस्वामी ब्रह्मा, ईशान व जनार्दन यांच्या आदेशामुळे आम्हाला यश मिछळते.

श्रीमद्‌भगवत् महापुरूषाच्या विष्णूच्या आज्ञेने चाललेल्या ब्रह्मदेवाच्या दुसऱ्या परार्धात, विष्णूपदात, श्रीश्वेतवाराहकल्पांत, वैवस्वतात, मन्वंतरात, कलियुगाच्या प्रथम चरणात, भरतवर्षात, भरतखंडातील जंबुध्दीपात, दंडकारण्यातील विश्रामात, गोदावरी नदीच्या दक्षिण तीरावरील प्रदेशात शालिवाहनशक या अयनात, वर्षाऋतूत - भाद्रपद शुक्तल चतुर्थीला... वारी... नक्षत्र असताना, चंद्र राशीला व श्री सूर्य राशीला आणि श्री

देवमुख (गुरू) राशीला व इतर ग्रह आपापल्या जागी योग्य त्या राशीस्थानाला असताना... योगावर... करणावर, अशा रीतीने अशा विशेषांनी युक्त शुभ पुण्यतिथीच्या दिवशी, मला श्रुती, स्मृती पुराणांत सांगितलेले फळ मिळावे म्हणून, तसेच, श्री परमेश्वर संतुष्ट व्हावा म्हणून, आमच्या कुटुंबातील परिवारातील दोन पायाच्या व चार पायांच्या सर्वचजणांना क्षेम आग्नेयस्थैर्य, धर्म आणि भरभराट मिळावी आणि सर्व मंगल वस्तूंच्या लाभासाठी म्हणून, वार्षिक ठरल्याप्रमाणे (मातीच्या सिद्धिविनायकाला, देवतेच्या संतोषाकरता) माझ्या ज्ञानानुसार, मिळाले तेवढया पूजासाहित्याने, पुरुषसूक्त आणि पुराणमंत्रांच्या साहाय्याने प्राणप्रतिष्ठापना आधी करून नंतर ध्यान, आवाहन वगैरे सोळा संस्कारांचे पूजन मी करीन. महागणपतीचे स्मरण, आणि शरीरशुद्धीकरिता पुरुषसूक्तषडंगन्यास तांब्या, शंख व घंटा यांची पूजा करतो। ''आसनबंधन गणानां त्वा'' या मंत्राचा गणपतीच्या स्मरणाकरता उपयोग करीत आहे.

हे ब्रह्मणस्पते, तू (देवादि) गणांचा प्रमुख नेता आहेस. ऋषीतला श्रछष्ठ ऋषि आहेस. भगवंतात तू श्रेष्ठ भगवान आहेस. तू उत्तमोत्तम मंत्रांचा स्वामी आहेस. असा जो तू, त्या तुला आम्ही हाक मारीत आहोत. तर हे देवा! ही आमची स्तुती ऐकून तू आपल्या संरक्षणशक्तीनिशी इकडे ये, आणि या यज्ञात बैठक मार.

''हे पृथ्वी, तू सर्व लोक तुझ्याकडून धारण केला आहेस. तर तुला विष्णुने आधार दिला आहे. तू मला आधार दे आणि माझे हे पूजेला बसताना घेतलेले आसन पवित्र कर.'' असे म्हणून आसनमांडी घालून उजव्या गुडघ्यावर डावा हात उताणा ठेवून त्यात पाणी घाला व त्यावर उजवा हात उपडा ठेवावा. याचेच नाव आसनबंध. त्यानंतर अशी विनंती करावी - ''सर्व दुष्ट पीडादायक भुते आणि पिशाच्चे सर्व बाजूंनी, सर्व

दिशांनी दूर जावोत. सर्वांच्या अविरोधाने म्हणजे सर्वांच्या एकमताने मी या पूजाकृत्याची सुरूवात करतो.'' असे म्हणून विघ्न करणाऱ्या अदृश्य प्राण्यांचे तांदूळ सभोवार उडवून निवारण करावे.

१) शरीराच्या सहा अंगाना स्पर्श करून त्यात पावित्र्याची जागृती उत्पन्न करण्यात आली, त्या वेळी किती प्रकाराने विविध कल्पना केली. ब्रह्मवादी विचारतात ज्या वेळी पुरूषाला संकल्प करून उत्पन्न करण्यात आले त्या वेळी किती प्रकारांनी विविध कल्पना केली ? त्या परमदिव्य विश्व पुरूषांचे मुख कोणते, बाहू कोणते, मांड्या कोणत्या ? आणि पाय कोणते ? - असे म्हणतात. हृदयाला नमस्कार असो. (असे म्हणून उजवा हात हृदयाला लावावा.)

२) ब्राह्मण त्याचे तोंड होते. क्षत्रिय बाहू झाले तर वैश्य त्याच्या मांड्यांपासून निर्माण झाले. पायापासून शूद्र निर्माण झाले. (डोक्याला स्पर्श करावा.)

३) चंद्र उपजला मानसातुनी, सूर्याचा जन्म डोक्यातूना। अग्नि निर्मिती मुखापासूनी, वायू झाला प्राणापासून।। वषट् म्हणून शेंडीला हात लावावा.

४) नाभीमधुनी अंतरिक्ष तर, डोक्यापासून स्वर्ग स्फुरे। पायापासुनी भूमी झाली. लोक दिशा कर्णदूरे।

५) देवांनी जो यज्ञ केला त्यात पुरुषरूपी पशूला हे बांधते झाले. (भूः भुवः स्वः महः जनः तपः सत्य या सात लोकांच्या) सात मर्यादा आणि २१ समिधा या यज्ञाच्या होत्या. तीन डोळ्यांना वौषट् या मंत्राने डोळे व तिसरा डोळा भुवयांच्यामध्ये जो कल्पित ज्ञानचक्षुं त्याला हाताच्या बोटांनी स्पर्श करावा.


६) यज्ञेन यज्ञ... यशस्वरूपी परमेश्वरी यज्ञ करूनच देवांनी पूजाअर्चा केली, हाच धर्म अग्रस्थानी होता. सृष्टी उत्पन्न करण्यात साधनीभूत

झालेले असे पुरातन साध्यदेव ज्या स्वर्गात आहेत असा स्वर्ग महात्मे प्राप्त करून घेतात. अस्त्राला फट् (असे म्हणून टाळी वाजवावी) हा झाला दिग्बंध.


यानंतर ज्या तांब्यातले पाणी आपण पूजा करायला वापरणार, त्या तांब्याची पूजा प्रथम करायची.

**कलशपूजा**

कलशस्य मुखे विष्णुः कंठे रूद्र समाश्रितः।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः।।
कुक्षौ तु सागराः सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा।



ऋग्वेदोऽथ यजुर्वेदः सामवेदो ह्रथवर्णः।।
अंगैश्च सहिताः सर्वे कलशं तु समाश्रिताः।
अत्र गायत्री सावित्री शांतिपुष्टिकरी तथा।।



आयांतु देवपूजार्थं दुरितक्षयकारकाः।
गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरू।।
श्रीवरूणाय नमः गंधाक्षतपुष्पाणि समर्पयामि।

या कलशाच्या म्हणजे तोंडावर विष्णु, गळ्याशी रूद्र आश्रय करून राहिला आहे. ह्याच्या तळाशी ब्रह्मदेव राहिला आहे, तर मध्यभागी मातृगण राहातात. याच्या कुक्षीत म्हणजे पोटात सगळे समुद्र आणि सप्तद्वीपा वसुंधरा आहे अशी कल्पना करून, या कलशाचा ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद, शिक्षा कल्प, निरूक्त, व्याकरण आणि छंदस् या षडांगांसह आश्रय घेवोत अशी प्रार्थना करावयाची. येथे गायत्रीसावित्री (वृत्तदेवता) शांती आणि पुष्टिकारक ठरोत. दुरितांचे तिमिर दूर करणाऱ्या त्या देवता, देवपूजेकरता या कलशांत येवोत. तसेच, हे गंगे, यमुने,

गोदावरी, सरस्वती, नर्मदे, सिंधू आणि कावेरी या नद्यांनो, या कलशांतील पाण्यात या. या सर्व दिव्य तेजाने युक्त अशा या कलशाला नमस्कार असो. आपल्या डाव्या हाताकडे पूजेकरता पाणी भरून घेतलेल्या तांब्याला सर्व पूजा उपचाराबद्दल गंध, अक्षता फूल लावून त्याची पूजा करावी व त्याला नमस्कार करावा. त्यानंतर

**शंखपूजा**


शंखादौ चंद्रदैवत्यं कुक्षौ वरूणदेवता।
पृष्ठे प्रजापतिश्चैव अग्रे गंगासरस्वती।।
त्वं पुरा सागरोत्पन्नो विष्णुना विधृतः करे।
अग्रतः सर्वदेवानां पांचजन्य नमोस्तु ते।।
शंखदेवतायै नमः सर्वोपचारार्थे गंधपुष्पं समर्पयामि।



शंखाच्या मुळाशी चंद्र दैवत, पोटात वरूण देवता, पाठी प्रजापती आणि टोकाला गंगा आणि सरस्वती असतात. त्रैलोक्यात जेवढी तीर्थे आहेत ती वासुदेवाच्या आज्ञेने शंखात राहतात. हे ब्राम्हणश्रेष्ठा, म्हणून प्रथम शंखाचे पूजन करावे। ''हे शंखदेवा, तू पूर्वी समुद्रात उत्पन्न झालास आणि मग विष्णुने आपल्या हातात तुला धारण केले. सर्व देवांनी तुला वंदन केले. हे पांचजन्या, तुला नमस्कार असो.''

पांचजन्याला आम्ही ओळखतो. त्या पुनीत करणाऱ्या देवाला मनात साठवितो. तो शंख आम्हांला प्रेरणा देवो. शंखाला नमस्कार. उजव्या बाजूला ठेविलेल्या शंखाला स्नान घालून त्यात पाणी भरून गंधफूल आणि तुळशीपत्र वाहावे. सर्व उपचारांकरता गंध आणि फुले मी वाहतो, असे म्हणावे. शंखाला अक्षता वहात नाहीत. आता यानंतर घंटेची पूजा.

**घंटापूजा**



आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम्
कुरू घंटे रवं तत्र देवताह्वानलक्षणम्

(हे घंटे, देवांच्या आगमनाकरता व राक्षसांना दूर करण्याकरता तू नाद कर.)

असे म्हणून घंटेला गंध, अक्षता व पुष्पे वहावी.

देव यावे म्हणून राक्षस पळून जावे म्हणून मी घंटा वाजवितो. ते देवांना एक प्रकारचे निमंत्रणच आहे. घंटेला नमस्कार असो. सर्व उपचारासाठी गंध, अक्षता, फुले वाहतो. अशी प्रार्थना करून - घंटेला स्नान घालून गंध, अक्षता, फुले लावून ती वाजवावी व आपल्या डाव्या बाजूला ठेवावी.

घंटेची पूजा झाल्यावर दिव्याची पूजा, दिवा म्हणजे समई किंवा निरांजन, त्या दीपदेवतेला सर्व उपचारार्थ गंध, फुले व अक्षता समर्पण करतो.

**दीपपूजा**

भो दीप ब्रह्मरूपस्त्वं ज्योतिषां प्रभुरव्ययः।
आरोग्यं देहि पुत्राश्चं सर्वार्थांश्च प्रयच्छ मे।।
दीपाय नमः गंधपुष्पं समर्पयामि।



(हे दीपदेवते! तू ब्रह्मरूप आहेस, तू सर्वापेक्षां तेजस्वी आहेस, कधीही क्षीण होणारी नाहीस. मला आरोग्य आणि पुत्र देऊन माझ्या सर्व इच्छा पूर्ण कर.)

असें म्हणून दिव्याला गंध-फूल वहावें.

श्रीमंडपदेवतायै नमः गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।

असे म्हणून मंडपाला गंध, अक्षता व फुले वहावी.

## प्रोक्षण

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा।
यः स्मरेत् पुंडरीकाक्षं स बाह्याभ्यंतरः शुचिः।।

१. ''मी शुद्ध आहे, माझ्या मनांत कोणतेही अपवित्र विचार नाहीत'' अशा भावनेने व विश्वासाने श्रीविष्णूचे स्मरण करावे व पुढील पूजेला लागावे असा या प्रोक्षणविधीचा हेतु आहे.

(कोणी पवित्र असो किंवा अपवित्र असो, कोणत्याही स्थितीत असो, कमलासारखे ज्याचे डोळे अशा श्रीविष्णूचे जो स्मरण करतो तो सर्व त-हेने शुद्धच होतो.)


असे म्हणून शंखांतील पाण्याने स्वतःचें शरीर आणि पूजाद्रव्ये प्रोक्षण करावी.

## अथ प्राणप्रतिष्ठा

अस्य प्राणप्रतिष्ठामंत्रस्य। ब्रह्मविष्णुमहेश्वरा ऋषयः। ऋग्यजुः सामाथर्वाणि छंदांसि। पराप्राणशक्तिर्देवता। आं बीजं। हीं शक्तिः। क्रों कीलकम्। अस्यां मूर्तौ प्राणप्रतिष्ठापने विनियोगः।

ॐ आं ऱ्हीं क्रोम्।

अस्यां मूर्तौ प्राणा इह प्राणाः। अस्यां मूर्तौ जीव इह स्थितः।
अस्यां मूर्तौं सर्वेंद्रियाणि आगत्य सुखं चिरं तिष्ठंतु स्वाहा ।
श्रीसिद्धिविनायकाय नमोनमः।



(या मूर्तीत येथे प्राण उत्पन्न होवोत. या मूर्तीत आतां जीव उत्पन्न झाला आहे. या मूर्तीत सर्व इंद्रियें येऊन चिरकाल वास करोत.)

याप्रमाणे म्हणून मूर्तीच्या हृदयाला आपला उजव हात लावावा व दूर्वांकुरांनी मूर्तीच्या डोळ्यांना मध किंवा पाणी लावावे.

**अथ ध्यानम्**

एकदंतं शर्पकर्णं गजवक्रं चतुर्भुजम् ।
पाशांकुशधरं देवं ध्यायेत् सिद्धिविनायकम् ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः ध्यायामि ।

(एकदंत शूर्पकर्ण, गजवक्र, चतुर्भुज, पाशांकुशधर अशा सिद्धिविनायक देवाचे ध्यान करावे.) असें म्हणून नमस्कार करावा.

**आवाहन**

आवाहयामि विघ्नेश सुरराजार्चितेश्वर ।
अनार्थनाथ सर्वज्ञ पूजार्थं गणनायक ।।
श्रीसिद्धिविनायक नमः आवाहयामि ।

(हे विघ्नें हरन करणाऱ्या, इंद्रादि देवांनी पूजिलेल्या देवा, अनाथांच्या नाथा, सर्वज्ञा, गणनायका, मी तुला पूजेसाठी बोलावीत आहे.)

असे म्हणून हात जोडावे.

**आसन**

विचित्ररत्नरचिंत दिव्यास्तरणसंयुतम् ।
स्वर्णसिंहासनं चारू गृहाण सूरपूजित ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः आसनार्थे अक्षतान् समर्पयामि ।



(सर्व देव ज्यांचे पूजन करतात अशा देवा, चित्रविचित्र रत्नांनी भूषविलेले आणि ज्याच्यावर दिव्य अस्तर घातलेले आहे अशा या सुवर्णसिंहासनावर तू बैस.)

असे म्हणून श्रीच्या मूर्तीच्या आसनावर अक्षता वहाव्या.

**पाद्य**

सर्वतीर्थसमानीतं पाद्यं गंधःदिसंयुतम् ।
विघ्नराज गृहाणेदं भगवन् भक्तवत्सल ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः पांद्य समर्पयामि ।

या षोडशोपचार पूर्जेत देवताध्यान झाल्यावर आवाहनापासून पुढच्या उपचारांसाठी पुरुषसूक्तांतील "ॐ सहस्त्रशीर्षा.'' इत्यादि १६ ऋचांपैकीं क्रमाने एकेक ऋचा एकेका उपचारासाठी म्हणण्याचा सार्वत्रिक सांप्रदाय आहे. पण त्या ऋचांच्या अर्थाकडे पाहिले असतां त्या त्या उपचाराशीं त्या ऋचेचा विशेष संबंध असल्याचें दिसणार नाही. त्यापेक्षां साध्या संस्कृत श्लोकांनी हे उपचार केल्यानें देवतास्तवन होऊन पूजाही सुटसुटीत होईल म्हणून येथें फक्त संस्कृत श्लोकच दिले आहेत. ज्यांना पुरुषसूक्तांच्या ऋचा म्हणावयाच्या असतील त्यांच्यासाठी वेगळया पोथ्या आहेतच.

(हे विघ्नराजा, भक्तवत्सल भगवंता, ज्यांत गंध मिसळलेलें आहे असें हें सर्व तीर्थांचे उदक मी तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार कर.)

असें म्हणून फुलानें किंवा दूर्वांनी गंध घातलेलें पाणी वहावें.

**अर्घ्यं**

अर्घ्यं च फलसंयुक्तं गंधपुष्पाक्षतैर्युतम् ।
गणाध्यक्ष नमस्तेऽस्तु गृहाण करूणानिधे ।
श्रीसिद्धिविनायकाय नमः अर्घ्यं समर्पयामि ।

(हे गणाध्यक्षा, करूणासागरा, गंध, पुष्प आणि अक्षता यांनीं त्याचप्रमाणें फलानें युक्त असें अर्घ्यं मी तुला अर्पण करीत आहें त्याचा स्वीकार कर.)

असें म्हणून गंध, फूल, सुपारी आणि अक्षतायुक्त पाणी वहावें.

**आचमन**

विनायन नमस्तुभ्यं त्रिदशैरभिवंदित ।
गंगाहृतेन तोयेन शीघ्रमाचमनं कुरू ।।

(हे विनायका, सर्व देव तुला नमस्कारं करतात, मी हें गंगेचें पाणी आणलेलें आहे तें घेऊन लौकर आचमन कर.)

असें म्हणून आचमनासाठी ताम्हनांतच पाणी सोडावे.

**स्नान**

गंगादिसर्वतीर्थेभ्य आनींत तोयमुत्तमम् ।
भक्त्या समर्पितं तुभ्यं स्नानायाभीष्टदायक ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः स्नानं समर्पयामि ।

(हे अभीष्टदायका, गंगा आदिकरून तीर्थांचे हें उत्तम पाणी आणलेलें आहे आणि मी भक्तिभावानें हें तुला अर्पण करीत आहें याचा स्नानासाठी स्वीकार कर.)

असें म्हणून फुलानें किंवा दूर्वांकुरांनी मूर्तीवर पाणी शिंपडावें.

**पंचामृतस्नान**

श्रीसिद्धिविनायकाय नमः पंचामृतस्नानं समर्पयामि ।



दूध, दहीं, तूप, मध आणि साखर यांच्या मिश्रणाला पंचामृत म्हणतात. साध्या पाण्याच्या स्नानानंतर हे पदार्थ अंगाला लावून स्नान करणें हा श्रीमंतीचा उपचार आहे. अर्थात् भक्ताप्रमाणेंच देवालाही तो उपचार प्रिय असणारच, म्हणून वरप्रमाणें तयार केलेलें मिश्रण फुलानें किंवा दूर्वांकुरांनीं वहावें.

**शुद्धोदक व गंधोदकस्नान**

श्रीसिद्धिविनायकाय नमः शुद्धोदकस्नानं समर्पयामि । शुद्धोदकस्नांनातरेण गंधोदकस्नानं समर्पयामि । गंधोदकस्नानांतरेण आचमनीय समर्पयामि ।

असें म्हणून पुनःशुद्ध पाणी व त्यानंतर गंधयुक्त पाणी फुलाने वहावें आणि नंतर एक पळीभर पाणी आचमनासाठीं म्हणून ताम्हनांत सोडावें.

**पूर्वाराधनार्पण**

श्रीसिद्धिविनायकाय नमः पूर्वाराधनार्थे गंधाक्षतपुष्पं धूपं दीपं पंचामृतशेषनैवेद्यंच समर्पयामि ।

असें म्हणून गंध, अक्षता व फुलें मूर्तींच्या पायांवर वहावीं, धूप दाखवावा, नीरांजन ओवाळावें व शिल्लक राहिलेल्या पंचामृताचा नैवेद्य दाखवावा.

अनेन पूर्वाराधनेन सिद्धिविनायकदेवता प्रीयताम् ।

(या पहिल्या पूजेनें श्रीसिद्धिविनायक देवता संतुष्ट होवो !)

असें म्हणून नमस्कार करावा.

१. अंगावर पंचामृत घातल्यानंतर ओखटपणा जाण्यासाठी पुनः शुद्ध पाण्याची ऊन पाण्याची - सुद्धां आवश्यकता आहेच. म्हणून हे उपचार करावयाचे असतात। स्नानानंतर आचमन करण्याच्या पद्धतीला अनुसरून आचमन हा उपचार समर्पण करावयाचा असतो.

**महाभिषेकस्नान**

ॐ नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि । त्वमेव केवलं कर्तासि । त्वमेव केवलं धर्तासि । त्वमेव केवलं हर्तासि । त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि । त्वं साक्षादात्मासि नित्यम् ।।१।।

एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि । तन्नो दंती प्रचोदयात् ।।२।।

नमो व्रातपतये नमो गणपतये नमः प्रमथपतये नमस्ते अस्तु

लंबोदरायैकदंताय विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः ।।३।।

श्रीसिद्धिविनायकाय नमः महाभिषेकस्नांन समर्पयामि आचमनीयं च समर्पयामि।

याप्रमाणें म्हणून दूर्वांकुरांनी मूर्तीवर पाणी शिंपडावें।

**पुनः प्रतिष्ठापन**

श्रीसिद्धिविनायकाय नमः महाभिषेकस्नानांते प्रतिष्ठासनं समर्पयामि ।सुप्रतिष्ठितमस्तु ।

असें म्हणून मूर्तीला अक्षता वहाव्या व नमस्कार करावा.

१. कोणत्याही देवतेच्या पूजेंत पूर्वाराधना व उत्तराराधना असे दोन भाग असतात. स्नानापर्यंतच्या उपचारांचा पूर्वाराधनेंत समावेश होतो. त्यानंतर महाभिषेक म्हणजे देवावर सतत धार धरण्याचा उपचार करतात. या उपचाराच्या वेळीं विशिष्ट देवतांचे विशिष्ट सूक्त असतें तें म्हणण्याची पद्धति आहे. श्रीगणपतीच्या पूजेंत गणपतिअथर्वशीर्ष म्हटलें जातें. त्यांतला कांहीं भाग येथे दिला आहे. गणपति हा अगदी मूळ ॐ कार ब्रम्ह स्वरूप आहे, सर्व विश्व त्याच्यापासून उत्पन्न झालें आहे. तो भक्तांना पावतो, त्यांचीं संकटें दूर करतो, त्यांचे वांछित मनोरथ पूर्ण करतो, इत्यादि वर्णन या अथर्वशीर्षांत आहे. सवड असेल त्यांनीं सबंध अथर्वशीर्ष म्हणावें व शेवटी पुरूषसूक्त म्हणून महाभिषेक संपवावा.

२. स्नान आटोपल्यावर पुनःआसनस्थ होण्याबद्दलची ही प्रार्थना आहे. यानंतर उत्तराराधनेला सुरूवात होते.

**वस्त्रोपवस्त्रसमर्पण**

रक्तवस्त्रयुंग देव दिव्यं कांचनसंभवम् ।

सर्वप्रद गृहाणेदं लंबोदर हरात्मज ।।

श्रीसिद्धिविनायकाय नमः वस्त्रार्थे कार्पासवस्त्रं समर्पयामि ।

(हे लंबोदरा, शिवपुत्रा, सर्वं कांही प्राप्त करून देणाऱ्या देवा! हें दिव्य सोन्यासारख्या कांतीचें तांबडे वस्त्र मी तुला देत आहें त्याचा स्वीकार कर.)

राजतं ब्रह्मसूंत्र च कांचनं चोत्तरीयकम् ।
गृहाण चारू सर्वज्ञ भक्तानां वरदो भव ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः उपवस्त्रार्थे यज्ञोपवीतं समर्पयामि ।

(हे सुंदर व सर्वज्ञ देवा, हें सोन्यारूप्याचें उत्तरीय वस्त्र तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार कर आणि आम्हां भक्तांना पाव.)

असें म्हणून जानवें घालावें.

**चंदन (विलेपन)**

कस्तूरीरोचनाचंद्रवुंकुमैश्च समन्वितम् ।
विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।

१. श्री गणपतीला तांबडा रंग प्रिय आहे म्हणून त्याचें वस्त्राही तांबडया रंगाचेंच असावें असें सांगितलें आहे. प्रत्यक्ष वस्त्रऐवजीं कापूस पिंजून त्याची लांब पट्टी घेऊन दिला मधून मधून वुंकू अथवा पिंजर लावून बनविलेलीं दोन वस्त्रं अर्पण केलीं तर चालतात. किंबहुना हाच प्रकार विशेष रूढ व बिनखर्चाचा आहे.



२. उत्तरीय म्हणजे अंगावर घेण्याचें वस्त्र. याचें प्रतीक म्हणून जानवें घालतात. तें मूर्तीच्या डाव्या खांद्यावरून व उजव्या कांखेखालून येईल असें घालावें. आणखी कांही अलंकार घालावयाचे असल्यास याच वेळीं घालावे.

३. गणपतीला रक्तचंदन प्रिय आहे. म्हणून रक्तचंदनाचाच टिळा लावावा. तें मिळत नसेल तर कुंकुम अथवा पिंजर घालून तयार केलेलें गंध लावावें.

(कस्तुरी, केशर, कुंकुम इत्यादिकांनीं युक्त असें चंदन, हे सुरनायका, मी तुला लेपन करीत आहें, त्याचा स्वीकार कर.)

असें म्हणून मूर्तीला गंधाचा टिळा लावाव व वर अक्षता लावाव्या.

याच वेळी शेंदूर, अबीर, बुक्का इत्यादि परिमल म्हणजे सुवासिक द्रव्येंही अर्पण करावी.

**पुष्पसर्मपण**

माल्यादीनि सुगंधीनी मालत्यादीनि वै प्रभो ।
मयार्पितानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ।।
श्रीसिद्धिविनायकाय नमः पूजार्थे पुष्पाणि समर्पयामि ।

गुंफावयाला योग्य सुगंधी अशी मालतीची वगैरे फुले हे प्रभो, पूजेकरता मी आणली आहेत. ती फुले तू स्वीकार कर. करवीर, जातिकुसुम आणि चाफा व बकुळ वगैरे शुभ्र पुष्पांनी तसेच शमीपत्र व कल्हारानी परमेश्वराची पूजा करावी. श्री सिद्धिविनायकाला नमस्कार असो. या ऋतूत उपलब्ध असणारी फुले वाहतो. या मंत्राने गणपतीला फुले वहावीत.

नंतर पुढील नाममंत्रांनी गणपतीला अक्षता अथवा फुले वहावीत.

आता अंगपूजाः

१) गणेश्वराला नमस्कार — पायांची पूजा करतो.
२) विघ्नराजाला नमस्कार — गुडघ्यांची पूजा करतो.
३) आखुवाहनाला नमस्कार — मांडयाची पूजा करतो.
४) हेरंबाला नमस्कार — कंबरेची पूजा करतो.
५) लंबोदराला नमस्कार — पोटाची पूजा करतो.

| | |
|---|---|
| ६) गौरीसुताला नमस्कार | स्तनांची पूजा करतो. |
| ७) गणनायकाला नमस्कार | हृदयाची पूजा करतो. |
| ८) पाशहस्ताला नमस्कार | हातांची पूजा करतो. |
| ९) गजवक्त्राला नमस्कार | मुखाची पूजा करतो. |
| १०) विघ्नहरण करणाऱ्याला नमस्कार | कपाळाची पूजा करतो. |
| ११) सर्वेधराला नमस्कार | डोक्याची पूजा करतो. |
| १२) गणाधिपाला नमस्कार | सर्वांगाची पूजा करतो. |

**आता गणपतीची पाने वाहून पूजा**

| | |
|---|---|
| १) सुमुखाला नमस्कार | मधुमालतीचे पान वाहतो. |
| २) गणाधिपाला नमस्कार | चाफ्याचे पान वाहतो. |
| ३) उमापुत्राला नमस्कार | बेलाचे पान वाहतो. |
| ४) गजाननाला नमस्कार | पांढ-या दुर्वेचे पान वाहतो. |
| ५) लंबोदराला नमस्कार | बोरीचे पान वाहतो. |
| ६) हरसूनूलां (शिवपुत्राला) नमस्कार | धन्याचे पान वाहतो. |
| ७) गजकर्णाला नमस्कार | तुळशीचे पान वाहतो. |
| ८) वक्रतुंडाला नमस्कार | शमीचे पान वाहतो. |
| ९) गुहाग्रजाला नमस्कार | डोरलीचे पान वाहतो. |
| १०) एकदंताला नमस्कार | आघाडयाचे पान वाहतो. |
| ११) विकटाला नमस्कार | कण्हेरीचे पान वाहतो. |
| १२) कपिलला नमस्कार | रूईचे पान वाहतो. |
| १३) गजदंताला नमस्कार | अर्जुनसाडयाचे पान वाहतो. |
| १४) विघ्नराजाला नमस्कार | विष्णुक्रांताचे पान वाहतो. |
| १५) बटूला नमस्कार | डाळिंबीचे पान वाहतो. |
| १६) सुराग्रजाला नमस्कार | देवदारूचे पान वाहतो. |

| | |
|---|---|
| १७) भालचंद्राला नमस्कार | पांढऱ्या मख्याचे पान वाहतो. |
| १८) हेरंबाला नमस्कार | पिंपळाचे पान वाहतो. |
| १९) चतुर्भुजाला नमस्कार | जाईचे पान वाहतो. |
| २०) विनायकाला नमस्कार | केवडयाचे पान वाहतो. |
| २१) सर्वेश्वराला नमस्कार | अगस्त्याचे पान वाहतो. |

(अशी एकवीस प्रकारची पत्री गणपतीला अर्पण करायची. यातील जेवढी मिळाली असतील तेवढी प्रत्यक्ष वाहावीत. बाकीची मनाने कल्पना करून त्याऐवजी अक्षता वाहव्यात.)

१. श्री गणपतीला वस्त्र व चंदन यांप्रमाणेंच फुलेंही तांबडया रंगाचींच जास्त प्रिय आहेत. म्हणून तसलीं फुलें वहावीं.

२. या एकवीस दूर्वा वाहण्याचा प्रकार पुढीलप्रमाणें आहे: ॐ गणाधिपाय नमः दूर्वायुग्मं समर्पयामि । ॐ उमापुत्राय नमः दूर्वायुग्मं. । ॐ अघनाशनाय नमः दूर्वायुग्मं. । ॐ एकदन्ताय नमः दूर्वायुग्मं. । ॐ इभवक्त्राय नमः दूर्वायुग्मं. । ॐ मूषकवाहनाय नमः दूर्वायुग्मं. । ॐ विनायकाय नमः दूर्वायुग्मं. । ॐ ईशपुत्राय नमः दूर्वायुग्मं. । ॐ सर्वसिद्धिप्रदायकाय नमः दूर्वायुग्मं. । ॐ कुमारगुरवे नमः दूर्वायुग्मं. ।।

याप्रमाणे प्रत्येक नावांचा उच्चार करून प्रत्येकीं दोन दोन आणि शेवटीं

गणाधिप नमस्तेऽस्तु उमापुत्राघनाशन ।
एकदन्तेभवक्त्रेति तथा मूषकवाहन ।।१।।
विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक ।
कुमारगुरवे तुभ्यं पूजयामि प्रयत्नतः ।।२।।

हे श्लोक म्हणून शेवटची एक दूर्वा वहावयाची. हें दूर्वासमर्पण तांबूलसमर्पणानंतर महानीरांजन दीपाच्या पूर्वी करण्याचाही प्रघात आहे.

गणपतीला तुलसी वाहणें वर्ज्य आहे. पण फक्त गणेशचतुर्थीच्या दिवशीं इतर पत्रीबरोबर ''गजकर्णाय नमः'' असे म्हणून तुलसीदल वाहण्याचा परिपाठ आहे.

**धूपसमर्पण**

**दशांगं गुग्गुलं धूपं सुगंधं च मनोहरम् ।**
**गृहाण सर्वदेवेश उमापुत्र नमोऽस्तु ते ।।**

श्री सिद्धिविनायकाय नमः धूपं समर्पयामि ।

(हे देवेशा, उमापुत्रा, हा सुगंधी मनोहर धूप मी तुला अर्पण करीत आहें. त्याचा स्वीकार कर. तुला नमस्कार असो.)

असें म्हणून धूप दाखवावा.

**दीपसमर्पण**

सर्वज्ञ सर्वलोकेश त्रैलोक्यतिमिरापह ।
गृहाण मंगलं दीपं रुद्रप्रिय नमोस्तु ते ।।

श्रीसिद्धिविनायकाय नमः दीपं समर्पयामि ।

(हे सर्वज्ञा, सर्वलोकेशा, त्रैलोक्यांतील अंधार दूर करणाऱ्या रूद्रप्रिया देवा, हा मंगल दीप मी तुला दाखवित आहें, याचा स्वीकार कर.)

असें म्हणून नीरांजन ओवाळावें. नीरांजन ओंवाळताना घंटा वाजवावी.

**नैवेद्यसमर्पण**

नानाखाद्यमयं दिव्यं नैवेद्यं ते निवेदतम् ।
मया भक्त्या शिवापुत्र गृहाण गणनायक ।

श्री सिद्धिविनायकाय नमः नैवेद्यं समर्पयामि ।

१. धूपाच्या भांडयांत निखारे घालून त्यावर धूप व इतर सुगंधी द्रव्यें घालावीं म्हणजे त्यांचा वास दरवळतो व सर्व वातावरण प्रसन्न होतें. उदबत्त्या आतां सर्वत्र मिळतातच.

हा धूप - उपचार करतांना घंटा वाजवावी.

(हे शिवापुत्रा, नाना प्रकारच्या खाद्यपदार्थांनीं युक्त असा हा नैवेद्य मी तुला दाखवित आहें त्याचा स्वीकार कर.)

असें म्हणून नैवेद्य समर्पण करावा. तो करतांना ॐ प्राणाय स्वाहा । अपानाय स्वाहा । व्यानाय स्वाहा । उदानाय स्वाहा । समानाय स्वाहा । ब्रह्मणे स्वाहा । असें एकेक वेळां म्हणून घांस देतात त्याप्रमाणें हातानें खूण करीत जावी. नैवेद्य समर्पणानंतर 'हस्तप्रक्षालनं समर्पयामि" असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें. याचा अर्थ 'हात धुण्यासाठी मी तुला पाणी देत आहें" त्याचा स्वीकार कर असा आहे.

**फलसमर्पण**

इदं फलं मया देवा स्थापितं पुरतस्तव ।
तेन मे सुफलावाप्तिर्भवत् जन्मनि जन्मनि ।।

श्री सिद्धिविनायकाय नमः फलार्थे नारिकेलफलं (पूगीफलं) समर्पयामि।

(हे देवा, हें फळ मी तुझ्यापुढें ठेवीत आहें. या योगानें जन्मोजन्मीं माझे मनोरथ पूर्ण होवोत.)

असें म्हणून देवापुढें नारळ अथवा सुपारीं ठेवून नमस्कार करावा.

**तांबूलसमर्पण**

पूगीफलं महद्दि नागवल्ल्या समन्वितम् ।
कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यतम् ।।

(विडयाची पानें, सुपारी, कापूर, वेलदोडे इत्यादि पदार्थांनी युक्त असा हा विडा, देवा, मी तुला अर्पण करीत आहें, त्याचा स्वीकार होवो.)

असे म्हणून देवाला विडा समर्पण करावा. याचवेळी ''श्री सिद्धिविनायकाय नमः दक्षिणां समर्पयामि'', असे म्हणून यथाशक्ति दक्षिणाही अर्पण करावी.

पंचखाद्य हें अगदी साधें प्रसादसाधन आहे। (१) हरभऱ्याची डाळ, काजू बिया किंवा शेंगदाणे (२) पोहे, चुरमुरे किंवा लाह्या (३) नारळ (४) गूळ किंवा साखर आणि (५) तीळ इतके जिन्नस एकत्र केले कीं हें तयार होतें आणि हे जिन्नस कुठेंही अल्प किंमतीत मिळूं शकतात.

**प्रदक्षिणा**

यानि कानि च पापानि जन्मांतरकृतानि च ।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदे पदे ।।
श्री सिद्धिविनायकाय नमः प्रदक्षिणां समर्पयामि ।

(या जन्मांत किंवा पूर्वजन्मीं माझ्या हातून जीं कांही पापें झालीं असतील तीं या प्रदक्षिणेच्या प्रत्येक पावलागणिक नाहींशीं होवोत.) असें म्हणून प्रदक्षिणा घालावी.

**नमस्कार**



नमस्ते विघ्नसंहर्त्रे नमस्ते ईप्सितप्रद ।
नमस्ते देवदेवेश नमस्ते गणनायक ।।
श्री सिद्धिविनायकाय नमः नमस्करोमि ।

(विघ्नहरणकर्त्या देवा, तुला नमस्कार असो. इच्छिलेलें प्राप्त करून देणाऱ्या देवा, देवेशा, गणनायका, तुला पुनः पुनः नमस्कार असो.)

असें म्हणून देवाला साष्टांग नमस्कार घालावा.

साष्टांग नमस्कार म्हणजे दोन हात, दोन पाय, डोकें, छाती व दोन गुडघे हीं शरीराचीं आठ अंगें जमिनीला टेंकून केलेला नमस्कार.

**महानीरांजनदीप व आरती**

यानंतर नीरांजनांत कापूर पेटवून आरत्या म्हणाव्या. आरत्या म्हणतांना सर्वांनीं उभें रहावें. मंजुळ वाद्यें वाजवावीं व एकंदर वातावरण भक्तियुक्त

व प्रसन्न राहील आशा रीतीनें वागावें.

**मंत्रपुष्प**

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।।
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।।
कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ।।

ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं । समंतपर्याईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यताया एकराळिति ।। तदप्येष श्लोकोभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूत्तस्यावसन् गृहे ।। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

सर्वशक्तिमान राजाधिराज व उपासकांची प्रार्थना ऐकून घेणाऱ्या प्रभूला आम्ही सर्व उपासक नमस्कार करतों! तो आमची मनकामना पूर्ण करो! त्या राजाधिराज महाराजाला आम्ही प्रणिपात करतों! आम्हां सर्वांचे कल्याण होवो! आमचें साम्राज्य, भौज्य, स्वाराज्य, वैराज्य, पारमेष्ठय राज्य, माहाराज्य, अधिराज्य समुद्रापर्यंत वाढो! आमचें स्वराज्य सर्व भूमंडळावर पसरो! आम्हांला पूर्ण आयुष्य प्राप्त होवो! आणि अनंत काळपर्यंत सर्व पृथ्वीवर आमचें एकछत्री राज्य होवो!

एकदंताय विद्महे वक्रतुंडाय धीमहि । तन्नो दन्ती (दन्तिः)
प्रचोदयात् ।।

आम्हीं सर्व एकदन्ताला जाणतों. वक्रतुंडाचे आम्हीं ध्यान करतो. तो दन्ती आम्हां सर्वांना योग्य सन्मार्गानें जाण्याची प्रेरणा करो.

श्री सिद्धिविनायकाय नमः मंत्रपुष्पं समर्पयामि

असें म्हणून गंध, अक्षता व फुलें ओंजळींत घेऊन मूर्तीला वहावीं. या वेळी जमलेल्या प्रत्येक स्त्रीपुरुषानें गंध अक्षता फूल देवाला वाहून नमस्कार करावा.

**प्रार्थना**

आवाहनं व जानामि व जानामि तवार्चनम् ।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ।।१।।
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहींन सुरेश्वर ।
यत्पूजितं मया देव परिपूर्ण तदस्तु मे ।।२।।
अपराधसहस्त्राणि क्रियंतेऽहर्निश मया ।
दासोऽहमिति मां मत्वा क्षमस्व परमेश्वर,
क्षमस्व परमेश्वर, क्षमस्व परमेश्वर ।।३।।

असें म्हणून हात जोडावे.

अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारद्रव्यैः कृतपूजनेन भगवान् श्रीसिद्धिविनायकः प्रीयताम् ।

ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु । विष्णवे नमो विष्णवे नमो विष्णवे नमः ।।

असें म्हणून डाव्या हातांतील पळीनें उजव्या हातांत पाणी घेऊन ताम्हनांत सोडावें. शेवटीं तीर्थ व देवाला पूर्वी दाखविलेला नैवेद्य प्रसाद म्हणून सर्वांना वांटावा.

**उत्तरपूजा**

ही गजाननाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी करावयाची असते. हिचा त्रोटक विधि पुढीलप्रमाणे -

प्रथम ''केशवादि'' चोवीस नांवाचा उच्चार व प्राणायाम वगैरे झाल्यावर संकल्प करतांना

"तिथिर्विष्णुस्तथावारो.......श्रीसिद्धिविनायकदेवताप्रीत्यर्थं

पंचोपचारपूजनं मूर्तिविसर्जनं च करिष्ये''

असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें. व ध्यानाचा लोक म्हणून नंतर पंचोपचार पूजा करावी. म्हणजे गंध, पुष्प, धूप, दीप व नैवेद्य एवढे उपचार तत्संबंधी श्लोक म्हणून मूर्तीला वाहावे. आणि शेवटी प्रदक्षिणा, नमस्कार, आरती व मंत्रपुष्प करून "अनेन उत्तरपूजया भगवान् श्रीसिद्धिविनायकदेवता प्रीयताम्"

असें म्हणून ताम्हनांत पाणी सोडावें.

यानंतर देवापुढें नारळ किंवा सुपारी ठेवून कुटूंबांतील सर्व मंडळींनी उभें राहून सर्वांचें कल्याण करण्याविषयी देवाची प्रार्थना करावी.

नंतर ज्या जलाशयांत मूर्तीचे विसर्जन करावयाचें असेल त्या जलाशयापर्यंत मूर्ति नेण्याची व्यवस्था करून मूर्ति हालविताना पुढील श्लोक म्हणावा.

"यान्तु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् ।

इष्टकामप्रसिध्यर्थं पुनरागमनाय च ।।''

असें म्हणून मूर्तीच्या मस्तकावर अक्षता वहाव्या आणि "मंगलमूर्ति मोरया!'' असा घोष करून मूर्ति उचलून खालीं घ्यावी व जलाशयांत नेऊन विसर्जन करावी.


त्यानंतर घरी येऊन सर्वांना गूळखोब-याचा प्रसाद देऊन संतुष्ट करावें.

**शुभं भवतु.**



# श्रीगणपति उपासनेची साधने, कथा व महत्त्व

**१) तुळस :** गणपतीच्या पूजेत फक्त गणेशचतुर्थीच्या दिवशी भाद्रपद शुल्क चतुर्थीलातुळस वापरतात. इतर दिवशी गणपतीच्या पूजेत तूळस वापरायची नाही. त्याविषयीची कथा मुद्गल पुराणात आहे. धर्मध्वज नावाचा राज होता. त्याची गूणवान रूपवान मुलगी वृंदा. विष्णुशीच लग्न करण्याचा तिचा निश्चय होता. परंतु देवाशी विवाह कसा होणार? तेव्हा तिने तपश्चर्या केली तरीही विष्णु प्रसन्न झाले नाहीत. परंतु तपश्चर्या करताना तिला भागीरथी किनारी गणपतीचे दर्शन झाले. गणेशाला पाहून ती मोहित झाली. ज्याच्यापासून सर्व निर्माण होतात त्याच देवाशी विवाह करावा असे वृंदेने ठरविले. त्या वेळी गणेश ध्यान करीत होते. वृंदेने त्यांना हाताच्या आंगठीने हालविले. तेव्हा गणेशाचे ध्यान मोडले. तेव्हा त्यांनी वृंदेला विचारले, "माते, तू कोण? माझ्या तपश्चर्येचा भंग का केलास?''



त्यावर वृंदेने सारी हकीकत गणेशांना सांगितली. तेव्हा गणेश म्हणाले, "हे वृंदे, तू सकाम असा दुसरा पुरूष शोध. मी तर निष्काम आहे.'' तथापि वृंदेने आवेगाच्या भरात गणेशांना आलिगंन दिले. तेव्हा रागाच्या भरात गणेशांनी तिला शाप दिला. "हे दुर्बुद्धी स्त्रिये, तू वृक्षस्वरूप होऊन मूढ योनीत पड.'' वृंदा थरथर कापत होती. ती रडू लागली. गणेशाची तिने क्षमा मागितली तेव्हा उःशाप मिळाला, "जा वृंदे, तुला दुःख होणार नाही. एक असुर तुला पाहील व त्याच्याशी तुझा विवाह

होईल. शंभुहस्ताने तो दैत्य मरेल. त्या वेळी तू देहत्याग करशील. तू शाप दिलेला महाविष्णु शिलारूप घेईल. त्याच्यासह तुझे जीवन सुखात जाईल. तुळशीवृक्षाच्या अवतारात तुला पवित्र मानतील, तुझ्या काष्ठाच्या माळा गळयात धारण करतील. तुझी सर्वजण पूजा करतील. परंतु माझ्या पूजेत तू वर्ज्य राहशील.'' त्यानंतर वृंदेने अनेक लक्ष वर्षे तप केले. तेव्हा फक्त भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी तुळशीपत्र पूजेत स्वीकारण्यास गजानन तयार झाले.

संस्कृतात तुळसीवर इतर भाषांत तुळस म्हणून प्रसिद्ध असलेल्या हया वनस्पतीत औषधी गुणही फार मोठा असतो. काळया तुळशीच्या पानांच्या रस मण्यारीच्या विषावर उतारा म्हणून देतात. काळया तुळशीच्या पानांच्या रसात मिरपूड घालून दिल्यास विषमज्वरावर उपयोग होतो. तुळशीच्या पानांच्या रसात मध घालून दिल्यास मुलांची ओकारी थांबते. तुळशीच्या पानांचा रस विंचवाच्या दंशाचे जागी चोळतात. त्याचा उपयोग गजकर्णावर होतो. कान फुटलेला थांबण्यास तुळशीचा रस व माक्याचा रस एकत्र करून कानात घालतात. धनुर्वातावरही काळी तुळस आले, लसूण व कांदा यांचा रस एकत्र करून पोटात देतात. अंगालाही चोळतात.

**२) दूर्वा :** दूर्वा गणपतीला अत्यंत प्रिय. दूर्वेमागच्या तीन कथा उपलब्ध आहेत.

१) एकदा तिलोत्तमा नावाच्या अप्सरेचे नृत्य पाहून यमराज मोहित झाले. त्यांचे वीर्य स्खलन होऊन त्यापासून अनलासूर नावाचा राक्षस निर्माण झाला.

अनलासूर अग्नीप्रमाणे सारे जग जाळीत चालला होता. त्याच्या डोळयांतील अग्नीने सर्व पृथ्वी जळू लागली। देव भयभीत झाले. त्यांनी गणेशाचे नामस्मरण केले. तेव्हा गणेशाने बालकाचे रूप घेतले व

अनलासुरला गिळंकृत केले.

तेव्हा गजाननाच्या अंगाचा दाह सुरू झाला। इंद्रदेवाने थंडावा आणण्यासाठी त्याच्या डोक्यावर चंद्र ठेवला म्हणून भालचंद्र नाव त्याला मिळाले. परंतु दाह थांबला नाही. ब्रह्मदेवाने सिद्धी व बुद्धी या दोन मानसकन्या अर्पण केल्या. विष्णूने आपले कमळ दिले. वरूणाने थंड गार पाण्याचा अभिषेक केला. शंकराने हजार फणांचा नाग अर्पण केला. त्यामुळे पदनपाणी, व्यालबद्धोदर वगैरे नावे रूढ झाली. तरीही गजाननाच्या अंगाचा दाह कमी झाला नाही. नंतर ८८ हजार मुनींनी प्रत्येकी २१ दूर्वा गजाननाच्या मस्तकावर वाहिल्या. त्यामुळे मात्र गजाननाचा दाह शमला. म्हणून गणेशाने असा वर दिला ''यापुढे जो कोणी मला दूर्वा अर्पण करील त्याला हजारो यज्ञयाग, व्रते, दाने, तीर्थ केल्याचे पुण्य लागेल.''

२) मिथिला नगरीत उदार जनक राजा राज्य करीत होता. त्याला आपल्या दातृत्वाचा गर्व झाला. ती गोष्ट नारदाने गजाननाला सांगितली तेव्हा गजाननाने एका वृद्ध, अपंग ब्राह्मणाचे रूप घेतले व जनकाकडे जाऊन भोजन मागितले. जनकाने हजारो माणसांना पुरेल इतके अन्न तयार केले. पण गजाननाने ते सारे खाऊन टाकले. तरीही त्याची भूक भागेना. नगरातील सारे अन्न संपले. जनकाचा गर्व परिहार झाला. अखेर विरोचन व त्रिशिरा नावाच्या गणेशभक्त दांपत्याचे घरी त्यांनी अर्पण केलेली एकच दूर्वा खाऊन गजाननाची क्षुधा शमली.

३) एकदा इंद्रदेवाने कुबेराचे सारे धन तराजूच्या पारडयात घालून दुस-या पारडयात एकच दुर्वा टाकली. दूर्वेचे पारडे जड झाले. ते वरच उचलेना. शेवटी कुबेर स्वतः ऐरावतासह इंद्र, विष्णू व शंकर हे सारे जण दुस-या पारडयात बसले. तरीही दुर्वेचे पारडे जडच राहिले. देवांचा अभिमान त्यामुळे नाहीसा झाला.

दूर्वा वनस्पतीला वैद्यक शास्त्रत ''जीवनी'' असे नाव आहे. पटवर्धन सरदारांचे मूळ पुरुष हरभटबाबा यांनी दुर्वांचा रस पिऊन बारा वर्ष तपचर्या केली असे सांगतात.

हरीयाली, दूबा, ध्रो, हरियाल, या Cyno-don-doctylon या विविध नावांनी प्रसिद्ध अशा या दुर्वांचा औषधी उपयोग फार मोठा आहे. नील व वेत दूर्वा असे दोन प्रकार असतात. पत्रीत श्वेत दूर्वांचा उल्लेख आहे. उष्णतेमुळे नाकातून रक्त पडत असेल तर दुर्वांचा रस नाकात पिळतात. दुर्वांच्या मुळाचा रस व मध एकत्र करून दिल्यास उचकी थांबते. तांदुळाच्या धुवणात दूर्वा वाटून रस काढून त्यात खडीसाखर घालून दिल्यास ओकारी थांबते. दूर्वांच्या रसात तेल सिद्ध करून लावल्यास व्रण बरा होतो. दूर्वांच्या रसात तांदूळ वाटून लेप काढल्यास मस्तकरोग बरा होतो.

**३) बेल :** पृथ्वीवर गाईच्या रूपाने लक्ष्मीने अवतार घेतला। तेव्हा गोमयातून बेलाचे झाड निर्माण झाले. बिल्ववृक्ष भरभराट व भाग्यकारक समजतात. लक्ष्मी शिवाचे ध्यान करीत होती. ती शिव शिव करताना शिवमय झाली. पुढे तिचे रूपांतर झाडात झाले तोच बिल्ववृक्ष. शंकराने बिल्ववृक्षाखाली वास्तव्य केले ते लक्ष्मीच्या भक्तिभावामुळे.




बेलाच्या पानांचा गणेश पूजेतील पत्रीत समावेश होतो, तो या पावित्र्यामुळेच. गुजराथीत बिली तर मराठीत बेल प्रसिद्ध असलेल्या

बेलाचेही औषधी गुणधर्म पुष्कळ आहेत. घसा दुखण्यावर पिकलेल्या बेलफळाचा गर खावा किंवा बेलाच्या पानांचा काढा दूध घालून घ्यावा. गोमूत्रात बेलफळ वाटून ते तेलात कढवावे व कानात घालावे. त्याने बहिरटपणा कमी होतो. बेलाची पाने व गूळ यांची गोळी विषमज्वरावर गुणकारी आहे. बेलफळ फोडून पाण्यात कढवावे. त्या पाण्याने गुळण्या केल्याने आलेले तोंड बरे होते. बेलाच्या सालीचा काढा करून गुळण्या केल्यासही गुण येतो.

**४) रूई (मंदार) व शमी :** और्व नावाचा एक ऋषी होता. त्याला शमिका नावाची मुलगी होती. तिचा विवाह धौम्य ऋषीचा पुत्र मंदार याच्याशी झाला. एकदा भृशुंडी ऋषी त्यांच्या आश्रमात गेले. त्यांचे मोठे पोट व हत्तीसारखी सोंड पाहून शमिका व मंदार यांना हसू आवरेना. भृशुंडी रागावले, त्यांनी त्या दोघांना शाप दिला, ''तुम्ही दोघे वृक्ष योनीत जन्म घ्याल.'' त्या शापानुसारं त्या दोघांचे शमी व मंदार या वृक्षांत रूपांतर झाले. मंदारचा गुरू शौनक याने त्यांना मुक्त करण्यासाठी गणेशाचे तप केले. गणेश प्रसन्न झाला. भृशुंडी गणेशभक्त होता. त्याचा शाप खोटा होणार कसा ? तेव्हा गणेशाने तडजोड केली. त्याने मंदार वृक्षाच्या मुळाशी सदैव वास करण्याचे वचन देऊन शमीची पाने पूजेत वाहावीत असे सांगितले.

रूई व मंदार या एकाच जातीच्या वनस्पती. रूईबद्दल अशी कथा आहे. शंकराच्या प्राप्तीसाठी पार्वतीने १२ वर्षे निराहार राहून तप केले आणि रूईचे पान चाटून व्रताची सांगता केली. हल्लीसुद्धा कुमारिका हरतालिकेच्या दुसऱ्या दिवशी रूईचे पान चाटून उपवास सोडतात.

**५) पिंपळ :** अश्वत्थ वृक्षाची अशी कथा आहे. एकदा सर्व देव शंकराच्या भेटीला गेले. तेव्हा शंकर पार्वतीसह एकांतात होते. नारदांनी

त्या वेळी जाऊ नका असा स्पष्ट सल्ला दिला होता. तरी इंद्र हटटाने गेला होता. नारदाने इंद्राची बढाई पार्वतीला सांगितली तेव्हा पार्वतीने शाप दिला, ''तुम्ही सर्व देवांनी माझा अपमान केलात तेव्हा आपल्या पत्नीसह झाडे होऊन पडाल.'' देव पार्वतीला शरण गेले, तिने उःशाप दिला ''तुम्ही वृक्ष व्हाल. परंतु नामवंत वृक्ष व्हाल.'' त्यानुसार विष्णूचे अवत्थ वृक्षात, ब्रह्मदेवाचे पलाशात तर इंद्राचे आम्र वृक्षात रूपांतर झाले. ह्या कथेनुसार पिंपळ म्हणजे विष्णु.

ह्या पिंपळाचा औषधी उपयोग म्हणजे पिंपळसालीची राख व चुना लोण्यात खलून लावल्यास किंवा पिंपळसाल उगाळून लावल्यास खरूज बरी होते. पिंपळसाल व विटकर एकत्र उगाळून लेप लावल्यास लहान मुलांच्या अंगावरील पुटकुळया बऱ्या होतात. पिंपळाच्या लाखेचे चूर्ण तूप साखरेबरोबर घेतल्यास दमा व खोकला बरा होतो. आगीने भाजलेल्या ठिकाणी पिंपळाच्या कोरडया सालीचे चूर्ण तुपात कालवून लावावे.

गणेशपत्रीत वापरल्या जाणाऱ्या २१ पत्रीतील उरलेली पत्री म्हणजे मालतीपत्र, माका (भृंगराजपत्र), बदरीपत्र (बोरीची पाने), धत्तूरपत्र (धोतरा), अपामार्गपत्र (आघाडा) (बृहतीपत्र डोरली), करवीरपत्र (कण्हेर), अर्जुनपत्र (अर्जुन सादडा), विष्णुक्रांता, दाडिमीपत्र (डाळिंब), देवदारूपत्र (देवदार), मरूबक (मरवा), जातीपत्र (जाई), केतकीपत्र (केवडा), अगस्तीपत्र ह्यांचाही औषधी उपयोग लक्षात घेण्यासारखा आहे. त्वचारोगावर गुणकारी मधुमालती, अर्धशिशी बरा करणारा केशसंवर्धक माका, नेत्ररोग बरा करणारी बोरीची पाने व फळे, अर्धांगवायूवर बियांचे तेल उपयुक्त असणारा धोत्रा, कफज्वरावर व पोटदुखीवर औषधरूप आघाडा, गुरांस विषबाधेविरूद्ध इलाज असणारा डोरलीच्या मुळया कुटून त्यात पाणी घालून केलेला रस, बिब्बा उतरल्यास साल व पान कुटून

लेप करावयाचा अर्जुन सादडा, ताकाबरोबर जिची मुळी काविळीवर घेतात ती विष्णुक्रांता वनस्पती, पित्तावर उत्तम उपाय म्हणून खडीसाखरेबरोबर जिचा रस घेतात ती डाळिंबी, ज्वरावर उपचारभूत देवदारू, त्वचारोगावर इलाज असलेला मरवा अथवा मरूबक; कर्णशूल, जीर्णज्वरावर उपाय असलेली जाती अथवा जाई. अपस्मार, प्रेमह, कंठरोग, उष्णतेने कपाळदुखीवर इलाज असलेली केतकी अथवा केवडा, फुरशाचे विष व अर्धशिशीवर उपचारभूत अगस्त्य किंवा हादगा. या सर्व वनस्पतींचा विचार करता आपल्या शास्त्रकारांनी धार्मिक गोष्टींबरोबर आरोग्यशास्त्रची सांगड कशी घातली आहे हे समजून येते.



## सुखकर्ता दु:खहर्ता

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नांची नुरवी । पुरवी प्रेम कृपा जयांची। सर्वांगीसुंदर उटी शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।। १।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रे मनकामना पुरती ।।धृ.।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुमकुमकेशरा । हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।



जय.।। २।। लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना। संकटी पावावें निर्वाणी रक्षावें सुरवर वंदना।। जय.।। ३।।

## शेंदूर लाल चढायो

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको । दोंदिल लाल विराजे सुत गौरीहरको । हाथ लिये गुडलड्डू साई सुरवरको । महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।। १।। जय जयजी गणराज विद्या सुखदाता । धन्य तुम्हारो दर्शन मेरा मन रमता ।। धृ.।। अष्टौ सिध्दी दासी संकटको बैरी ।। विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी । कोटीसूरज प्रकाश ऐसी छबी तेरी।

गंडस्थलमदमस्तक झुले शशिबिहारी।। जय.।। २।। भावभगत से कोई शरणागत आवे । संतति संपत्ति सबही भरपुर पावे । ऐसे तुम महाराज मोको अति भावे । गोसावीनंदन निशिदिन गुण गावे ।। जय.।। ३।।

## उंदिरावरी बैसोनी

उंदिरावरी बैसोनी दुडादुडा येसी । हातीं मोदक लाडू घेउनियां खासी । भक्तांचे संकटीं धावुनि पावसी । दास विनविती तुझिया चरणासीं ।। १।। जय देव जय देव जय जय गणराजा।। सकळ देवां आधी तु देव माझा ।। जय देव. ।। धृ.।। भाद्रपदमासी होसी तू भोळा । आरक्त



पुष्पांच्या घालुनिया माळा । कपाळी लावूनि कस्तुरी टिळा । तेणें तूं दिससी सुंदर सांवळा ।। जय.।। २।। प्रदोषाचे दिवशी चंद्र शापीला । समयीं देवें मोठा आकांत केला । इंदु येवोनी चरणीं लागला । श्रीराम बहुत शाप दिधला ।। जय.।।३।। पार्वतीच्या सुता तू ये गणनाथा । नेत्र शिणले तुझी वाट पाहता ।। किती अंत पाहसी बा विघ्नहर्ता । मजला बुद्धी देई तू गणनाथा ।।४।।

## नाना परिमळ

नाना परिमळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें । लाडू मोदक अन्ने परिपूरित पात्रें । ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रे । अष्टही सिद्धी नवनिधि देसीं क्षणमात्रें ।। १ ।। जय देव जय देव जय मंगलमुर्ती ।

तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ।। धृ.।।
तुझे ध्यान निरंतर जे कोणी करीती ।
त्यांची सकलहि पापे विघ्नेही हरती ।
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती।
सर्वहि पावुनी अंती भवसागर तरती ।।
जय देव.।। २ ।। शरणांगत सर्वस्वे भजती
तव चरणी। कीर्ति तयांची राहे जोवर
शशितरणी। त्रैलोक्यी ते विजयी अद्भुत हे करणी ।
गोसवीनंदन रत नामस्मरणी ।। जय देव.।। ३ ।।



## तू सुखकर्ता तू दुःखहर्ता

तू सुखकर्ता तू दुःखहर्ता । विघ्नविनाशक मोरया संकटी
रक्षी शरण तुला मी । गणपती बाप्पा मोरया ।। धृ. ।। ।।१।
तू सकलांचा भाग्यविधाता । तू
विद्येचा स्वामीदाता । ज्ञानदीप
उजळुनी आमुच्या निववी
नैराश्याला ।।२।।



तू माता तू पिता जगी या । ज्ञाता
तू सर्वस्व जगी या । पामर मी
स्वर उणे भासती । तुझी आरती
गाया ।।३।।
मंगलमूर्ती तू गणनायक । वक्रतुंड तू सिद्धीविनायक ।
तुझिया द्वारे आज पातली । ये इच्छित मज द्याया ।।४।।

## दीनदयाळा


दीनदयाळा गणपती दयावी मज भेटी ।।
तव चरणांची सखया मजला आवडी मोठी ।। धृ.।।
कवण अपराध म्हणवुनि देवा केला रूसवा ।।
अहर्निशी मी ह्रदयी तुझा करीतसे धावा ।। दीन. ।।१।।
चिंताकूपी पडलो कोण काढिल बाहेरी ।।
धाव पावे सखया करुणा करुनि उध्दरी ।। २ ।।
ऐसे होते चित्ती तरि कां प्रथमची देवा
अंगिकार करुनी केला कृपेचा ठेवा ।।दीन. ।।३।।
आता करणे त्याग तरिही स्वामी अघटित ।।
शरण आलों माझा आतां चुकवी अनर्थ ।। दीन. ।।४।।
यादवसुतहा विनवी दोन्ही जोडुनियां कर ।।
तव चरणाचा सखया आहे आधार ।। दीन. ।।५।।

## गजानना श्रीगणराया

गजानना श्रीगणराया । आधी वंदू तुज मोरया ।।
मंगलमूर्ती श्री गणराया । आधी वंदू तुज मोरया ।।१।।
सिंदुर चर्चित, धवळे अंग । चंदन उटी खुलवी रंग ।
बघतां मानस होते दंग । जीव जडला चरणी तुझिया ।।२।।
गौरीतनया भालचंद्रा । देवा कृपेच्या तू समुद्रा ।
वरदविनायक करुणागारा । अवघी विघ्ने नेसी विलया ।।३।।

# आरती सिध्दिविनायकाची

सच्चिद्घन चिंतामणि जय जय ॐकारा ।। विष्णुमहेश्वरजनका जय विश्वाधारा ।। विद्याऽविद्यारमणा सच्चित्सुखसारा ।। स्वानन्देशा भगवन् दे चरणीं थारा ।।१।। जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती ।। तव दर्शनमात्रें हो भक्तेप्सितपूर्ती ।।धृ.।। आद्य ब्रम्हाधीशा योगिहृदारामा ।। करुणापारावारा हे मंगलधामा ।। मत्सरमुखदनुजारे परिपूरित कामा ।। स्वामिन् विघ्नाधीशा दे निजसुख आम्हां ।।२।। जय.. ।। श्रीमन्मुद्गलशुकमुख दत्तादिक योगी ।। नारायण गिरिजाधव रविमुख स्वर्भोगी ।। तैसे संतत रत तव पदकमलीं भोगी ।। भववैद्या शरणांकुशधारी भवरोगी ।।३।। जयदेव.. ।।



# श्रीसिध्दिबुध्दि - समष्टि

श्रीमद्गणेश - दक्षाऽदक्षांकीं वास ।।
त्रिनयन शशिभालत्वहि सितपीत - सुवास ।।
विद्याऽविद्या तुम्ही तत्त्वंपदभास ।।
अंकुशधारी असिपदीं गणमय करि आस ।।१।।
जयदेवि जयदेवि सिद्धिधी-माते ।।
द्वंद्वाभेदें आरति करितों तुम्हातें ।।धृ।। ।।१।।

★——★

## भूपाळी गणपतीची


उठा उठा हो सकळिक । वाचे स्मरावा गजमुख ।
ऋद्धि - सिद्धिंचा नायक । सुखदायक भक्तांसी ।
सुखदायक दासांसी ।।धृ.।।
अंगी शेंदुराची उटी । माथां शोभतसे किरीटी ।
केशर कस्तुरी लल्लाटी । हार कंठी साजिरा ।।१।।
कानी कुडंलांची प्रभा। चंद्र-सूर्ये जैसे नभा ।
माजी नागबंदशोभा । स्मरता उभा जवळी तो ।।२।।
कासे पीतांबराची धटी । हाती मोदकाची वाटी ।
रामानंद स्मरतां कंठी । तो संकटी पावतो ।

## काकड आरती

कुंकुंम मंडित दिसे उषा ही पूर्व दिशेवरती ।
उठि गणराया स्वीकारीं तूं ही काकड आरती ।।१।।



भाग्याची ही वेळ कितीतरी सुखवी सज्जनाला ।
परंतु सर्धन तुझें न होतां सौख्य कोणाला? ।।२।।
षड्विकार हे मर्दुनि त्यांचा काकडा केला ।
सत्त्वाचे मग स्नेह मिसळुनि ज्ञाने प्रज्वळिला ।।३।।
इन्द्रादिकसुरवृंद घेऊनी पूजा संभार ।
तुझ्या भेटिला होते कितीतरी उत्सुक हे फार ।।४।।



अष्टसिद्धि या सेवेलागी होती तत्पर ।
जिकडे तिकडे गजर चालला - जय मोरेश्वर ।।५।।
वासरमणि हा तुझ्या मस्तकि उधळी शेंदूर ।
रात्रीची भीषण विघ्ने गेली बहुत दूर ।।६।।
वेद राजधानींत शोभतो राजा हेंरब ।
उदय भैरवा आलाप सुचविती नवदिवसारंभ ।।७।।
शास्त्रपुराणांतरी वसे त्वच्चरित रत्नखाण ।
भेटसी चिंतामणी तिथे म्हणूनि समाधान ।।८।।
तव पादकमलीं मन हे ज्यांचे रमें एकदंत ।
तेच नरांमध्ये मला वाटते खरे भाग्यवंत ।।९।।
भक्तांचा सद्भाव पाहुनी यावे गणराज ।
धन्य धन्य तव अद्भुत महिमा जगा दिसे आज ।।१०।।
वैराग्यारुण स्वयंस्फूर्तिने देत ग्वाही सकलां ।
वृपारवि येऊन दाखविल बोधमार्ग चांगला ।।११।।



तुझ्या दर्शनी सर्वांचेही चित्त होत शांत । मोरया ।
प्रसाद द्यावा गणपतिभजका तूंच सिद्धिकांत ।।१२।।
(स्वानंदयासी अण्णासाहेब देऊळकर यांच्या संग्रहातून उद्घृत.)

## आरती श्री गणेश जी की

जय गणेश जय गणेश जय गणेश देवा ।
माता जाकी पार्वती पिता महादेवा ।।
लड्डुअन का भोग लागे सन्त करें सेवा ।। जय।।
एकदन्त दयावन्त चार भुजाधारी ।
मस्तक सिन्दूर सोहे मूसे की सवारी ।। जय।।
अन्धन को आँख देत कोढ़िन को काया ।
बाँझन को पुत्र देत निर्धन को माया ।। जय।।
हार चढ़े फूल चढ़े और चढ़े मेवा।
सूरदास शरण आयो सुफल कीजै सेवा ।। जय।।
दीनन को लाज राखो शम्भुसुत वारी ।
कामना को पूरा करो जग बलिहारी ।। जय।।

## श्री गणेश - वंदना

हे रिद्धि - सिद्धि के दाता, हम स्वागत करते हैं ।
कीर्तन में पधारो जी, हम वंदन करते हैं ।
हे रिद्धि - सिद्धि ....

सबसे पहले तुमको, जो भक्त मनाता है ।
हर काम सफल उसका, पल में हो जाता हैं ।
मन के भावों से तुम्हे, हम आज बुलाते है ।
हे रिद्धि - सिद्धि ....

शिव - गौरी के सुत को, चरणों में नमन मेरा,
हे विघ्न-विनाशक तुम, सब कष्ट हरो मेरा,
श्रद्धा के सुमन अर्पण, हम तुमको करते हैं ।
हे रिद्धि - सिद्धि ....

ये भक्त तेरा हरदम, तुम्हें प्रथम मनाता है,
हे सुख सम्पत्ति दाता, तेरा पावन नाता है,
जो शरण रहे तेरी, वो सुखमय रहता हैं ।
हे रिद्धि - सिद्धि ....

हैं सेवक भक्त तेरा, तेरी किरपा चाहता है,
जिस पर हो महर तेरी, वो मौज मनाता है,
जग के हर जन तेरे, चरणों में रहते हैं हे रिद्धि - सिद्धि
....

# लवथवती विक्राळ

लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।।
लावण्य सुंदर मस्तकी बाळा ।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।। १।।



जय देव जय देव जय
श्रीशंकरा ।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा
।।
जय देव जय देव ।।
कर्पुरगौरा भोळा नयनी
विशाळा अर्धांगी पार्वती
सुमनांच्या माळा ।।
विभुतीचे उधळण शिवकंठ
नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय.।। २।।
दैवीं दैत्यी सागरमंथन पै केलें ।
त्यामाजी अवचित हलाहल सांपडले ।।
ते त्वा असुरपणे प्राशन केलें ।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ।। जय.।। ३।।
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनीजन सुखकारी ।।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी रघुकुळटिळक रामदासा
अंतरी ।।
जय .।। ४।।

# युगे अठ्ठावीस

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।। पुडलिंकाचे भेटी परब्रम्ह आलें गा । चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।। जय देव जय देव जय पांडुरंगा ।। रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ।।धृ.।।

तुळसीमाळा गळां कर ठेऊनि कटी ।। कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटी ।। देव सुरवर नित्य येती भेटी ।। गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।। जय.।। २।।



धन्य वेणूनाद अणुक्षेत्र पाळा ।। सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।। राई रखुमाबाई राणीया सकळा ।। ओवाळीती राजा विठोबा सावळा ।। जय.।। ३।।

धन्य पुष्पावती भीमासंगम ।। धन्य वेणूनाद उभे परब्रम्ह । धन्य पुंडलीक भक्त निर्वाण ।। यात्रेसी येती साधु सज्जन ।। जय.।। ४।।

ओंवाळू आरत्या कुरवंड्या येती । चंद्रभागेमाजी सोडुनिया देती ।। दिंड्या पताका वैष्णव नाचती ।। पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय.।। ५।।

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।। चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती ।। दर्शनहेळामात्रे तयां होय मुक्ती ।। केशवासी नामदेव भावें ओवाळीती ।। जय.।। ६।।

# येई हो विठ्ठले

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।।
निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ।।धृ.।।
आलिया गेलिया हातीं धाडी निरोप ।।
पंढरपूरी आहे माझा मायबाप ।। येई.।। १।।
पिवळा पीतांबर कैसा गगनी झळकला ।।
गरुडावरी बैसून माझा कैवारी आला ।। येई.।। २।।
विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिपवाळी ।।
विष्णुदास नामा जीवेंभावे ओंवाळी ।। येई.।। ३।।

# दुर्गे दुर्गट भारी

दुर्गे दुर्गट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।। वारीं वारीं जन्ममरणाते वारीं । हारी पडलों आतां संकट निवारी ।।१।।



जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी । सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ।।धृ.।।

त्रिभुवनीं भुवनी पाहता तुज ऐसी नाही । चारी श्रमले परंतु न बोलावे कांही । साही विवाद करिता पडलें प्रवाही । ते तू भक्तालागी पावसि लवलाही ।।२।।
प्रसन्न वदनें प्रसन्न होसी निजदासां । क्लेशापासूनि सोडी तोडी भवपाशा । अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा।।३।।

# महालक्ष्मीची आरती

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी । वससी व्यापकरुपें तू स्थूलसूक्ष्मीं ।।धृ.।।

करविरपुरवासिनी सुरवरमुनिमाता । पुरहरवरदायिनी मुरहरप्रियकांता । कमलाकारें जठरी जन्मविला धाता । सहस्त्रवदनी भूधर न पुरे गुण गातां ।। १।।

मातुलिंग गदायुत खेटक रविकिरणी । झळके हाटकवाटी पीयुषरसपाणी ।। माणिकरसना सुरंगवसना मृगनयनी । शशिधरवदना, राजस मदनाची जननी ।। २।।



तारा शक्ती अगम्या शिवभजकां गौरी । सांख्य म्हणती प्रकृति निर्गुण निर्धारी।। गायत्री निजबीजा निगमागम सारी । प्रकटे पद्मावती निजधर्माचारी ।। ३।।

अमृतभरिते सरितें अघदुरितें वारीं ।। मारी दुर्घट असुरां भवदुस्तर तारी ।। वारीं मायापटल प्रणमत परिवारी । हें रूप चिद्रुप तद्रुप दावी निर्धारी ।। ४।।

चतुराननें कुश्चितकर्माच्या ओळी। लिहिल्या असतील माते माझे निजभाळी ।। पुसोनि चरणातळी पदसुमने क्षाळी। मुक्तेश्वर नागर क्षीरसागरबाळी ।। ५।।

# नवरात्रीची आरती

आश्विनशुध्दपक्षी अंबा बैसली सिंहासनी हो ।। प्रतिपदेपासुन घटस्थापना ती करुनि हो। मूलमंत्रजप करुनी भोवतें रक्षक ठेऊनि हो ।। ब्रह्माविष्णुरुद्र आईचे पूजन करिती हो ।।१।। उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।। उदोकारे गर्जती काय महिमा वर्णु तिचा हो ।।धृ.।।



द्वितियेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनी हो। सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो । कस्तुरीमळवट भांगी शेंदुर भरुनी हो ।। उदोकारें गर्जती सकळ चामुंडा मिळुनी हो ।।उदो.।। २।। तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो । मळवट पातळ चोळी कंठी हार मुक्ताफळा हो । कंठीची पदके कांसे पितांबर पिवळा हो ।। अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो ।।उदो.।।३।। चतुर्थीच्या दिवशी विश्वव्यापक जननी हो ।। उपासकां पाहसी अंबे प्रसन्न अंतःकरणी हो । पूर्ण कृपे पाहसी जगन्माते मनमोहिनी हो । भक्तांच्या माउली सुर ते येती लोटांगणी हो ।।उदो.।।४।। पंचमीचे दिवशी व्रत तें उपांगललिता हो । अर्ध्यपाद्यपूजने तुजला भवानी स्तविती हो ।। रात्रीचे समयी करिती जागरण हरिकथा हो । आनंदे प्रेम आले सद्भावे क्रिडता हो ।।उदो.।।५।। षष्टीचे दिवशी भक्ता आनंद वर्तला हो । घेउनि दिवटया हस्ती हर्षे गोंधळ घातला हो । कवडी एक अर्पिता देशी हार मुक्ताफलांचा हो।। जोगवा मागतां प्रसन्न

झाली भक्तवृ़ळा हो ।।उदो.।।६।। सप्तमीचे दिवशी सप्तश्रृंगगडावरी हो ।। तेथे तु नांदसी भोवती पुष्पे नानापरी हो। जाईजुईशेवंती पूजा रेखियली बरवी हो ।। भक्तसंकटी पडता झेलुनि घेसी वरचे वरी हो ।।उदो.।।७।। अष्टमीचे दिवशी अष्टभुजां नारायणी हो ।। सह्याद्रिपर्वती पाहिली उभी जगज्जननी हो ।। मन माझें मोहिले शरण आलो तुजलागुनी हो । स्तनपान देऊनि सुखी वे़ले अंतःकरणी हो ।।उदो.।।८।। नवमीचे दिवशी नवदिवसांचे पारणे हो ।। सप्तशतीजप होम हवनें सद्भक्ती करुनी हो ।। षड्रस अन्न नैवेद्यासी अर्पियली भोजनी हो।। आचार्यब्राम्हणां तृप्त वे़ले वृ़पेंकरुनी हो ।।उदो.।।९।। दशमीच्या दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो ।। सिंहारुढे दारूण शस्त्रे अंबे त्वा घेउनी हो ।। शुंभनिशुंभादिक राक्षसा किती मारिसी रणी हो ।। विप्रा रामदासा आश्रय दिधला तो चरणी हो ।।उदो.।।१०।।

## संतोषी मातेची आरती

मैं तो आरती उतारुं रे संतोषी माता की
जय जय संतोषी माता जय जय मां
बडी ममता है बडा प्यार मां की आंखो में
मां की आंखो में
बडी करुणा माया दुलार मां की आंखो में
मां की आंखो में
क्यू न देखू मै बारबार मां की आंखो में

दिखें हर घडी नया चमत्कार मां की आंखो में
नृत्य करुं छुम छुम झम झमा झम झुम झुम
झांकी निहारुं रे ओ प्यारी, झांकी निहारुं रे
सदा होती है जय जयकार मां के मंदिर में
मां के मंदिर में
नित्त झांझर की होए झनकार मां के मंदिर में
मां के मंदिर में
सदा मंजीरे करते पुकार मां के मंदिर में
दिखें हर घडी नया चमत्कार मां के मंदिर में
दीप धरुं धूम करुं प्रेम सहित भक्ती करुं जीवन सुधारुं रे
आ प्यारा प्यारा जीवन सुधारूं रे
मैं तो आरती उतारुं रे संतोषी माता की
जय जय संतोषी माता जय जय मां

## हरितालिकेची आरती

जय देवी हरतालिके ।। सखी पार्वती अंबिके ।। आरती ओवाळीते ज्ञानदीपकळिके ।।धृ.।।
हरअर्धांगी वससी ।। जासी यज्ञा माहेरासी ।। तेथें अपमान पावसी ।। यज्ञकुंडी गुप्त होसी ।।१।।
रिघसी हिमाद्रिच्या पोटीं ।। कन्या होसीं तूं गोमटी ।। उग्र तपश्चर्या मोठी ।। आचरसी उठाउठी ।। जय.।।२।।
तपचांग्नासाधनें ।। धूम्रपानें अधोवदने ।। केली बहु उपोषणें ।। शंभु भ्रताराकारणे ।। जय.।।३।।

लीला दाखविसी दृष्टी ।। हे व्रत करिसी लोकीं साठी ।।
पुन्हा वरिसी धूर्जटी ।। मज रक्षावें संकटी ।। जय.।।४।।
काय वर्णू तव गुण अल्पमती नारायण ।। माते दाखवी
चरण ।। चुकवावे जन्ममरण ।। जय.।।५।।

## मंगळागौरीची आरती

जयदेवी मंगळागौरी ।। ओंवाळीतें सोनियाताटीं ।।
रत्नांचे दिवे माणिकांच्या वाती ।। हीरेया मोती ज्योति
।।धृ।।
मंगलमूर्ती उपजली काया ।। प्रसन्न झाली अल्पायुषी राया
।। तिष्ठली राजबाळी । अयोपण द्यावया ।।जय।। १।।
पूजेला ग आणिती जाईजुईच्या कळ्या ।। सोळा तिकटी
सोळा परिची पत्री ।। जाई जुई अबुल्या ।। शेवंती
नागचापे ।। पारिजातके मनोहरे ।। गोकर्ण
महापुलें। नंदेटे तगरें ।। पूजेला ग आणिली ।।जय।। २।।
साळीचे तांदुळ मुगाची डाळ ।। आळणी खिचडी रांधिती
नार ।। आपल्या पतीलागी ।। सेवा करिती फार ।।जय।।
३।।
डुमडुम डुमडुम वाजंत्रे वाजती ।। कळावीं कांकणे हाती
शोभती ।। शोभती बाजुबंद ।। कानी कापांचे गवें ।।
ल्यायिली अंबाबाई शोभे ।।जय।। ४।।
न्हाऊनी माखुनी मौनी बैसली । पाटवाची चोळी क्षीरोदक
नेसली ।। स्वच्छ बहुत होऊनी ।। अंबा पूजू बैसली
।।जय।। ५।।

सोनियाचे ताटी घातिल्या पंचारती ।। मध्ये उजळती कपुराच्या वाती ।। करा धूप दीप ।। आतां नैवेद्य षड्रस पक्वान्ने ।। तार्टी भरा बोनें ।।जय।। ६।।

लवलाहें तिघे काशी निघाली ।। माउली मंगळागौरी भिजवूं विसरली ।। मागुती परतुनियां आली ।। अंबा स्वयंभू देखिली ।। देउळ सोनियाचें ।। खांब हिरेयांचे ।। वरती कळस मोतियांचा ।।जय।। ७।।

## श्री शांतादुर्गादेवीची आरती

जय जय दुर्गे माते शांते विच्छक्ते ।। पंचारती ओवाळूं तव पदि कुळनाथे ।।धृ.।।

स्वेच्छें ब्रह्म तूं स्फुरसी प्रगटशी मूळमाये ।। विधि हरिहर हीं बाळे निर्मुन भुवना ये ।।
उत्पत्तिरक्षणप्रळया निरउनि सम पाये ।।
प्रवृतिपुरूषात्मक तूं वर्तसि इह न्याये ।।जय।। १।।

ब्रह्मभूवना निजवासा भक्तांस्तव त्यजुनि ।।
शुंभानिशुंभादिक हे दानव संहरूनी।।
क्रीडसी सर्वाभ्यंतरी तुरिये उन्मनी ।। अपार तव गुण किती हे वर्णू मी लघुवंदनी ।। जय।।

देवी शांतादुर्गा ऐशा अभिमानी ।। केळोसीपूर येथें प्रसन्न राहोनी निजद्विज भजकां
स्मरणी रक्षिसी धांवोनी ।। अनुचर मंगेशात्मज अनन्य तव चरणीं ।।३।।

## श्री कृष्णाची आरती

ओंवाळूं आरती मदनगोपाळा। श्यामसुंदर गळा वैजयंतीमाळा।।धृ।।

चरणकमल ज्याचे अति सुकुमार। ध्वजवज्रांकुश ब्रीदाचे तोडर।। ओंवाळूं।।१।।

नाभिकमल ज्याचें ब्रह्मयाचें स्थान। हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन।। ओवाळूं।।२।।

मुखकमल पाहतां सुखाचिया कोटी। वेधलें मानस हारपली दृष्टी। ओवाळूं।।३।।

जडित मुगुट ज्याचा देदीप्यमान। तेणें तेजें कोंदले अवघें त्रिभुवन।। ओंवाळूं।।४।।

एकाजनार्दनीं देखियलें रुप। रुप पाहतां जाहलें अवघे तद्रूप। ओंवाळूं।।५।।

## मारुतीची आरती

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं। करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं। कडाडिलें ब्रह्मांड धाके त्रिभुवनिं। सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी।।१।। जय देव जय देव जय श्रीहनुमंता। तुमचेनी प्रसादें न भी कृतांता।।धृ।।



दुमदुमलें पाताळ उठिला प्रतिशब्द। थरथरला धरणीधर मानिला खेद। कडकडिले पर्वत उड्डुगण उच्छेद । रामीं रामदासा शक्तीचा शोध।।२।।

# दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ।।
सुरवर मुनिजन योगी समाधी नये ध्याना ।।१।।
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ।।
आरति ओवाळिता हरली भवचिंता।।धृ.।।



सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त ।।
अभाग्यासी कैसी कळेल ही मात ।।
पराही परतली तेथे कैंचा हा हेत ।।
जन्म - मरणाचा पुरलासे अंत ।। २।।
दत्त येऊनियां उभा ठाकला ।।
सद साष्टांगेसी प्रणिपात केला ।।
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला ।।
जन्म - मरणाचा फेरा चुकविला ।।३।।
दत्त दत्त ऐसें लागले ध्यान।।
हारपले मन झाले उन्मन ।।
मी-तू पणाची झाली बोळवण ।।
एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ।।४।।

## प्रदक्षिणा आरती

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची। झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची।।धृ०।।

पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी। सवादि तीर्थे घडलीं आम्हां आदिकरुनि काशी।।१।।

मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती। नामा संकीर्तनें ब्रह्मानंदे नाचती।।२।।

कोटि ब्रह्महत्या हरिती करिता दंडवत। लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत।।३।।

गुरु भजनाचा महिमा न कळे अगमानिगमासी। अनुभव ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवासी ।।४।।

प्रदिक्षिणा करुनि देह भावे वाहिला। श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला।।५।।

## दशावताराची आरती

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रम्ह ।। भक्तसंकटी नाना स्वरूपीं स्थापिसी स्वधर्म ।।धृ.।। अंबऋषिकारणे गर्भवास सोशीसी ।। वेद नेले चोरूनि ब्रह्मा आणुनिया देसी ।। मत्स्यरूपी नारायण सप्तहि सागर धुंडीसी । हस्त तुझा लागतां शंखासुरा वर देसी ।।आरती.।।१।। रसातळाशी जातां पृथ्वी पाठीवर घेसी ।। परोपकारासाठी देवा कांसव झालासी ।। दाढें धरूनी पृथ्वी नेता वराहरूपी होसी ।। प्रल्हादाकारणे स्तंभी नरहरि गुरगुरसी।।आरती. ।।२।। पांचवे अवतारी बळिच्या द्वाराला जासी ।। भिक्षे

स्थळ मागुनी बळिला पाताळी नेसी ।। सर्व समर्पण केले म्हणुनि प्रसन्न त्या होसी ।। वामनरुप धरूनी बळिच्या द्वारी तिष्ठसी ।।आरती.।।३।। सहस्त्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ।। कष्टीं ते रेणुका म्हणुनी सहस्त्रार्जुन वधिला । निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।। सहावा अवतार परशुराम प्रगटला ।।आरती.।।४।। मातला रावण सर्वां उपद्रव केला ।। तेहतीस कोटी देव बंदी हरलें सीतेला ।। पितृवचनालागीं रामें वनवास केला ।। मिळवुनी वानरसेना राजाराम प्रगटला ।।आरती.।।५।। देवकीवसुदेव बंदीमोचन त्वां केले ।। नंदाघरी जाऊन निजसुख गोवुळा दिधले ।। गोरसचोरी करितां नवलक्ष गोपाळ मिळविले ।। गोपिकांचे प्रेम पाहूनी श्रीवृष्ण भुलले ।।आरती.।।६।। बौद्ध कलंकी कलियुगि अर्धम हा अवघा ।। सोडुनी दिधला धर्म म्हणूनी न दिससी देवा ।। म्लेंच्छमर्दन करिसी म्हणुनी कलंकी केशवा ।। बहिरवि जान्हवि द्यावि निजसुखानंदसेवा ।।आरती.।।७।।

## ओम् जगदीश हरे

ओम् जय जगदीश हरे स्वामी जय जगदीश हरे । भक्तजनों के संकट क्षण में दूर करें ।। ओम्.।।धृ.।।

जो ध्यावे फल पावे दुख विनसे मनका । सुख संपत्ति घर आवें कष्ट मिटे तनका ।। ओम्.।।१।। माता पिता तुम मेरे शरण पडूं मैं किसकी । तुम बिन और न दुजा आस करू किसकी । ओम्.।।२।। तुम हो पूरण-परमात्मा तुम

अंतर्यामी। पारब्रह्म परमेश्वर तुम सेबवेः स्वामी ।।
ओम्.।।३।। तुम करुणा वेः सागर तुम पालन कर्ता मैं



मूरख खल कामी वृःपा करो
भरता।। ओम्.।।४।। तुम हो
एक अगोचर सबवेः प्राणपती
स्वामी किस विधि मिलू
दयामय तुझको मै वुःमती ।।
ओम्.।।५।। दीनबंधू सुखहर्ता
तुम रक्षक मेरे । अपने हात
उठाओं शरण पडा तेरे ।।
ओम्.।।६।। विषय विकार मिटाओ पाप हरो देवा श्रद्धा
भक्ति बढाओ संतन की सेवा ।। ओम्. ।। ७।।

## श्रीसत्यनारायणाचीआरती

जय जय दीनदायाळा सत्यनारायण देवा ।।
पंचारति ओंवाळूं श्रीपति तुज भक्तीभावा।।धृ.।।
विधियुक्त पुजुनी करिती पुराण श्रवण ।
परिमळद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ।।
घृतयुक्तशर्वःरामिश्रित गोधूमचूर्ण ।।
प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तूं नारायण ।। जय ।।१।।
शतानंदे विप्रे पूर्वी व्रत हें आचरिलें ।।
दरिद्र दवडुनी अंती त्याते मोक्षपदा नेलें ।
त्यापासुनि हें व्रत या कलियुगीं सकळां श्रुत झालें ।।
भावार्थे पूजितां सर्वां इच्छित लाधलें ।। जय ।।२।।

साधुवैश्यें संततिसाठी तुजला प्रार्थियलें ।।
इच्छित पुरतां मदांध होउनि व्रत न
आचरिले ।।
त्या पापानें संकटी पडुनि दु:खहि भोगीलें ।।
स्मृति होउनि आचरितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें
।। जय ।।३।।
प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ।।
क्षोभ तुझा होतांचि तयाचि नौका बुडाली ।।
अंगध्वजरायासी यापरी दु:खस्थिति आली ।।
मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णी परिसली ।। जय ।।४।।
पुनरपि पुजुनी प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ।।
पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ।।
अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनी ।।
ऐसा भक्ता संकटी पावसि तू चक्रपाणी ।। जय ।।५।।
अनन्यभावें पुजुनि हें व्रत जे जन आचरती ।।
इच्छित पुरविसी त्यांते देऊनि संतती संपत्ती ।।
संहरती भय दुरितें सर्वाहि बंधनें तुटतीं ।।
राजा रंक समान मानुनि पावसि श्रीपती ।। जय ।।६।।
ऐसा तव व्रत महिमा अपार वर्णू मी कैसा ।।
भक्ति पूर:सर आचरती त्या पावसि जगदीशा ।।
भक्तांचा कनवाळू कल्पद्रुम तूं सर्वेशा ।
मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवि तुवपाशा ।।
जय जय दीनदायाळा सत्यनारायण देवा ।।
पंचारति ओंवाळूं श्रीपति तुज भक्तीभावा।। ७।।

## विडा

विडा घ्या हो नारायण । वृष्णा जनज्जीवना । विनविते रखुमाई । दासी होईन मी कान्हा ।।धृ.।।

वासना फोडूनियां । चूर्ण केली सुपारी ।। भावार्थ कापुराने । घोलियेली निर्धारीं ।।१।।

शांति हे नागवेल । पाने घेऊनियां करीं ।। मीपणा जाळूनियां ।। चुना लाविला वरी ।।२।।

विवेक हा कात रंग । रंगी रंगला सुरंग। वैराग्य जायफळ मेळविलें सकळ।।३।।

दया हे जायपत्रीं । क्षमा लवंग आणिल्या । सुबुद्धी वेलदोडे । शिवरामी अर्पियले ।।४।।

## खंडोबाची आरती

पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा ।। खंडामंडित दंडित दानव अवलीळा ।। मणिमल्लां मर्दुनियां जों धूसुर पिवळा ।। हिरे कंकण बासिंगे सुमनांच्या माळा ।।१।।

जय देव जय देव जय शिव मल्हारी ।। वारीं दुर्जनअसुरा भवदुस्तर तारीं ।। धृ.।। सुरवरसंवर वर दे मजलागी देवा ।। नाना नामे गाईन ही तुमची सेवा ।। अघटित गुण गावया वाटतसे हेवा ।। फणिवर शिणला किती नर पामर केवा ।। २।।

रघुवीरस्मरणी शंकर हृदयीं निवाला ।। तो हा मल्लांतक अवतार झाला ।। यालागीं आवडे भाव वर्णीला । रामी रामदासा जिवलग भेटला ।। ३।।

# शनिदेवाची आरती

जय जय शनिदेवा ।। पद्मकर शिरी ठेवा ।।
आरती ओवाळीतो ।। मनोभावे करूनी सेवा ।। धृ.।।
सूर्यसुता शनिमूर्ती ।। तुझी अगाध कीर्ती ।।
एकमुखे काय वर्णू ।। शेषा न
चले स्फूर्ती ।। जय।।१।।
नवग्रहांमाजी श्रेष्ठ ।। पराक्रम
थोर तुझा ।।
ज्यावरी तूं कृपा करसी ।।
होय रंकाचा राज ।।
जय।।२।।



विक्रमासारिखा हो ।।
शककर्ता पुण्यराशी ।।
गर्व धरितां शिक्षा केली ।।
बहु छळियेले त्यासी ।।३।।
शंकराच्या वरदाने ।। गर्व रावणें केला ।।
साडेसाती येतां त्यासी।। समूळ नाशासी नेला ।।
जय।। ४।।
प्रत्यक्ष गुरूनाथा ।। चमत्कारं दावियेला ।।
नेऊनी शूळापासी । पुन्हा सन्मान केला ।। जय।। ५।।
ऐसे गुण किती गाउं ।। धणी न पुर गातां ।।
कृपा करी दीनावरी ।। महाराज समर्था ।। जय।। ६।।
दोन्ही कर जोडोनियां ।। रूक्मां लीन सदा पायी ।।
प्रसाद हाचि मागे ।। उदयमाल सौख्य दावी ।। जय।। ७।।

# संताच्या आरत्या

## संत तुकाराम



आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरूधामा ।।
सच्चिदानंदमूर्ती ।। पाय दाखवी आम्हां ।
आरती तुकारामा।। धृ.।।
राघवें सागरांत ।। पाषाण तारिले ।। तैसे हे
तुकोबाचें ।। अभंग उदकीं रक्षिले ।।
आरती।।१।।
तुकि ना तुलनेसी ।। ब्रह्म तुकासी आलें ।। म्हणोनि
रामेश्वरें चरणी मस्तक ठेंविलें ।। आरती।।२।।

## संत ज्ञानेश्र्वर

आरती ज्ञानराजा ।। महाकैवल्यतेजा ।।
सेविती साधुसंत ।। मनु वेधला माझा ।।धृ.।।
लोपले ज्ञान जगीं ।। हित नेणती कोणी ।।



अवतार पांडुरंग ।। नाम ठेविलें ज्ञनी
।।आरती.।।१।। कनकाचें ताट करी ।।
उभ्या गोपिका नारी ।।
नारद तुंबरु हो ।। साम गायन करी
।।आरती.।।२।।
प्रकट गुह्य बोले ।। विश्व ब्रह्मची केले ।।
राम जनार्दनी ।। पायी मस्तक ठेविले
।।आरती.।।३।।

## साईबाबा आरती

आरती साईबाबा ।। सौख्यदातारा जीवा चरणरजतळीं ।। द्यावा दासां विसावां, भक्तां विसावा ।।धृ.।। जाळुनियां अनंग ।। स्वरुपी राहे दंग ।। मुमुक्षु जनां दावी ।। निजडोळा श्रीरंग ।।डोळा.।।१।। जया मनीं जैसा भाव ।। तया तैसा अनुभव ।। दाविसी दयाघना ।। ऐंसी तुझी ही माव ।।तु.।।आ.।।२।। तुमचें नाम ध्यातां ।। हरे संसृतिव्यथा ।। अगाध तव करणी ।। मार्ग दाविसी अनाथा ।।दा.।।आ.।।३।। कलियुगी अवतार ।।



सगुणब्रह्म साचार ।। अवतीर्ण झालासे ।। स्वामी दत्त दिगंबर ।।द.।।आ.।।४।। आठा दिवसां गुरुवारी ।। भक्त करिती वारी ।। प्रभुपद पहावया ।। भवभय निवारी ।।भ.।।आ.।।५।। माझा निज द्रव्य ठेवा ।। तव चरणरजसेवा ।। मागणें हेंचि आतां ।। तुम्हा देवाधिदेवा ।।दे.।।आ.।।६।। इच्छित दीन चातक निर्मळ तोय ।। निजसुख पाजावें माधवा या ।। सांभाळ आपुली भाक ।।भा.।।आ.।।७।।

## अक्कलकोट स्वामींची आरती

जय देव जय देव जय श्रीस्वामीसमर्था । आरती ओवाळूं चरणीं ठेवुनियां माथां ।।धृ.।। छेलीं-खेडेग्रामीं, तू अवतरलासी । जगदुद्धारासाठीं राया तू फिरसी ।। भक्तवत्सल खरा तू एक होसी ।। म्हणुनि शरण आलों, तुझे चरणांसी ।।जय.।।१।। त्रैगुण-परब्रह्म तुझा अवतार । त्याची काय

वर्णू लीला पामर । शेषादिक शिणले, नलगें त्या पार ।। तेथें



जडमूढ कसा करुं मी विस्तार ।।जय.।।२।। देवादी देव तू स्वामीराया ।। निर्जर मुनिजन ध्याती भावें तव पाया ।। तुजसी अर्पण केली आपुली ही काया ।। शरणागता तारीं तूं स्वामीराया ।।जय.।।३।। अघटित लीला करूनि जडमूढ उद्धरिले ।। कीर्ती ऐकुनि कानीं चरणीं मी लोळे । चरणप्रसाद मोठा मज हें अनुभवलें । तुझ्या सुता नलगे चरणा वेगळें ।। जय.।।४।।

## गजाननमहाराजांचीआरती



जय जय सत्‌चित्‌स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासीभूवर जड-मुढ ताराय ।।
जयदेव जयदेव. ।।धृ.।।
निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापून उरलें जें या जगतासी।
तें तूं तत्व खरोखर निःसंशय अससी ।
लीलामात्रें धरीलें मानचदेहासी ।।
जयदेव जयदेव. ।।१।।
होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा ।
करुनी 'गणि गण गणांत बोते' या
भजना। धाता हरिहर गुरूवर तूंचि सुखसदना । जिकडें पहावें तिकडें तूं दिससी नयना।। जयदेव जयदेव. ।।२।।

लीला अनंत केल्या बंकटसदनास । पेटविलें त्या अग्नीवांचूनि चिलमेस । क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस । केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ।। जयदेव जयदेव. ।।३।।

व्याधी वारुन केलें कैकां संपन्न । करविलें भक्तांलागीं विठ्ठल -दर्शन । भवसिंधू हा तरण्या नौका तवं चरण । स्वामी दासगणूचे मान्य करा कवन ।। जयदेव जयदेव. ।।४।।

## कापुर आरती


कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेंद्रहारं।
सदा वसंतं ह्रदयारविंदे भवं भवानीसहितं नमामि।।
चंद्रादित्यौ च धरणी विद्युदग्निस्तथैव च।
त्वमेव सर्वं ज्योतीषिं आर्तिक्य प्रतिगृह्यताम्।।
——देवतायै नमः।।
महानीरांजनदीपं कर्पुरार्तिक्यं च समर्पयामि।।
(——या ठिकाणी ज्या देवाची अगर देवतेची पुजा असेल ते नाव घ्यावे।।)

## कर्पूरारती

कापुराची वात ओवाळूं तुजला। देहभाव अहंकार सहज जाळिला ।।१।।
दया क्षमा शांति उजळिल्या ज्योती।। स्वयंप्रकाशरुप देखिली मूर्ती।।२।।
मीतूंपण काजळ काजली गेली।। निजानंद तनु पायीं ओवाळीली।।३।।
आनंदाने भावें कर्पुरारती केली। पंचतत्व भाव तनु पायी अर्पिली।।४।।

# निरोप गीत

जाहलें भजन आम्ही नमितों तव चरणां, नमितो तव चरणां
। वारूनिया विघ्नें देवा रक्षावे दीना ।।धृ.।।
दास तुझे आम्ही देवा तुजलाची ध्यातों, देवा तुजलाची
ध्यातों । प्रेमें करूनियां देवा गुण तुझे गातो ।।१।।
तरी न्यावी सिद्धि देवा हेचि वासना, देवा हेचि वासना ।।
रक्षूनियां सर्वां द्यावी आम्हांसी आज्ञा ।।२।।
मागणें तें देवा आतां एकची आहे, आता एकची आहे ।।
तारूनियां सकळां आम्हां कृपादृष्टी पाहें ।।३।।
जेव्हां सर्व आम्ही मिळू ऐशा या ठाया, ऐशा या ठाया।
प्रेमानंदे लागूं तुझी किर्ती गावया ।।४।।
सदां ऐशी भक्ती राहो आमुच्या मनीं, आमुच्या मनीं ।
हेची देवा तुम्हां असे नित्य विनवणी ।।५।।
वारूनियां संकटें आतां आमुची सारीं, आता आमुची
सारी ।। कृपेची साऊली देवा दीनावारिक करी ।।
जाहले ।।६।।
निरंतर आमुचीं चिंता तुम्हां असावी, चिंता तुम्हा
असावी ।। सर्वांची लज्जा देवा तुम्ही रक्षावी ।।
जाहले.।। ७ ।।
निरोप घेतो आता आम्हां आज्ञा असावी ।। चुकलें
आमचें काहीं त्याची क्षमा असावीं ।। जाहलें ।।८।।




## घालीन लोटांगण

घालीन लोटांगण, वंदीन चरण ।। डोळ्यांनि पाहिन रूप तुझें ।। प्रेमें आलिंगिन आनंदे पूजिन, भावें ओवाळिन म्हणे नामा ।।१।। त्वमेव माता पिता त्वमेव, त्वमेव बंन्धुश्र्च सखा त्वमेव ।। त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यियात्मना वा प्रवृगतिस्वभावात् ।। करोमि यद्यत् सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ।। अच्युतं वेगशवं राम नारायणं वृग्ष्णदामोदरं वासुदेवं हरि। श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायवंग रामचंद्र भजे ।।४।। हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।।

हरे वृग्ष्ण हरे वृग्ष्ण वूग्ष्ण वूग्ष्ण हरे हरे ।। ५।।

## करुणाश्लोक

मोरया मोरया मी बाळ तान्हे । तुझीच सेवा करूं काय जाणे ।। अन्याय माझे कोटयानुकोटी । मोरेश्वरा बा तुं घाल पोटी । वृग्पा।।१।।



(सर्वसाधारणपाणे ह्या पहिल्या दोन ओळीच म्हटल्या जातात। भक्तांच्या माहितीसाठी उर्वरित भाग येथे दिलेला आहे।) पिता माता बंधु तुजविण असे कोण मजला । बहु मी अन्यायी परि सकलही लाज तुजला । न जाणे मी काही जप तप पुजा साधन विधि

। कृपादृष्टी पाहे शरण तुला आलो गणपती । कृपा।।२।। वळेना ही जिव्हा धड मज तुझे नामहि न ये । धरावे त्वां हातीं अभयवरदां पूर्ण अभयें ।। अनाथांच्या नाथा झडकरी आस पुरती कृपा ।।३।। भुकेलो केव्हांचा हदय निष्ठुर न करी झणी । प्रसादाचा लाडू कवळ बरवा घाल वदनीं ।सदा ब्रम्हानंदे मग तुजपुढें नाचत प्रिती । कृपा ।।४।। बहू बोलूं काही परम सुखदा मंगल निधी । मला तारी आता अति कठिण संसारजलनिधि । स्वभावें गोसावीसुत करितसे हेचि विनंती। कृपा।। ५।।

## ।।मंत्र पुष्पांजली।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।। तेहनावंक महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः।। ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय महयं, कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति, साम्राज्यं, भौज्य, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं । समंतपर्याई स्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति ।। तदप्येषश्लोको भिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे ।। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

(ॐ यज्ञेन यज्ञमजयन्त... वगैरेपासून ॐ राजाधिराज... सभासद इतिपर्यंतचे मंत्र मंत्रपुष्पांजली म्हणून बहुतेक

सर्वजण मोठया आवाजात म्हणतात. परंतु त्यांचा अर्थ सगळयांना माहीत असतोच असे नाही. म्हणून पं. चित्रावशास्त्री यांच्या अर्थाच्या आधारे ओवाबद्ध रूपांतर - यज्ञेन यज्ञ ही ऋचा ऋग्वेदाच्या १० मंडळांतील ९० व्या सूक्तातील १५ वी ऋचा आहे. तर ॐ राजाधिराजाय वगैरे प्रार्थना ऐतरेय ब्राह्मण (८.१५.२१) या ग्रंथातील आहे.)

## मंत्रपुष्पांजलीचा भावार्थ

देव यज्ञानेच यज्ञाची पूजा करित असत. यज्ञ हाच प्रमुख धर्मविधि मानला जात होता. यज्ञ करूनच देव मोठे झाले, देवपदी पोहोचले आणि दु:ख, क्लेश, चिंतारहित अशा स्वर्गाला जाऊन पोहोचले. सर्वैश्वर्यसंपन्न सामर्थ्यवान असा जो वैश्रवण नावाचा कुबेर त्याला आम्ही नमस्कार करतो. तो सर्वांची इच्छांची पूर्ती करणारा कुबेर माझ्या सर्व आशा - आकांक्षा पूर्ण करो, मला निरंतर कल्याण प्राप्त होवो. आमचा सर्व सामर्थ्यवान सार्वभौम राज साम्राज्य, भोजराज्य, स्वराज्य, विस्तीर्ण प्रदेशात पसरलेले असे अत्यंत श्रेष्ठ महाराज्य, अधिराज्य, ही सर्व जगाच्या अंतापर्यंत सातसमुद्रासह पृथ्वीच्या सम्राटपदी राहून भूषवो.

नंतर पुढील श्लोकही म्हटलेला आहे.

(अविक्षीत नावाच्या कुळात जन्मलेल्या आणि मरूताच्या घरी वास्तव्य करणा-या देवांचे तसेच समस्त मरूद्गणांचेही सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत.

समुद्रवलंयांकित पृथ्वीचे राज्य आपल्याला मिळावे, म्हणजेच आपले राष्ट्र सर्व जग व्यापणारे व्हावे, अशी युयूत्सु मनःकामना बाळगणाऱ्या आपल्या पूर्वजांच्या राष्ट्रीय मनोभूमिकेचे दर्शन आपणास या मंत्रपुष्पांजलीमधून होते.

## पसायदान

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावे । तोषोनिं मज द्यावें । पसायदान हें ।।१।। जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परे जडों । मैत्र जीवाचें ।।२।। दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्य पाहो । जो जें वांछील तो ते लाहो । प्राणि जात ।।३।। वर्षत सकळ मंगळी । ईश्वर - निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळी । भेटो तयां भूतां ।।४।। चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणींचें गाव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे



।।५।। चंद्रमे जे अलाच्छन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।। किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी । भजिजो आदिपुरुषी । अखंडित ।।७।। आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयोंहो आवे गा ।।८।। येथ म्हणे श्री विश्वेश्वर रावो। हा होईल दान पसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।

## SUKHKARTA DUKHHARTA

Sukhkarta Dukhharta Varta Vighnachi |
Nurvi Purvi Prem Krupa Jayachi |
Sarvangi Sundar Uti Shendurachi |
Kanthi Zalke Mala Muktaphalanchi ||1||
Jai Dev Jai Dev Jai Mangalmurti |
Darshanmatre Mankamana Purti |
Ratnakhachit Fara Tuj Gaurikumra |
Chandnachi Uti Kumkumkeshara |
Hirejadit Mukut Shobhato Bara |
Runzunti Nupure Charni Ghagriya
||2||



Lambodar Pitambar Phaniwarbandhana |
Saral Sond Vakratund Trinayana |
Das Ramacha Vat Pahe Sadna |
Sankashti Pawawe Nirwani Rakshave Survar vandana
|| Jai ||3||

## TU SUKHKARTA TU DUKAHARTA



Vighnavinashak morya sankati rakshi Sharan tula mi |Ganpati bappa morya || Tu Saklancha bhagya vidhata | Tu vidyecha swamidata |Dnyana deep ujaluni Amuchya Nlwawi Nairashala ||2|| Tu mata tu pita jagi ya | dnyana to sarvasva jagi ya | Pamar mi swar une bhasati Tuzi aarati Gaya || Mangal Murti tu gananayak | Varkratund tu siddivinayak Tuziya dware Aaj Patalo | Ye Icchit maj dhaya ||

## NANAPARIMAL

Nanaparimal Durvan Shendur Shamipatre Ladu Modak Anne Paripurit Patre | Aei Se Poojan Kelya Bijaksharmantre | Ashtahi Siddi Navnidhi Desi Kshanamatre || Jai Dev||1|| Jai Dev Jai Dev Jai Mangalmurti | Tuze Gun Varnaya Maj Kaychi Sphurti || Tuze Dhyan Nirantar Je Koni Karati | Tynachi Sakalhi Pape Vighnehi Harti | Vaji Varan Shibika Sevak Sut Yuvati | Sarvahi Pawati Anti Bhavsagar Tarati || Jai Dev ||2||

Sharangat Sarvasve Bhajati Tav Charani | Kirti Jayanchi Rahe Jovar Shashitarani | Trailoki Te Vijayi Adbhut He Karani | Gosavinandan Rat Namsamrni | Jai Dev Jai Dev ||

## LAVTHAVATI VIKRALA

Lavthavati Vikrala Bramhandi Mala |Vishe Kanth Kala Trinetri Jwala || Lawanya Sundar Mastaki Bala | Tethuniya Jal Nirmal Vahe Zulzula ||1|| Jai Dev Jai Dev Jai Shree Shankara Aarati Owalu Tuj Karpurgaura || Karpurgaura Bhola Nayani Vishala Ardhangi Parvati Sumananchya Mala | Vibhutiche Udhalan Shivkanth Nila | Aisa Shankar Shobhe Umavelhala || Jai Dev || Deivi Deityi Sagarmanthan Pai kele | Tyamaji Awachit Halahal Sapadle || Te Twa asurpane Prashan kele | Nilkant nam Prasidha Zale || Jai Dev || Vyaghrambar phanivardhar Sundar Madnari | Panchanan Manmohan Munijan Sukhkari | Shatkotiche Bij Vache Uchchari | Raghukultila Ramdasa Antri || Jai Dev ||

## DURGE DURGHAT BHARI

Durge Durghat Bhari Tujvin Sansari | Anathnathe Ambe Karuna Vistari || Vari Vari Janmamarnate Vari | Hari Padlo Aata Sankat Nivari ||1|| Jai Devi Jai Devi Jai Mahishasurmardini | Survarishwarde Tarak Sanjivani || Tribhuvani Bhuvani Pahta Tuj Aeisi Nahi | Chari Shramale Parantu Na Bolave Kahi | Sahi Vivad Karita Padle Pravahi| Te TU Bhaktalgai Pavsi Lavlahi ||2||Prassana Vadne Parassana Hosi Nijdasa | Kleshapasun Sodi Todi Bhavpasha Ambe Tuj Wachun Koan Purvil Aasha Narhari Tallin Zala Padpankajlesha ||3||

## YUGE ATTHAVIS

Yuge Atthavis Vithwari Ubha || Vamangi Rakhumai Dise Divya Shobha || Pundalikache Bheti Parbramha Aale ga || Charni Vahe Bhima Udhhari Jaga ||1|| Jai Dev Jai Dev Jai Panduranga || Rakhumai Vallabha Pave Jiwalaga || Tulasimala Gala kar theuni kati || Kanse Pitambar kasturi Lallati || Dev Survar Nitya yeti Bheti || Garud Hanumant Pudhe Ubhe Rahati || Jai ||2|| Dhanya Venunad Anukshetra Pala || Suvarnachi Kamale Vanamala Gala || Rai Rakhumabai Raniya Sakala || Owaliti Raja Vithoba Sawala || Jai ||3|| Owalu Aaratya Kurwandya Yeta || Chandrabhagemaji Soduniya Deti || Dindya Pataka Vaishnaw Nachati || Pandharicha Mahima Varnawa kiti || Jai || Aashadhi Kartiki Bhaktajan Yeti || Chandrabhagemadhye Snan Je karthi || Darshanhelamatre Taya hoya Mukti || Keshvasi Namdev Bhave Owalati || Jai ||

## YEL HO VITTHALE

Yei ho Vitthale Maze Mauli ye ||
Nidhalavari Kar Theuni Vat Mi Pahe ||
Aaliya Geliya Hati Dhadi Nirop ||
Pandharpuri Aahe Maza Maybap || yei ||1||
Piwala Pitambar Kaisa Gagani Zalakala ||
Garudavari Baisun Maza Kaiwari Aala || yei ||2||
Vithobache Rajya Aamha Nitya Dipwali ||
Vishnudas Namjivebhave Owali || yei hi ||

## OM JAI JAGDISH HARE

Om Jai Jagdish Hare Swami Jai Jagdish Hare | Bhakta Janonke Sankat Dasjano Ke Sankat Kshan Me Dur Kare || To Ghyave Phal Pave Dukh Vinase Manka | Sukh Sampatti Ghar Aave, Kashta Mite Tanka || Om ||1|| Tum Bin Aur Na Duja | Prabhu Bina Aur Na Duja Aas Karu Kisaki | Tum Puran Parmatma Tum Antaryami | Swami Tum Antaryami | Parbramha Parmehwar Tum Sevak – Swami || Om ||2|| Tum Karunake Sagar Tum Palan Karta | Swami Tum Palan Karta | Maie Murakh Phalkami Mai Sevak Tum Swami | Krupa Karo Swami | Vishayvikar Mitao Pap Haro Deva | Swami Pap Haro Deva | Shraddha Bhakti Badhao Santanki Seva ||Om ||3|| Tanman-Dhan Hai Tera Swami Sabkuchh Hai Tera | Tera Tuzako Arpan Kya Lage Mera || Om || Dinabandhu Dukhaharta Thakur Tum Mere || Swami Rakshak Tum Mere | Apane Hath Uthao Apni Sharan Bithao Dwar Khada Tere || Om ||4||

## NIROP GEET

Jahale Bhajah Aamhi Namito Taw Charana, Namito Taw Charana | Waruniya Vighne Deva Rakshave Dina || Das Tuze Aamhi Deva Tujlachi Dhyato, Deva TUjlachi Dhyato | Preme Karuniya Deva Gun Tuze Gato ||1|| Tari Nyavi Siddi Deva Hechi Vasana, Deva hechi Vasana || Rakshuniya Sarwa Dyavi Aamhasi Aadnya ||2|| Magane Te Deva Aata Eakachi Aahe, Aata Eakachi Aahe || Taruniya Sakala Aamha krupadrushti Pahe ||3|| Jenvha Sarva Aamhi Milu Aeisha ya thaya, Aeisha ya thaya | Premanande Lagu Tuzi Kirti Gawaya ||4|| Sada Aeisi Bhakti Raho Aamuchya Mani, Aamuchya Mani | Hechi Deva Tumha Ase Nitya Vinawani ||5|| Varuniya Sankate Aata Aamuchi Sari, Aata Aamuchi Sari || Krupechi Sauli Deva Dinawar Kari || Jahale || Nirantar Aamuchi Chinta Tumha Asavi Deva Tumha Asavi || Sarvanchi Lajja Deva Tumhi Rakshavai || Jahale || Nirop Gheto Aata Aadnya Asavi ||Chukale Aamuche Kahi Tyachi kshama Asavi

|| Jahale||

## GHALIN LOTANGAN

Ghalin Lotangan, Vandin Charan || Dolyani Pahin Roop Tuze || Preme Aalingan Aanande Poojin, Bhave Owalin Mhane Nama|| Twamew Mata Pita Twamew, twamew Bhandusakha Twamwe Twamew Vidya Drawinam Twamew Sarwam Mam Dev Dev||2|| Kayen Wacha Manasendriyeirwa Buddyatamana Wa Prakrutiswabhawat || Karoni yadyat Sakalm Parasmai Narayanayeti Samarpayami || Achyutam Keshwam Ramnarayanam krushnadamodaram Vasudevam Hari || Shridharam Madhavam Gopikawallabham Jankinayakam Ramchandra Bhaje || Hari Ram Hare Ram Ram Ram Hare Hare || Hare Krushna Hare Krushna Krushna krushna Hare hare ||5||

## ।।प्रार्थना।।

प्रारंभी विनती करूं गणपति विद्या दयासागरा । अज्ञानत्व हरूनि बुद्धि मति दे आराध्य मोरेश्वरा ।।१।। चिंता क्लेश समस्त दुःख अवघे देशांतरा पाठवी हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवी ।।२।। नेत्रीं दोन हिरे प्रकाश पसरे अत्यंत ते साजिरे माथां सेंदूर पाझरे वरि बरे दूर्वांकुरांचे तुरे माझें चित्त विरे मनोरथ पुरे देखोनि चिंता हरे। गोसावीसुत वासुदेव कवि रे त्या मोरयाला स्मरे ।।३।।

संकष्टनाशनं महागणपतीस्तोत्रम्

## नारद उवाच

श्री गणेशाय नमः ।।


प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् । भक्तावासं स्मरेनित्यमायुः कामार्थसिध्दये ।।१।। प्रथमं वक्रतुण्डं च एकदन्तं द्वितीयकम् । तृतीयं कृष्णपिंगाक्षे गजवक्त्रं चतुर्थकम ।।२।। लम्बोदरं पंचमं च पष्ठं विकटमेव च । सप्तमं विघ्नराजेंन्द्रं च दशमं तु विनायकम् । एकादशं गणपतिं द्वादशंतु गजाननम ।।४।। द्वादशैतानि नामानि त्रिसैध्यं यः पठेन्नरः न च विघ्नभयं तस्य सर्वसिध्दीकर प्रभो ।।५।। विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम् । पुत्रार्थी लभते पुत्रान मोक्षार्थी लभते गतिम् ।।६।। जपेदणपतिस्तोत्रं षड्भिर्मासै फलं लभेत् । संवत्सरेण सिध्दीं च लभते नात्र संशयः ।।७।। अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत तस्य विद्या भवेत्सवी गणेशस्य प्रसादतः ।।८।। इति श्री नारदविरचितं श्री गणपतिस्तोत्र संपूर्णम् ।

## मागणे

तुज मागतो मी आता । मज द्यावे एकदंता ।।१।।
तुझे ठायी माझी भक्ति । विरूढायी गणपति ।।२।।
तुझे ठायी ज्याचि प्रीती । त्याची घडावी संगति ।।३।।
धरणीधरा ऐसे द्यावे । सर्वांभूती लीन व्हावे ।।४।।
तुज शरण शरण । आलो पतित मी जाण ।।१।।
तुझा अपराधी मी खरा । आहे इक्षुचापधरा ।।२।।
माझी येउ द करूणा । तुजलागी गजानना ।।३।।
धरणीधरा तुजवीण ।। दासा नाही दुजेपणा ।।४।।
नाम घ्या रे मोरयाचे । तरी सार्थक जीवाचे ।।१।।
कलीयुगी नामविण । अन्य उपाय नसे जाण ।।२।।
नामे बहुत तरले । पुन्हा जन्मासी न आले ।।३।।
धरणीधरा मज द्यावे । नित्य नामचि वदवावे ।।४।।

## गणपतीचे श्लोक


घोर हा नको फार कष्टलो ।। निजहितास मी व्यर्थ गुंतलो ।। वारि शीघ्र संसारयातना ।। हे दयानिधे गजानना ।।१।। विषय गोड हे लागले मला ।। यामुळे असे घात आपुला ।। कळुनिया असे भ्रांति जाइना ।। हे दयानिधे गजानना ।।२।। त्रिविध ताप हा जाळितो अती ।। काम क्रोध हे जाण पीडिती ।। चित्त सर्वथा स्वस्थ राहिना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।३।। स्त्रीधनादि हे आठवे



मनी ।। छंद हाचि रे दिवसयामिनी ।। विसरलो तुला दीनपालना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।४।। माउली पिता बंधु सोयरा ।। तूचि आमुचा निश्चये खरा ।। शरण तूचि मी विघ्नभंजना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।५।। म्हणवितो तुझा दास या जनी ।। सकळ व्यापका जाणशी मनी ।। भुक्ति मुक्ति दे भक्तपालना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।६।। काय काय रे साधने करू




।। मी असे तुझे मूर्ख लेकरू ।। विटंबिती मला द्वैतभावना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।७।। विषयचिंतने शोक पावलो ।। देहबुद्धिनें व्यर्थ नाडलो ।। भालचंद्रजी तोडी बंधता ।। हे दयानिधे श्री गजानना ।।८।। गजमुखा तुझी वाट पाहता ।। नेत्र शीणले जाण तत्त्वतां ।। भेटसी कधी भ्रमनिवारणा ।। हे दयानिधे श्री गजानना ।।९।। प्रभु समर्थ तू आमचे शिरी ।। वेष्टिलो असे विषय पामरी ।। नवल हेचि रे वाटते मना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१०।। अगुण अद्वया तू परात्परा ।। पार नेणवे विधि हरी हरां ।। अचल निर्मळा नित्य निर्गुणा ।। हे दयानिधे श्री गजानना ।।११।।



जीवन व्यर्थ हे तूज वेगळे ।। स्वहित आपुले काय साधिले ।। सुख नसे सदा मोहयातना ।। हे दयानिधे श्री गजानना

।।१२।। फारसे मला बोलता न ये ।। पाउले तुझी देखिली स्वये ।। मांडिली असे बहुत वल्गना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१३।। दीनबंधू हे ब्रीद आपुले ।। साच तू करी दावि पाउले ।। मंगलालया विश्वजीवना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१४।। नाशिवंत रे सर्व संपदा ।। हे नको मला पाव एकदा ।। क्षेम देऊनी चित्तरंजना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१५।। जातसे घडी पळ युगापरी ।। लागली तुझी खंति अंतरी ।। स्वामि आपुला विरह साहिना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१६।। कळेल ते करी विनवणे किती ।। तारि अथवा मारि गणपती ।। सकलदोष संकष्टनाशना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१७।। आवडे मला त्रिभुवनाकृती ।। पूजुनी बरी करिन आरती ।। धाव पाव रे मोदकाशना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१८।। हृदय कठिण तू न करि सर्वथा ।। अंत आमुचा बघसि पूरता ।। सिद्धिवल्लभा मुषकवाहना ।। हे दयानिधे श्री गजानना ।।१९।। कल्पवृक्ष तू कामधेनु वा ।। लाविजें स्तनी जींविच्या जिवा ।। हाचि हेत रे शेषभूषणा ।। हे दयानिधे श्री गजानना ।।२०।। तारि मोरया दु:खसागरी ।। गोसाविनंदन प्रार्थना करी ।। आत्मया मनी जाण चिद्धना ।। हे दयानिधे गजानना ।।२१।।





# गणेशमंत्र

१) गँ ।
२) श्री महागणपति - मूलमंत्रः ॐ ।।
३) श्री महागणपति - प्रणव - मूलमंत्रः ॐ गँ ॐ ।।
४) ॐ गँ गणपतये नमः ।।
५) ॐ नमो भगवते गजाननाय ।।
६) श्रीगणेशाय नमः ।।
७) ॐ श्रीगणेशाय नमः ।।
८) वक्रतुण्डाय हुम् ।।
९) ॐ ऱ्हीं श्रीं क्लीं ग्लैं गः श्रीमन्महागणाधिपतये नमः ।।
१०) ऱ्हीं श्रीं क्लीं ग्लैं वरदमूर्तये नमः ।।
११) ॐ ऱ्हीं श्री क्लीं नमो भगवते गजाननाय ।
१२) ऱ्हीं श्रीं क्लीं नमो गणेश्वराय ब्रम्हारूपाय चारवे । सर्वसिद्धीप्रदेयाय ब्रह्मणस्पतये नमः ।।
१३) बीजाय भालचंद्राय गणेशपरमात्मने । प्रणतक्लेशनाशाय हेरम्बाय नमो नमः ।।
१४) आपदामपहर्तारं दातारं सुखसम्पदाम् । क्षिप्रप्रसादनं देवं भूयो भूयो नमाम्यहम् ।।
१५) नमो गणपते तुभ्यं हेरंबायैकदन्तिने । स्वानन्दवासिने तुभ्यं ब्रह्मस्पतये नमः ।।
१६) श्री गजानन जय गजानन ।।
१७) श्री गजानन जय गजानन जय जय गजानन ।।
१८) शुक्लांबरधरं देवं शशिसूर्यनिभाननम् ।
प्रसन्नवदनं ध्यायेत्सर्वविघ्नोपशान्तये ।।
१९) नमस्तमै गणेशाय ब्रह्मविद्याप्रदायिने । यस्यागस्त्यायते

नाम विघ्नसागरशोषणे ।।
२०) क्रों ऱ्हीं गं ऱ्हीं गणपतये नमः ।।
२१) ॐ वक्रतुण्डाय नमः ।
२२) महाकर्णाय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दंती प्रचोदयात् ।
२३) पद्भ्रूप्रणिहित्तं लक्ष्मीं लभन्तें भक्तकोटयः ।स्वतंत्रमेकं नेतारं विघ्नराजं नमाम्यहम् ।।
२४) ॐ श्रीं ऱ्हीं क्लीं ग्लै गँ गणपतये । वर वरद सर्वजनं मे वशमानय स्वाहा ।।
२५) ऱ्हीं गं ऱ्हीं महागणपतेय स्वाहा ।।
२६) ॐ ऱ्हीं गं ऱ्हीं वशमानय स्वाहा ।।
२७) ॐ गँ नमः ।
२८) गँ क्षिप्रप्रसादनाय नमः ।।
२९) ग्लम् ।।
३०) ग्लीम् ।।
३१) रायस्पोषस्य दाता निधिदाता अन्नदो मतः । रक्षोहणो बलगहनो वक्रतुण्डाय हुम् ।।
३२) एकदन्ताय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।
३३) हरिः ॐ मर्कटं मर्कटाय ईशानं ईशाय गजमुखाय ।। मम गृहे ऋद्धिं सिद्धिं लक्ष्मीं लक्ष्मीं । प्राप्तिं कुरू कुरू फट् स्वाहा ।।
३४) ॐ श्री गँ सौम्याय गणपतये वर वरद । सर्वजनं में वश मानय स्वाहा ।। (श्री लक्ष्मीविनायक प्रसन्न)

# मंत्राच्या जाती

**मं**त्र तीन प्रकारचे असतात. बीजमंत्र, मूळमंत्र व मालामंत्र ऐं हा बीजमंत्र आहे. ऋग्वेदाच्या आरंभीचा ''अग्निमीळे'' तील, ''अ'' यजुर्वेदाच्या प्रारंभीचा इषेत्वामधील, ''इ'' सामवेदातील अग्न आयाहितील ''अ'' व अथवर्णातील ''शं'' मधील अनुस्वार याप्रमाणे अ + इ +अ + अनुस्वार ह्यातून ''ऐं'' हे बीज तयार झाल. या ॐ ई क्लीं ब्लूं असे चार बीजमंत्र वेदात सांगितले आहेत. बाकीचे बीजमंत्र उपनिषदांत आहेत. अथवर्ण वेदात अनेक बीजमंत्र व मूलमंत्र आहेत.

निरनिराळे बीजमंत्र निरनिराळया देवतांचे साध्यमंत्र असतात गँ - गणेशाचा, ऱ्हीं - मायेचा, श्री - लक्ष्मींचा, क्लीं - कालींचा, हुं - दुर्गेचा, हूँ - एकाक्षरीचा व धूं - धूमावती हा बीजमंत्र आहे. ''हुं फट्'' यांच्या योगे मंत्राचे रक्षण होते. ''स्वाहा'', ''स्वधा'' व पल्लव होत. मंत्राच्या शेवटी ''वष्ट्'' पद असले तर वश्यता सिद्धी होते, तर ''फट्'' हे पद असले तर शत्रूचे उच्चाटन होत, ''हुं'' बीज द्वेष दाखविणारे, ''खे'' बीज मारण प्रयोगात, ''स्वाहा'' संतुष्टता संपादनासाठी ''नमः'', पद्पुष्टी संपादनासाठी व ''वौषट्'' संपत्ती मिळण्याकरिता मंत्राचे शेवटी योजतात.

**वषट् वश्ये फडुच्चाटे द्रं द्वेषे खे च मारणे।**
**स्वाहा तुष्टयै नमः पुष्टयै वौषट् संपत्तिहेतवे।।**

मंत्रयोगाची १६ अंगे - १ भक्ति, शुद्धि, आसन, पंचांगसेवन, आचार, धारणा दिवादेश, प्रायश्चित, मुद्रा तर्पण हवन, बलि याग, जप, ध्यान व समाधि. मंत्राच्या जाती - सौरमंत्र पुल्लिंगी, सोममंत्र स्त्रीलिंगी तर दोन्हींचे समवायाने नपुंसक मंत्र. हुंफट् शेवटी असणारे पुमान् मंत्र - हे वश्यकर्म, उच्चाटन, रोधन कर्मात वापरतात. ''स्वाहा स्वधा'' शेवटी असलेले स्त्रीमंत्र त्यांचा उपयोग रोगशांतीसाठी तर नमः शेवटी असलेले

नपुंसक मंत्र त्यांचा उपयोग अभिचार कर्मात होतो.

मंत्रातील अक्षरसंख्येप्रमाणे बीज, पिंड व कर्तरी असे दुसरे तीन भेद आहेत. बाल्यावस्थेत बीजमंत्र, तारूण्यात पिंडमंत्र, कर्तरिमंत्र अगर मूलामंत्राचे पुरश्चरण करावे. वृद्धावस्थेत मालामंत्राचा जप करावा. १० अक्षरांपर्यत म्हणजे दशार्ण हे मंत्र, मूलमंत्र किंवा बीजमंत्र, २० अक्षरांचे पिंडमंत्र किंवा कर्तरिमंत्र, २० पेक्षा अधिक अक्षरे असलेले ते मालामंत्र होत.

ऱ्हीं बीज ब्राह्मणांसाठी, श्री क्षत्रियांसाठी, क्लीं वैश्यांसाठी, तर ऐं बीजाचा शूद्रांसाठी उपयोग करावा असे मंत्रशास्त्रत सांगितले आहे. चतुर्बीजरहित मंत्रांना पौलस्त्य मंत्र म्हणतात.

**१) क् + ल् + ई + म् - क्लीं - कामबीज.**
**२) क + र + ई + म् - योगबीज क्लीं.**
**३) अ + ए + मकार - गुरूबीज ऐं.**
**४) हकार + रकार + ईकार + मकार तेजोबीज ऱ्हीं.**
**५) शकार + रकार + ईकार + मकार शांतिबीज.**
**६) हकार + लकार + ईकार + मकार + रक्षाबीज ऱ्हीं.**

### गायत्री मंत्राविषयी आपण सर्वच जण जाणतो. पण गणेश गायत्री मंत्र फार कमी प्रमाणात प्रचलित आहेत. ते पुढिलप्रमाणे :

१) लम्बोदराय विद्यहे । महोदयाच धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।
२) महोत्कटाय विद्यहे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।
३) एकदन्ताय विद्यहे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।

४) करटाय विद्महे । हस्तिमुखाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।
५) तत्पुरूषाय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि । तन्नो दन्ती प्रचोदयात् ।।

★——★


**श्री गणेश प्रार्थना पुढीलप्रमाणे :-**
**यद् भुप्रणिहितां लक्ष्मी लभन्ते भक्तकोटच ।**
**स्वतन्त्रमेकं नेतारं विघ्नराजं नम्याभ्यहम् ।।**

★——★

**संकटनिवारक प्रार्थना :-**

ॐ ऱ्हीं ग्लैं गँ गणपतये वरवरद सर्वजनं में वशमानय स्वाहा ।।

**आपण ओंकार हा गणेशस्वरूपच मानतो.** ॐकाराचे स्वरूप पाहता ॐकाराचा पहिला भाग म्हणजे गणेशाचे उदर, मधला भाग म्हणजे दण्ड किंवा सोंड, वरचा अर्धचंद्राकृती भाग म्हणजे गणेशाचा एकदन्त तर अनुस्वार म्हणजे मोदक तसेच ओम् मधला ओ लुप्त स्वरासारखा उच्चारावा. हा लुप्त स्वर म्हणजे श्री गणेशाचे वाहन मूषक.



**घरातील गणेशप्रतिमा कशी असावी याविषयी एक श्लोक आहे.**

**''अंगुष्ठपर्वादारभ्य वितस्तिं यावदेत तु । गृहषु प्रतिमा कार्यानाधिका शस्यते बुधै :।''**

पायाच्या अंगठ्यापासून जास्तीत जास्त नऊ इंच उंचीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करावी. याहून जास्त उंचीची मूर्ती नको.

## महाराष्ट्रातील अष्टविनायक

१) मोरगावचा श्री मयुरेश्वर
२) सिध्दटेक येथील श्रीसिद्धीविनायक
३) चाली येथील श्री बल्लाळेश्वर
४) महड येथील श्री वरदविनायक
५) थेऊर येथील श्रीचिंतामणी
६) लेण्याद्री येथील श्रीगिरिजात्मक
७) ओझर येथील श्री विघ्नेश्वर
८) रांजनगांव येथील श्रीगणपती

**अष्टविनायकांचे वर्णन करणारा श्लोक पुढीलप्रमाणे :-**

स्वति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिध्दीदम् ।
बल्लाळं मुरूंड विनायकमह्वढं चिंतामणि स्थेवरम् ।
लेण्याद्री गिरीजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरम् ।
ग्रामे रांजणसंस्थितो गणपतिः कुर्यात सदा मंगलम् ।।



# लहान स्तोत्रे

## द्वादशज्योतिर्लिंङ्गानि

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालमोकारममलेश्र्वरम्।।१।।
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशङ्करम्। सेतुबंधेतू रामेशं नागेशं दारुकावने।।२।।
वाराणस्यां तु विश्र्वेशं त्र्यंबक गौतमीतटे। हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये।।३।।
एतानि ज्योर्तिलिङ्गानि सायंप्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति।।४।।
इति द्वादशज्योतिर्लिङ्गानि।।

★—— ★

## श्री शंकरस्तोत्र

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचंद्रावतंसम्
रत्नाकल्पोज्वलाङ्गं परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम्।
पद्मासीनं समन्तात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृति वसानम्
विश्र्वाद्यं विश्र्ववंद्यं निखिलभयहरं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रम्।।

★—— ★

## एकश्लोकी रामायण

आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं काञ्चनम।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणम्।
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लङ्कापुरीदाहनम्।
पश्याद्रावणकुम्भकर्णहननं एताध्दि रामायणम्।।१।।

★—— ★

# एकश्लोकी भागवत

आदौ देवकिदेविगर्भजननं गोपीगृहे वर्धनम्।
मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोध्दारणम्।
कंसच्छेदनकौरवादिहननं कुंतितनूजावनम्।
एतद्भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम्।।१।।

★—— ★

# एकश्लोकी मल्हारीमाहात्म्य

पूर्वं धर्मसुतास्तपोवनगता मल्लेन संतर्जिता।
जिष्णुंविष्णुमतीत्य शंभुमभजन् तेनावतीर्य क्षितौ।
तत्रोल्कामुखमुख्यदैत्यनिवहं हत्त्वामणिं मल्लकं।
देवः प्रेमपुरेऽर्थीतोऽवतु वसन् लिंग द्वयात्माऽर्थदः।।१।।

★—— ★



# श्रीदेवीस्तोत्र

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम्।।

# श्री गणपती अथर्वशीर्ष

।। गणेशाय नमः।।


शांतिपाठ

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः। भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः। व्यशेम देवहितं यदायुः ।।१।।
ॐ स्वस्ति न इन्द्रो वृध्दाश्रवाः। स्वस्ति न पूषा विश्र्ववेदाः।
स्वस्तिनस्ताक्ष्यो अरिष्यनेमिः। स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु।।२।।
ॐ शांतिः । शांतिः ।। शांतिः।।

## अथ श्रीगणेशाथर्वशीर्ष व्याख्यास्याम।।

ॐ नमस्ते गणपतये ।। त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमासि ।। त्वमेव केवलं कर्ताऽसि ।। त्वमेव केवलं धर्ताऽसि ।। त्वमेव केवलं हर्तासि ।। त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि ।। त्वं साक्षादात्माऽसि नित्यंम् ।।१।। ऋतं वच्मि ।। सत्यं वच्मि ।।२।। अव त्वं मां ।। अव वक्तारम् ।। अव श्रोतारं ।। अव दातारम् ।। अव धातारं ।। अवानूचानमव शिष्यम् ।। अव पश्चात्तात् ।। अव पुरस्तात् ।। अवोत्तरात्तात् ।। अव दक्षिणात्तात् ।। अवचोर्ध्वात्तात् ।। अवाधरात्तात् ।। सर्वतो मां पाहि पाहि समंतात् ।।३।। त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मयः ।। त्वमानंदमयस्त्वं ब्रह्ममयः ।। त्वं सच्चिदानंदाद्वितीयोऽसि ।। त्वं प्रत्यक्षं ब्रह्मासि ।। त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि ।।४।। सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति ।। सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति ।। सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।। त्वं

भूमिरापोऽनलोऽनिलो नभः।। त्वं चत्वारि वाक्पदानि ।।५।। त्वं गुणत्रयातीतः त्वंमवस्थात्रयातीतः ।। त्वं देहत्रयातीतः ।। त्वं कालयत्रातीतः ।। त्वं मूलाधारास्थिताऽसि नित्यम् ।। त्वं शक्तित्रयात्मकः ।। त्वां योगिनो ध्यायंति नित्यम् ।। त्वं ब्रह्मास्त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वं इन्द्रस्त्वं अग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुवःस्वरोम् ।।६।। गणादिं पूर्व मुच्चार्यवर्णादिं तदनंतरम् ।। अनुस्वारः परतरः ।।



अर्धेन्दुलसितं ।। तारेण ऋद्धं ।। एतत्तव मनुस्वरूपम् ।। गकारः पूर्वरूपं ।। अकारो मध्यमरूपम् ।। अनुस्वारश्चांत्यरूपं ।। बिन्दुरुत्तररूपम् ।। नादः संधानं ।। संहिता संधिः ।। सैषा गणेशविद्या ।। गणकऋषिः निचृद्गागायत्रीच्छंदः ।। गणपतिर्देवता ।। ॐ गं गणपतये नमः ।।७।। एकदंताय विघ्नहे ।। वक्रतुण्डाय धीमहि ।। तन्नो दंतिः प्रचोदयात् ।।८।। एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणाम् ।। रदं च वरदं हस्तैर्बिभ्राणं मूषकध्वजम् ।। रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम् ।। रक्तगंधानुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपूजितम् ।। भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम् ।। आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृतेः पुरुषात्परम् । एवं ध्यायति यो नित्यं सयोगी योगिनां वरः ।।९।। नमोव्रातपतये। नमो गणपतये। नमः प्रमथपतये नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय । विघ्ननाशिने शिवसुताय । श्रीवरदमूर्तये नमो नमः।।१०।।

## ।।फलश्रुती।।

एतदथर्वशीर्षं योऽधीते ।। स ब्रह्मभूयाय कल्पते ।। स सर्वतः सुखमेधते ।। स सर्वविघ्नैर्नबाध्यते ।। स पंचमहापापात्प्रमुच्यते ।। सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति ।। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति ।। सायंप्रातः प्रयुंजानो अपापो भवति । सर्वत्राधीनोपविघ्नो भवति ।। धर्मार्थकाममोक्षं च विंदति । इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम् ।। यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति।। सहस्रावर्तनात् यं यं काममधीते तं तमनेन साधयेत् ।।११। अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति ।। चतुर्थ्यामनश्नञ् जपति स विद्यावान् भवति।। इत्यथर्वणवाक्यं ।। ब्रह्मद्यावरणं विद्यात् न बिभेति कदाचनेति ।।१२।। यो दूर्वांकुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति ।। यो लाजैर्यजति स यशोवान् भवति ।। स मेधावान् भवति ।। यो मोदकसहस्रेण यजति स वाञ्छितफलमवाप्नोति ।। यः साज्यसमिद्भिर्यजति स सर्वं लभते स सर्वं लभते ।।१३।। अष्टौ ब्राह्मणान् सम्यग्ग्राहयित्वा सूर्यवर्चस्वी भवति ।। सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ वा जप्त्वा सिद्धमंत्रो भवति ।। महाविघ्नात्प्रमुच्यते ।। महादोषात्प्रमुच्यते ।। महापापात् प्रमुच्यते ।। स सर्वविद्भवति स सर्वविद्भवति ।। य एवं वेद इत्युपनिषत्।।१४।।

ॐ सहनाववतु ।। सहनौभुनक्तु।। सहवीर्यं करवावहै।।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै।।
ॐ शान्तिः। शान्तिः। शान्तिः।


(२१ आवर्तनांचा अभिषेक, ४४१ आवर्तनांचे एक मंडळ, १९७४८१ चे एक महामंडळ होते.)

# गणपतीची गाणी

प्रख्यात दिवगंत कवियत्री शांता शेळके यांच्या लेखणीतून
साकार झालेली आणि अनेक श्रोत्यांच्या कानांना सुखावणारी
कर्णमधूर गणपतीची गाणी येथे संकलित केलेली आहेत.
गणेशोत्सवाच्या काळात ही कर्णमधूर भावपूर्ण गाणी वातावरणात
भक्तिभाव जागृत करतात.

## ।।दाता तू गणपती।।


दाता तू गणपती गजानन
भजती तुज अती गुणीजन
दाता तु गणपती गजानन !
मुक्तामाणिक किरिट शिरावर
गौर तनूवर कस्तुरिकेशर
निर्गुणनिरवधि सकलकलनिधि
हे प्रभुवरा
अमरनायका हे शुभंकरा
भाने तुजसी आलो शरण
दाता तू गणपती गजानन!
शुंडा उदरी वळली अभिनव
कांति मनोहर रूप नवोनव



रुणुझुणु चरणी वाजति किंकिणी
हे प्रियकरा
ललितलाघवा हे नटवरा
यावे धरिले देवा चरण
दाता तू गणपती गजानन!

# ।।गणपति बाप्पा मोरया।।

गणपति बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लौकर या !
इवले इवले डोळे तुमचे मोठे मोठे कान
येवढे थोरले डोके कसे पेलते तरी मान ?
गोर गोरा पान रंग मऊ नितळ छान अंग
मोठया तुमच्या पोटामध्ये मोठी माया !
मोठया थोरल्या पोटावरी वाकडी वळे सोंड
सोंडेखाली लपुन बसे देवा,
तुमचे तोंड
दोनांवरी देन हात एकच कसा
तुमचा दात ?
अजब वाटे रूप असे बघावया !
उंदरावरी बसुन देवा येते तुमची
स्वारी



गोड गोड मोदकांची आवड तुम्हा भारी
शोभिवंत मखर त्यात
पूजेचाही थाटमाट
आरतीला टाळ झांजा वाजवाया !
घरी तुम्ही येता तेव्हा मौज होते मोठी
खिरापत, खाऊ मिळे शाळेलाही सुट्टी !
पुन्हा पुन्हा तुम्ही यावे
खेळ, सुट्टी आम्हा द्यावे
मागतो मी हेच तुम्हा गणराया !
गणपति बाप्पा मोरया
पुढल्या वर्षी लौकर या !

## ।।गणराज रंगि नाचतो।।

गणराज रंगि नाचतो
नाचतो
पायी घागऱ्या, करिती
रुणझुणु नाद स्वर्गि पोचतो
गणराज रंगि नाचतो !
कटी पीतांबर कसून भर्जरी
बाल गजानन नर्तनासि करि
तुंदिल तनु तरी चपल
साजिरी लावण्ये साजतो
गणराज रंगि नाचतो !
नारद तुंबरू करिती गायन
करी शारदा वीणावादन ब्रह्मा
धरितो तालही रंगुन मृदंग
धिमि वाजतो
गणराज रंगि नाचतो !
देवसभा घनदाट बैसली
नृत्यगायने मने हर्षली,
गौरीसंगे स्वये सदाशिव,
शिशुकौतुक पाहतो
गणराज रंगि नाचतो !



## ।।गजानना श्री गणराया।।

गजानना श्री गणराया
आधी वंदू तुज मोरया !
मंगलमूर्ती श्री गणराया
आधी वंदू तुज मोरया !

सिंदुरचर्चित ढवळे अंग
चंदनऊटी खुलवी रंग
बघता मानस होते दंग,
जीव जडला चरणी तुझिया
आधी वंदू तुज मोरया !

गौरीतनया भालचंद्रा
देवा कृपेच्या तू समुद्रा
वरदविनायक करुणागारा
अवघी विघ्ने नेसी विलया
आधी वंदू तुज मोरया !

# ||गणेशवंदना||

जय जयाजी गणेशा
विघ्नविनाशका देवा
रत्नजडित किरीट
स्वर्णमेरूपरी कान्ती
कासे दिव्य पीतांबर
पायी नुपूरे साजिरी
रूप आले माझ्या मना
विघ्नविनाशका देवा
तुझ्या सेवेला गुंतल्या
सवे शारदा देखणी
सर्वश्रिया विराजित
देव गंधर्व किन्नर
ऐसा सोहळा सुंदर
विघ्नविनाशका देवा
तूच ओंकार प्रवण
चौदा विद्यांचा गोसावी
किती तूझे गुण वानू ?
तुझ पाहावे पाहावे
तुझ्या दर्शने केवळ
विघ्नविनाशका देवा.

# शिवगौरीच्या नंदना तुला सादर वंदना !

पाचूवर्ण दूर्वांकुर
वरी लेपिला सिन्दूर
कडदोरा फणिवर
किंकिणींचा झणत्कार
गणाधीशा गजानना
तुला सादर वंदना !
ऋद्धिसिद्धि दोघीजणी
रूपलावण्याची खाणी
बैसलासी सिंहासनी
दंग जाहले गायनी
माझ्या सुखवी नयना
तुला सादर वंदना !
शब्दब्रह्माची सांगता
आणि कलांचा विधाता
वाचा मौनावली आता
मोरेश्वरा एकदन्ता
सा-या पुरल्या कामना
तुला सादर वंदना !

# संकलन

**दरवर्षी आपण मोठ्या भक्तिभावाने, आदराने आपल्या घरात गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतो. हे करत असताना कार्य सिध्दिस जावे यासाठी गणेशाचा धावा मनोमन करत असतो. मात्र पत्येक वेळी हे कार्य निर्विघ्नपणे पार पदतेच असे नाही. मग अशा वेळी श्रीगणेशावरील अपार श्रध्देमुळे आपले मन नाना प्रकारच्या शंका - कुशंकानी भरून जाते. अशावेळी एक भक्त म्हणून माणूस व्यावहारिक दृष्टया आपण कोणती भूमिका घेतली पाहिजे याविषयी गणेश भक्त जोतिर्भास्कर जयंत साळगांवकर यांनी वेळोवेळी आपल्या निरूपणातून, लेखनातून, मुलाखतीतून मांडलेले मुद्दे येथे संकलित केले आहे.**

**त्याचबरोबर अनेक प्रकारची माहिती, मुहुर्त इतर देवासंदर्भातील माहिती गणेशमूर्तीबद्दल माहिती त्याचबरोबर काही श्लोकांचा अर्थ, गणपतीचे स्वरूप या संदर्भातील व इतरही काही माहिती इथे संकलित केलेली आहे.**

❖ काहींजणांचा हा प्रश्न असतो की घरात नेहमीची प्राणप्रतिष्ठा केलेली मूर्ति असते. तिची पूजा केली तर चालते का? तर इथे असे नमूद केले पाहिजे की गणेशचतुर्थीचे व्रत म्हणून आपण गणेशमूर्तिची प्राणप्रतिष्ठा करतो. त्यामुळे दरवर्षी नवीन मातीची मूर्ती आणून तिची प्रतिष्ठापना करणे उत्तम. तिच पूर्वापार चालत आलेली रूढी आहे आणि मूर्ती मातीची आणत असल्यामुळे ते सर्वांना परवडण्याजोगे आहे.

काही भक्त गणेशमूर्ती विसर्जन न करता वर्षभर ठेवतात ते योग्य नाही. कारण प्राणप्रतिष्ठित मातीच्या मूर्तिची खूप काळजी घ्यावी लागते.

❖ घरी नवीन गणपति आणणाऱ्यांना मूर्तीचे तोंड कोणत्या दिशेला

असायला हवे हा प्रश्न असतो. तर दक्षिण सोडून पूर्व, पश्चिम किंवा उत्तर कोणत्याही दिशेला मूर्तीचे मुख असले तरी चालते. काही जणांच्या मते पूर्व दिशा सर्वोत्तम आहे तर काही जणांच्या मते उत्तरेला हिमालय व कैलास असल्यामुळे उत्तर दिशा उत्तम.

❖ जसे आपल्याला गणेशोत्सव साजरा करण्याबाबत उत्साह असतो तसाच तो मुलांनाही असतो. आता तर पालकसुध्दा मुलांना स्वतःहून खेळण्यातली गणेशाची मूर्ति आणून देतात. याठिकाणी पालकांनी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी ती म्हणजे या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा करू नये. पूजा आणि आरती मात्र आवश्यक करावी.

❖ अनेकांकडे आपल्या मुळ गावी गणपती आणला जातो. नोकरी निमित्त विखुरलेली सर्व भांवंडे एकत्र येत असतात. आता मात्र कामाच्या व्यापामुळे गणेशोत्सवासाठी फक्त आर्थिक म्त करून स्वतःच्या मनाचे समाधान साधले जाते. मात्र हा आपण आपल्या सोयीसाठी शोधलेला सोयीस्कर मार्ग आहे. सख्खे भाऊ जरी वेगवेगळ्या गावी राहत असले तर प्रत्येकाच्या घरी वेगवेगळे गणपति आणणे इष्ट आहे.

❖ अनेकजण घरी गणपती आणत असल्यामुळे गणपतिच्या दिवसात पूजा सांगणाऱ्या ब्राम्हणांची धावपळ चालू असते. कधा–कधी पूजा पूर्ण होण्यास संध्याकाळाचे सहा सुध्दा वाजतात. तर एखाद्या वेळेस ते उपलब्ध ही होत नाही. अशा वेळेस वैदिक मंत्र न म्हणता पुराणोक्त मंत्र म्हणून स्वतः पूजा करावी. कॅसेट एकून पूजा केली तर चालते. मात्र स्वतःसुध्दा त्या बरोबर पूजा बोलणे आवश्यक आहे.

❖ प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या व्यक्तिला विसर्जनापूर्वी महत्त्वाच्या कामासाठी बाहेरगावी किंवा परदेशी जायची वेळ आली तर घरातील अन्य व्यक्तींनी अपूर्ण राहिलेला पूजाविधी पूर्ण केला तरी चालतो.

गणपतिच्या दिवसातच सुवेर अथवा सुतक असल्यास ज्यांना सुवेर वा सुतक नसेल अशा नातेवाईकाकडून अथवा ब्राम्हाणांकडून पूजा पूर्ण करून घ्यावी.


❖ घरातील एखाद्या व्यक्तिचे दुदैवाने निधन झाल्यास प्रथम ब्राम्हाणाद्वारा गणेशमूर्तिचे विसर्जन करावे. मृतदेह इतरत्र असल्यास मूर्तीचे विसर्जन झाल्यानंतरच घरी आणावा.

❖ घरात श्रीगणेशमूर्तीचे प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर समजा एखादा अवयव चुकून तुटल्यास काय करावे हा प्रश्न पडतो. तर अशा वेळेस तो अवयव लहान असल्यास जोडून घेतला तरी चालतो. मात्र मोठा अवयव तुटला असल्यास त्वरित विसर्जन करून नवीन मूर्तिची प्राणप्रतिष्ठा करावी. कधी कधी प्राणप्रतिष्ठा व्हायच्या आधीच एखादा अवयव भंग पावतो. अशा वेळेससुध्दा नवीन मूर्ति आणावी. घरी विसर्जन झाल्यानंतर नदीवर किंवा समुद्रावर विसर्जन करावयास नेताना काही कारणास्तव मूर्ति भंग पावल्यास काळजीचे कारण नसते. घरी विसर्जन केलेले असल्यामुळे काही करावयाची आवश्यकता नसते. हवं तर मनाच्या समाधानासाठी आकस्मिक विघ्नशांति करावी. हीच गोष्ट सार्वजनिक गणपतीच्या बाबतीत लागू होते. मंडपाला आग वगैरे लागण्याचा प्रसंग घडल्यास पहिल्या मूर्तिचे विसर्जन करून नवीन मूर्ति आणावी आणि अरिष्ट शांति अथवा उदक शांति करावी.



# ।। श्रीगणपती ।।

गणपती ही शैव परिवारातली एक प्रमुख देवता आहे. धड मानवाचे व शिर हत्तीचे असा हा एक वैशिष्टयपूर्ण देव आहे. प्रथम त्याची गणना शंकराच्या गणात झाली व पुढे तो शिवगणांचा अधिपतीच बनला. ऋग्वेदात असाच एक देव आहे. त्याचे नांव ब्रह्मणस्पती. तो कवींचा कवी आहे आणि ज्येष्ठराज आहे. पौराणिक कालात गणपतीने या ब्रह्मस्पतीचे गुण स्वीकारले. तो जणू ब्रह्मणस्पतीशी एकरूपच झाला. आजही दक्षिण भारतात गणपतीला बह्मणस्पतीच म्हणतात. पुराणांनी त्याचे सुखकर्ता दु:खहर्ता हे रुप पुढे आणले.



भारतीय जनतेची त्या रूपावर विशेष श्रध्दा बसली. आद्य शंकाराचार्यांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट केली. त्यांनी गणपतीला देव पंचायतनात स्थान दिले. शिव, विष्णू, देव, सूर्य आणि गणपती असे पंचायतन बनले. ''कलौ चंडी विनायकौ'' असे एक वचन प्रसिध्द आहे. कलियुगात चंडी अर्थात दुर्गा आणि गणपती या दोनच देवता भक्तांना पावतात असा त्याचा अर्थ आहे. महाराष्ट्रात हे वचन सर्वतोपरी मान्य झालेले आहे. साऱ्या दैवत समूहात गणपतीची उपासना महाराष्ट्रात विशेष लोकप्रिय आहे. ग्रहबाधा, रोगबाधा व दैवी, मानवी संकटे यांच्या निवारणासाठी महाराष्ट्रातील भाविक माणसे गणपतीलाच साकडे घालतात. त्याचीच व्रते व पूजा - विधाने करतात.

❖ श्री गणेशसंबंधीतच्या सर्व ग्रंथाचा संग्रह मुदगल पराण गणेशपुराण या दोन उपपुराणांत आणि गणेश भागवत नावाच्या संस्कृत ग्रंथात आहे.

❖ गणेशकथांवर गणेशप्रताप, गणेशलीलामृत, गणेशभागवत आणि गणेशपुराण हे जुने ओवीबध्द ग्रंथ आहेत.

❖ नारायण उपनिषदात गणपतिगायत्री आहे. या उपनिषदाचा रचनाकाळ आणि नैत्तिरीय आरण्याचा काळ एकच धरला तर, गणपती सुमारे २५०० वर्षाएवढा प्राचीन आहे.

❖ गणपतीबद्दल सर्वात प्राचीन उल्लेख ॐ गणांना त्व गणपति हवामहे। या ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळाच्या तेविसाव्या सुक्तातील पहिल्या ऋचेत आहे. परंतु यातील गणपती हा निर्देश ब्रह्मणस्पती या देवाबद्दल आहे. त्यामुळे विद्वानांम याविषयी मतभेद आहेत.



❖ गणपतीच्या सोंडेचे ॐकाराशी साम्य आहे.

❖ वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज आणि धूम्रवर्ण अशी आठ अवतारांची नावे आहेत.

❖ ॐ गँ गणपते नमः हा मंत्र आणि बीजाअर गँ.

❖ गणपतीचे लग्न झाले की नाही याबाबत मतभेद आहेत. महाराष्ट्रात गणपति विवाहित असे मानून बुद्धि आणि सिद्धि याही त्याच्या बायका आहेत असे मानतात. अष्टसिद्धि याही त्याच्या बायका आहेत असे मानतात. बंगाल आणि दक्षिण भारतात गणपती अविवाहित आहे असे मानतात.


❖ सरस्वती आणि गणपती यांचे नवरा-बायकोंचे नात आहे असा काहींचा गैरसमज आहे. असा उल्लेख मात्र कोठे ही नाही. शारदा म्हणजे वाणी त्या शारदादेवीशी सरस्वतीचा अभेद कल्पित आहे मात्र गणपती वाणीचा पति आहे तो वाङ्मय आहे. आपटे यांच्या शब्दकोषात सरस्वती हे ब्रह्मदेवाच्या बायकोचे नाव असा उल्लेख आहे.

❖ गणपती ही भारतातील मूळच्या म्हणजे द्रविड संस्कृतीतील देवता असून कालांतराने आर्यांनी तिला आपली केली असे काहीचे म्हणणे आहे हा मुद्दा विवाद्य आहे. वेदयुगाचे सुमारे आठ वर्षापूर्वी गणपतीची कल्पना मिळते. गणपती हा शब्द वेदात आहे. तामिळ भाषेत गणपतीला पिल्लेयार असे नाव आले.



❖ पंचायतन पूजा म्हणजे विष्णू, शिवशक्ती (देवी) गणेश आणि सूर्य या पाच देवतांची एकत्र पूजा त्या त्या विशिष्ट देवतेचे भक्त यांपैकी खास आराध्य देवतांची मूर्ती मध्ये ठेवून बाकीच्या भोवती ठेवून पूजा करतात.

❖ पार्वती प्रथम काळी होती शंकरानी तिच्या काळ्या रंगाची थट्टा केली तेव्हा श्यामला रागावली तिने घोर तप केले आणि ती गोरी झाली म्हणून तिला गौरी म्हणतात. गौरी शब्दाचा अर्थ जेष्ठ गौरी अथवा महालक्ष्मी असा आहे. गौरीचा उत्सव ही भाद्रपदार शुक्लपक्षात गणेशचतुर्थीच्या नंतर येतो म्हणून गौरी पार्वती असे वाटणे सहज आहे.



# जेष्ठा गौरी (गौरी -गणपती)

**भा**द्रपद शुक्ल पक्षांतील अनुराधा नक्षत्रावर गौरींचे आवाहन, जेष्ठा नक्षत्रावर सूजन आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन असा हा गौरीपूजनाचा किंवा ''महालक्ष्मी'' चा उत्सव महाराष्ट्रात व दक्षिण भारतात तीन दिवस चालतो. गौरी व महालक्ष्मी अशी दोन शक्तिंची ही एकत्र उपासना असावी. गणेशचतुर्थीच्या गणपती बरोबरच घौरीची, म्हणजे गणपतीच्या मातेची पूजा करण्याची काही ठिकाणी चाल आहे. परंतु गौरीचा स्वतंत्रपणे उत्सव करणारे गणपती बसल्यानंतर दोन किंवा तीन दिवसांनी गौरी बसवितात. बहुत करून भाद्रपद शुक्ल अष्टमीस उत्सव होत असतो.

**या उत्सवासंबंधीची कथा :** दैव-दैत्यांचे युद्ध नित्य चाललेले असे. या युद्धात कोलासुर नावाच्या दैत्याने लोकांना विशेषतः स्त्रियांना अतिशय त्रास दिला. देवस्त्रियांना आपल्या सौभाग्याला धोका वाटू लागला. तेव्हा त्यांनी एकत्र जमुन महालक्ष्मीची प्रार्थना केली. देवीने या कोलासुर दैत्याचा संहार करुन लोकांना भयमुक्त केले. देवीच्या या उपकाराचे स्मरण म्हणून हा उत्सव दरवर्षी साजरा केला जातो.

**पूजाविधिः** गौरीपूजनाच्या पद्धती प्रदेशपरत्वे वेगवेगळे आहेत. दक्षिण भारतात पुरूष आणि स्त्रिया मिळून हे ३ दिवस मोठ्या आनंदात घालवतात. कोणी धातूच्या तर कोणी मातीच्या गौरी आणून किंवा गौरीचे चित्र आणून त्याची पूजा करतात. काही ठिकाणी विशेषतः मुंबईच्या बाजूस तेरडा किंवा आघाडा यांच्या झाडांना गंधफूल घालून ती उपटतात. आणि त्याची जुडी बांधून ती घरी आणतात. कोल्हापुराकडे या गौरी वाजत गाजत सामुदायाने आणतात. नंतर एका कुमारिकेसह त्या जुडीची पूजा करून घराच्या प्रत्येक खोलीत तिचे स्वागत करीत ती देवघरात

नेतात. या जुडीवर गौरीचा मुखवटा बांधून व तिला वस्त्रलंकार वगैरे लावून सजवितात आणि तिची पूजा करतात.

खकोकणस्थ ब्राह्मणात खडयाच्या गौरी आणण्याची पध्दत आहे. या गौरी आणण्यासाठी स्त्रिया पाणवठ्यावर जातात. थेथील पाच खडे घेऊन ते स्वच्छ धुवून त्यांना हळदीवुंकू वाहून ते तबकात घालून



वाजत-गाजत घरी आणतात. घरात प्रवेश करण्यापूर्वी ज्या स्त्रीच्या हातात या गौरी असतील तिच्या पायावर गरम पाणी व दूध घालून तिला व गौरीला हळद्वुंकू लावून ओवाळून मग घरात प्रवेश होतो. प्रवेशद्वारापासून गौरीच्या ठिकाणी म्हझे बहुधा गणपति बसविला असेल त्या जागेपर्यंत गोपद्ये (गाईची पावले रांगोळीने काढतात) त्या पावलावरून या गौरी घरात येऊन स्थानापन्न होतात.

पहिल्या दिवशी (म्हणजे गणपती बसल्यापासून तिसऱ्या दिवशी) गौरी घरी येतात. ध्दुसऱ्या दिवशी त्यांना खीरपुरीचा नैवेद्य असतो. सुवासिनी जेवायला असते. या सुवासिनीचा जेवनाचा मान माहेरवाशिंणीचा असतो. त्या दिवशी काही स्त्रिया जागरण करतात. तिसऱ्या दिवशी गौरी परत जातात. त्या बसविलेल्या स्थानापासून घराच्या द्वारापर्यंत पुन्हा परत जाणारी (दाराकडे तोंड केलेली) गाईची पावले रांगोळीने काढतात. बहुधा गणपती व गौरी एकाच वेळी नेऊन त्यांचे जलाशयात विसर्जन केले जाते. जलाशयापाशीही पुन्हा गौरीची पूजा व आरती गणपतीप्रमाणेच होते व मग तिचे गणपतीच्या पूर्वी विसर्जन केले जाते.

## देशस्थ ब्राह्मणातील गौरीचे पूजन :

कुंभाराकडून पाच नवी मडकी आणतात व एकात धान्य घालतात व त्याचबरोवर पिवळ्या रंगाचा दोरा, पाच खोबऱ्याच्या वाट्या व पाच खारका एकेकात घालून ती मडकी एकावर एक रचतात. सर्वात वर गौरीचा मुखवटा बसवितात. अशीच दुसरी एक गौर करून तिच्याच शेजारी बसवितात. तीन दिवस गौरींची गाणी, पूजा, आरती, नाच - खेळ असा प्रकार चालतो. तिसऱ्या दिवशी मडकी उतरून स्त्रिया खारिक व खोबऱ्याचे तुकडे पिवळ्या रंगाच्या दोऱ्यात सात किंवा सोळा गाठीतून बांधतात व गळ्यात घालतात. असेच दोरे मुलांच्या गळ्यात बांधण्यासाठी तयार केले जातात. पुढे शुभ दिवस बघुन ते दोरे दही व दूध यात भिजवून शेतात नेऊन पुरतात. काही ठिकाणी हे दोरे काढून अश्विन शुध्द आष्टमीस त्याची पूजा करतात व त्यांना सोळा दिवे, सोळा तीळ, सोळा तांदूळदाणे अर्पण करतात. या दोऱ्यांना जो नैवेद्य दाखवितात त्याला ''महालक्ष्मी'' असे मानतात. पूजेनंतर या दोऱ्यांचे नदीत किंवा पाण्यात विसर्जन करतात.

कोकणपट्टीतील लोकांत या दिवसात मेळे निघतात. कोकणी बायका चांगली कपडे नेसून फुगडी व नाच गात जाऊन समुद्रात गौरीचे विसर्जन करतात.



# सत्यनारायणाच्या पूजेचा काल व नियम

आपले मन प्रसन्न असताना कोणत्याही शुध्द दिवशी श्रीसत्यनारायण पूजा करावी. पोर्णिमा, संक्रांत हे काल विशेष आहेत. पूजेची वेळ मुख्यतः सूर्यास्त समयी म्हणजे गोरज मुहूर्तावर विशेष चांगली. तथापि प्रातःकाली पूजा केली तरी चालेल. पूजा सायंकाळी असेल तर उपवास करावा. पूजेच्या पूर्वी तैलाभ्यंग स्नान करावे व कपाळी कुंकुमतिलक लावावा.



नंतर कुलपरंपरेनुसार वेदोक्त किंवा पुराणोक्त पूजा करावी. आपले मुख पूर्वेकडे करुन पूजेला बसावे. दक्षिणेकडे मुख करुन बसू नये. एखादे वेळी उत्तराभिमुख बसले तरी चालेल.

आपल्यासमोर चौरंग मांडावा. त्यावर व सभोवती रांगोळी काढावी. रांगोळीत गुलाल भरावा. चौरंगावर मध्यभागी पावशेर तांदूळ किंवा गहू घालावे. चौरंगावरच आपल्या उजव्या बाजूस मूठभर तांदूळ घालून त्यावर सुपारी ठेवावी. याला गणपती म्हणतात. मधल्या तांदळावर कलश (तांब्या) ठेवावा; व त्यामध्ये पाणी, गंध, फुले, नाणे, सुपारी, दुर्वा, अक्षता घालाव्या व आंब्याचा डहाळा किंवा गहू घालावे व ताम्हनाच्या मध्यभागी एक वरुणाची सुपारी ठेवावी (मांडावी) व आठ दिशांना आठ सुपाऱ्या लोकपालांच्या मांडाव्यात व त्याचप्रमाणे नवग्रहांच्या सुपाऱ्या मांडाव्या. गणपतीची पूजा करणे याचा अर्थ चौरंगावरील मांडलेला जो गणपती त्याची पूजा करावी. आवाहन, आसन या शब्दांचा अर्थ पुढे महापूजेच्या वेळी लिहिल्याप्रमाणे समजावा.

पूजेसाठी शाळिग्राम किंवा बाळकृष्ण घ्यावा. पूजा चालू असताना शाळिग्राम असेल तर अक्षता वाहू नयेत तुलसीपत्र वाहावे. बाळकृष्णाला अक्षता वाहव्या.

## अथ पूजाप्रारंभः

प्रथम आपल्या इष्ट देवतांना हळद-कुंकू वाहून देवापुढे विडा ठेवावा (विड्याची पाने दोन, त्यावर एक नाणे व एक सुपारी) व नमस्कार करावा. गुरुजींना म्हणजे उपाध्यायांना नमस्कार करून आपल्या आई-वडिलांना आणि इतर वडील मंडळींना नमस्कार करुन आसनावर बसावे व सुरुवात करावी.

## पूजेचे साहित्य

हळद, कुंकू, गुलाल, रांगोळी, उदबत्ती, विड्याची (नागवेली) पाने ३०, सुपाऱ्या ३०, नारळ २, खारका ५, बदाम ५, खोबऱ्याची वाटी १, गूळ व साखर, दूर्वा, फुले, तुळशी एक हजार (मोजून ठेवणे) व इतर लोकांसाठी निराळ्या जास्त, आंब्याचा डहाळा १, केळीचे अगर कर्दळीचे खांब ४, एक चौरंग, पाट ५, तांबे २, ताम्हनें ३, एक सकलाद (शाल), पंचामृत (दूध, दही,तूप, मध, साखर), गंध, अक्षता, तांदूळ अर्धा शेर, अत्तर, गरम पाणी, बुक्का, हार २, सुटे २५-२५ पैसे दोन रुपयाचे, धूप, संध्येची पळी, पंचपात्री, शंख, घंटा, देवाची मूर्ती, दक्षिणा सव्वा रुपया, व पोथील दक्षिणा यशाशक्ति, वस्त्र (पंचा किंवा कापड), निरांजन (फुलवातीसह), समई, पूजेसाठी तबक, यज्ञोपवीत (जानवी जोड), अरगजा वगैरे.



## प्रसादाचे साहित्य

प्रसाद - लोण्याचे शुध्द तूप, गव्हाचा रवा, साखर, दूध, प्रत्येकी सव्वा १। किलो/लिटर प्रमाणांत घ्यावी. म्हणजे सव्वा पाव किलो/ सव्वा केळे कुसकरुन अगर चकत्या करुन घालावे, गव्हाचा रवा न मिळेल तर तांदूळाचा चालेल, साखर न मिळेल तर गूळ घ्यावा. प्रसाद लहान लहान मुदा पाडून शक्यतो लहान द्रोणात द्यावा. याशिवाय अन्नाचा महानैवेद्य करावा.

# ।। श्री सरस्वती-नमन ।।



**या कुन्देन्दुतुषारधवला या शुभ्रवस्त्रावृता।**
**या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना।।**
**या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता।**
**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा।।**

# नवग्रहांची माहिति

## सुर्य

सुर्य हा ग्रह सर्व ग्रहांचा राजा मानला जातो. सुर्य ग्रहाभोवती बाकी सर्व ग्रह फिरतात. सुर्य हा ग्रह सिंह राशीचा स्वामि आहे. सुर्य हा ग्रह मेश राशीमध्ये उच्च आहे, तर तुला राशीमध्ये तो निचेचा आहे.

- मेष, सिंह, धनु या राशींमध्ये तो बलवान आहे.
- शत्रु राशी : वृषभ, कन्या, मकर
- राशीद्रुष्टी : सातवीदृष्टीने पहातो.
- शत्रु ग्रह : शनी, शुक्र
- मित्र ग्रह : चन्द्र, मंगळ, गुरु सम - बुध.
- सुर्य ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- आदित्य स्तोत्र, किंवा सुर्य कवच यांचे ७००पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - आकृष्णेनरजसा
- पुराणोक्त मंत्र - जपाकुसुम संकाशं
- जप संख्या ७०००
- हवन संख्या ७००
- दान वस्तु :- सुवर्ण, ताम्र, माणिक, गहू, रक्तधेनु, गूळ, केशरीवस्त्र, लाल फुल.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, द्रुष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून

गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# चंद्र

चंद्र हा प्रुथ्वीचा उपग्रह आहे. चंद्र हा प्रुथ्वीच्या भोवती फिरत असतो. चंद्र सुर्य एकत्र आले असता अमावस्या होते. आपल्या मनाचा कारक चंद्र आहे. चंद्र हा ग्रह कर्क राशीचा स्वामी आहे. चंद्र हा वृषभेत उच्च व व्रुश्चिकेत नीच असतो.

- शत्रु राशी :
- राशीदृष्टी :
- शत्रु दृष्टी : राहू ग्रह
- मित्र ग्रह : रवि, बुध. सम - मंगळ, गुरु, शुक्र, शनी ग्रह.
- चंद्र ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- चंद्र कवच यांचे ११००पाठ. वेदोक्त मंत्र जप - ईमंदेवा असपत्न
- पुराणोक्त मंत्र - दधिसंख तुषाराभं
- जप संख्या ११०००
- हवन संख्या ११००
- दान वस्तु :- सुवर्ण, चांदी, मोती, तांदुळ, पांढरा पशू, तूप, श्वेतवस्त्र, सफेदफुल.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची

अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्‌द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

## मंगळ

मंगल हा एक पापग्रह समजला जातो. मेष व वृश्चिक यांचा स्वामि मंगल आहे. मंगळ हा मकर राशीत उच्च असतो तर कर्क राशीत नीचेचा असतो.

- शत्रु राशी :
- राशीदुष्टी : ७ व्या दुष्टीने पहातो.
- शत्रु ग्रह :
- मित्र ग्रह : चन्द्र, रवि, गुरु सम - शुक्र, शनी.
- मंगळ ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- अंगारक स्तोत्र, किंवा मंगळ स्तोत्र यांचे १००० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - अग्निर्मुर्धादिवः
- पुराणोक्त मंत्र - धरणीगर्भसंभूतं
- जप संख्या १००००

- हवन संख्या १०००
- दान वस्तु :- सुवर्ण, ताम्र, प्रवाळ, मसुरा, रक्तवृश, गूळ, रक्तवस्त्र, लाल फुल.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# बुध

बुध ग्रह हा बुद्धीचा कारक ग्रह म्हणून ओळखला जातो. हा ग्रह व्यवहारी बुद्धीचा व हिशोबी आहे. मिथुन व कन्या या राशींचा स्वामि बुध आहे. बुध हा कन्या राशीत उच्च आहे, तर मीन राशीत नीच आहे.

- शत्रु राशी :
- राशीदृुष्टी : ७ व्या दृष्टीने पहातो.
- शत्रु ग्रह : चन्द्र आहे.
- मित्र ग्रह : रवि, शुक्र, राहु. सम - मंगळ व शनी.

- बुध ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- बुधपन्चविंशतीनाम स्तोत्र किंवा बुध कवचम यांचे ४०० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - उदबुद्यस्वाग्ने
- पुराणोक्त मंत्र - प्रियंगुकलिकाश्यामं
- जप संख्या ४०००
- हवन संख्या ४००
- दान वस्तु :- सुवर्ण, कांस्य, पाचू, मूग, हत्ती, तूप, नीलवस्त्र, सर्व फुल.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्‌दशांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# गुरु

गुरु ग्रह हा विद्येचा कारक ग्रह म्हणून ओळखला जातो. हा ग्रह जगाचा शिक्षक आहे. धनु व मीन या राशींचा स्वामि गुरु आहे.

गुरु हा कर्क राशीत उच्च आहे, तर मकर राशीत नीच आहे.

- शत्रु राशी :
- राशीदृष्टी : ५, ७, ९ व्या दृष्टीने पहातो.
- शत्रु ग्रह : बुध, शुक्र हे आहेत.
- मित्र ग्रह : रवि, चन्द्र, मंगळ. सम - राहु व शनी.
- गुरु ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- बृहस्पतिस्तोत्र किंवा बृहस्पति कवचम यांचे १९०० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - बृहस्पतेअतियदर्जो
- पुराणोक्त मंत्र - देवानांच ऋषिणांच
- जप संख्या १९०००
- हवन संख्या १९००
- दान वस्तु :- सुवर्ण, कांस्य, पुष्कराज, चनादाळ, अश्व, साखर पितवस्त्र, पीतपुष्प.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

# शुक्र

शुक्र ग्रह हा भिन्न लिंगामधिल आकर्षण निर्माण करणारा ग्रह आहे. हा ग्रह प्रेम भावना दाखवितो. व्यक्तीचे प्रेमसुख, स्त्रीसंबंध या ग्रहावरुन पहातात. वृषभ हा ग्रह सर्व प्रकारच्या सौंदर्याचा कारक आहे. वृषभ व तुळ या राशींचा स्वामि शुक्र आहे. शुक्र हा मीन राशीत उच्च आहे, तर कन्या राशीत नीच आहे.

- शत्रु राशी :
- राशीदृष्टी :
- शत्रु ग्रह : रवि, चन्द्र आहे.
- मित्र ग्रह : बुध, शनि आणि राहु. सम - मंगळ व गुरु.
- शुक्र ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- शुक्र स्तोत्र किंवा शुक्र कवचम यांचे १६०० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - अन्नातपरिस्रुतोरसंब्रह्मणा
- पुराणोक्त मंत्र - हिमकुन्द मृणालाभं
- जप संख्या १६०००
- हवन संख्या १६००
- दान वस्तु :- सुवर्ण, चान्दि, हिरा, तांदुळ, श्वेत अश्व, तुप, चित्रवस्त्र, श्वेत पुष्प.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन

करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्‌द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# शनि

शनि ग्रह हा तपोनिष्ठ, नॅराशवादी, आतल्या गाठीचा आहे. हा ग्रह त्यागी, विरक्तीचा कारक आहे. मकर व कुंभ या राशींचा स्वामि शनि आहे. शनि हा तुला राशीत उच्च आहे, तर मेष राशीत नीच आहे.

- शत्रु राशी :
- राशीदृष्टी : ३, ७, १० व्या दृष्टीने पहातो.
- शत्रु ग्रह : रवि, चन्द्र, मंगळ आहे.
- मित्र ग्रह : शुक्र, बुध, राहु. सम - गुरु.
- शनि ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- शनिस्तोत्र किंवा शनि कवचम यांचे २३०० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - शन्नोदेविरभिष्टय आपोभवन्त
- पुराणोक्त मंत्र - निलांजन समाभासं
- जप संख्या २३०००
- हवन संख्या : २३००
- दान वस्तु :- सुवर्ण, लोखंड, निलमणि, ऊडिद, म्हॅस, तेल, कृष्णवस्त्र, कृष्णपुष्प.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते.

ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्‌दशांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# राहु

राहु केतु हे ग्रह सुर्यमालिकेतील ग्रह नाहीत. राहु व केतु हे पृथ्वीची कक्षा व चन्द्राची कक्षा ह्या एकमेकांना ज्या दोन ठिकाणी छेदतात ते दोन बिंदु होय. राहु हा विषारी प्राणांचा कारक आहे. सर्पदंश, नाग चावणे, विषारी प्राण्यांपासून ईजा हे राहुच्या कारकत्वात येतात. कुंडलित या ग्रहापासुन कालसर्प योग पहातात.

- राहु ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.
- राहुस्तोत्र किंवा राहु कवचम यांचे १८०० पाठ.
- वेदोक्त मंत्र जप - कयानश्चित्र
- पुराणोक्त मंत्र - अर्धकायं महावीर्यं
- जप संख्या १८०००
- हवन संख्या १८००
- दान वस्तु :- सुवर्ण, शिसे, गोमेद, तिळ, घोडा, तेल, निलवस्त्र,

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.

★——★

# केतु

केतु ग्रह हा संन्यास, त्याग, उपासना, व्रण, कुष्टविकार, वीरता या गोष्टींचा कारक मानतात. इतर ग्रहांच्या योगात राहूसारखा अभ्यासावा. या राहु-केतू ग्रहांवरुन कालसर्प योग पहातात.

केतु ग्रह बिघडला असेल तर खालील उपासना करावी.

केतुपन्चविंशतीनाम स्तोत्र किंवा केतु कवचम यांचे १७०० पाठ.

वेदोक्त मंत्र जप - केतुंक्रेण्वंनकेतवे

पुराणोक्त मंत्र - पलाशपुष्पसंकाशं

जप संख्या १७०००

हवन संख्या १७००

दान वस्तु :- सुवर्ण, पोलाद, लुसण्या, तीळ, बोकड, तेल, कृष्णवस्त्र, धुम्रपुष्प.

आपल्या कुंडलीमध्ये हा ग्रह अशुभ स्थानी असेल, किंवा या ग्रहाची अशुभ युती, दृष्टी असेल तर आपल्याला या ग्रहाची शांती करता येते. ज्या दिवशी या ग्रहाचा वार असेल, अग्नीचा वास असेल तो दिवस ठरवावा. ग्रहपीडा दूर होऊन हा ग्रह आपल्याला अनुकूल व्हावा, या हेतुचा संकल्प करावा.

प्रारंभी गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध करून गोत्र उच्चार करावा. ब्राह्मणांना वर्णी देऊन दिग्रक्षणम, पंचगव्य, भूमीपुजन करावे. प्रधानमंडल मांडून कलश स्थापन करावा. या ग्रहाच्या प्रतिमेचे पुजन करावे. नवग्रह मंडल, रुद्र कलश स्थापन करून हवन करावे. या ग्रहाचा शक्य असल्यास जप करावा. तद्‌द्शांश हवन करावे. उत्तरांग पूजन करून बलीदान, पूर्णाहुती करावी. ब्राह्मणांना दक्षिणा तसेच विशेष दान द्यावे. आशिर्वाद घेऊन शांतिची सांगता करावी.





# मूर्तीच्या मागच्या बाजुला डोके का टेकतात?

वेदांतशास्त्राप्रमाणे ईश्वर हा सर्वव्यापी आहे म्हणून तत्त्वतः त्याला कुठूनही नमस्कार केला तरी सारखेच समोरासमोर नमस्कार प्रत्यक्ष स्वरूपाला असतो. त्यामुळे पाठीमागे डोके टेकले नाही तरी चालते. गीतेतला श्लोक

**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते**
**नमोऽस्तुते ते सर्वत्र एव सर्व।**
**अनंतवीर्यामित विक्रमस्त्वं**
**सर्व समाप्नोषि ततोऽसि सर्वः ।।**



(गीता ११ - ४०)

**अर्थ** - देवा तुला पुढून नमस्कार, पाठीमागून नमस्कार, सर्वच बाजूंनी हे सर्वात्मका तुला नमस्कार असो! तुझे सामर्थ्य अनंत व तुझा पराक्रम अतुल असून सर्वांना तू व्यापून असल्याने तूच सर्व आहेस.

लोकमान्य टिळक गीतारहस्यात सांगातात, पुढून नमस्कार, मागून नमस्कार हे शब्द ईश्वराचे सर्वव्यापित्व दर्शवितात. उपनिषदात ब्रम्हैवैदं अमृत पुरस्नात ब्रम्ह पश्चात ब्रम्ह दक्षिणतशषोत्तरेण।

अधश्चोर्ध्व य प्रसृतं ब्रम्हेत्वेदं वरिष्ठम असे ब्रम्हाचे वर्णन केलेले आहे. त्याला अनुसरून भक्तिमार्गात ही कल्पना आहे.

# चतुर्थीच्या दिवशी चंद्र दर्शन ?

चतुर्थीच्या दिवशी चंद्र पहायचा नाही कारण चंद्र हा मनाचा कारक आहे. मन चंचल असते. चंद्रदर्शनाने मनाची चंचलता वाढते. मन जेव्हा उन्मन होते तेव्हाच तुर्यावस्था प्राप्त होते. संकष्टीचतुर्थीला दिवसभर साधना करून रात्री चंद्रदर्शन घेतात.

★————————★

# गणेशाचे वाहन उंदीर का ?

सिंदुरासुर दैत्याला मारण्यासाठी गजाननाने पार्वतीच्या पोटी जन्म घेतला आणि कालांतराने पाराशर ऋषींच्या आश्रमात विद्याभ्यास करू लागला.

एक दिवशी कौंच नामक गंधर्वाचा पाय चुकून वामदेव ऋषींना लागला त्यामुळे क्रोधीत होऊन वामदेव ऋषींनी गंधर्वाला शाप दिला की तू मूषक होऊन पडशील. हा मूषकरूपी गंर्धव पाराशर ऋषीच्या आश्रमाजवळ पडला आणि तेथेच राहू लागला. मूषकाच्या स्वभावधर्माप्रमाणे तो मिळेल ती वस्तू कुरतडू लागला. या गोष्टीचा ऋषींना त्रास होऊ लागला. पण बरेच प्रयत्न करूनही तो मूषक कोणाच्याच हाताला लागला नाही. अखेर गजाननाने आपला पाश त्याच्यावर टाकला. त्या पाशाने तो मूषक विव्हळ झाला. ''तुला हवा तो वर माग'' असे उद्धटपणाचे उत्तर मूषकाने दिले. ते एकून ''तू आजपासून माझे वाहन हो'' असे बोलून श्री गजानन त्याच्या पाठीवर बसला.



# श्रीगणेशास दुर्वा, शमीपत्र आणि मोदक का अर्पण करावेत?

अंकशास्त्राच्या (Numerology) दृष्टीने दू - ८ र्वा - ४.
या शब्दापासून अंकांना वामतो गतिः न्यायाने ४८ ही संख्या तयार होते. आणि जीव (जी -८, व - ४) या संख्या साम्यामुळे दुर्वा याचा अर्थ जीव असा घेता येतो. जीव हा सुख आणि दुःख भोगण्यासाठी जन्म घेतो. या सुख - दुःखाच्या द्वंद्वास दुर्वाच्या जोडीने श्रीगणेशास अर्पण करावे. ज्या प्रकारे जीव जन्मोजन्मीच्या पुण्य आणि पाप फलस्वरूप पुन्हा पुन्हा जन्म घेतो, त्याच प्रकारे दुर्वा ही वनस्पती देखील अनेक जडांनी उगवते. जीव आणि दूर्वा यांचे साम्य केवळ संख्याशास्थानेच व्यक्त होत नाही.



तर त्याच्या निर्मितीच्या क्रियेतही साम्य आहे. दोन दोन दूर्वांच्या जोडीस दूर्वायुग्म असे म्हणतात. एकवीस ही संख्या दुःख ध्वंस दर्शक आहे. एकवीस दूर्वा - युग्म अर्पण केल्याने सुखदुःखांचा नाश होऊन केवळ आनंदमय मोक्ष प्राप्त होतो.

शमीवृक्षास ''वह्नि'' वृक्ष असेही म्हणतात. संख्याशास्त्रानुसार व - ४ आणि ह्नि - ०. संख्याशास्त्रात ० म्हणजे अभाव. बेरीज अविकारक ''०'' ही संख्या आहे. त्यामुळे शमी या शब्दामुळे ४ हा अंक

मिळाला आता परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चार वाणी आहेत. वैखरी वाणी - ४ या अंकाने दर्शवली जाते. भू तत्वरूप गणेशाचे मूलाधार स्थान आहे. त्याचप्रमाणे शब्द देखील मूलाधार पासून निघून मूर्धा, कष्ठ, तालू आदीशी संबंधित होतात नंतर मुखातून येतो. त्यामुळे श्रीगणेशाची पूजा शमीपत्राने केल्यास जीव हा बह्मभावास प्राप्त करू शकतो.



मोदक म्हणजे लाडू तसेच मोदक म्हणजे आंनद देणारा. कारण मोद म्हणजे आनंद. मोदक (लाडू) दोन - तीन प्रकारे तयार केले जातात. पीठाच्या कोंदणात जो साखर अथवा गूळ मिश्रित खोबऱ्याचा किस ठेवतात त्यास ''पूर्णम'' असे म्हणतात. पूर्णम् या शब्दांपासून ५१ ही संख्या मिळते. ही संख्या तंत्रशास्त्रान्चये ''मातृका'' समजली जाते. नाशरहित परिपूर्ण सच्चिदानंद ब्रह्मशक्तिची ती द्योतक आहे. पूर्ण ब्रह्मतत्त्व हे मायाने आच्छादित असल्यामुळे ते दिसत नाहीत हे आपणांस मोदक शिकवतो. कारण मोदकांतील ''पूर्णम'' आनंदमय आहे. परंतु पीठ कवचाने आच्छादित आहे. ''पूर्णम्'' ची गोडी चाखण्यासाठी पिठाचे कवच प्रथम पचवा. तसेच ब्रह्मतत्त्वाचा आनंद घेण्यासाठी प्रथम माया पचवा. आणि ती माया पचविण्यासाठी (माया भ्रम नाहिसा करण्यासाठी) मोदक गणेशास अर्पण करावेत.

# गणपतीला हत्तीचेच तोंड का?

याबद्दल अनेक प्रवाद आहे. त्यापैकी एक मत असे आहे की हत्ती हे समाज नेतृत्वाचे प्रतीक आहे. या गणपतीच्या मुखात अनेक वैशिष्टये सामावलेली आहेत. गणपतीचे बारीक डोळे हे सूक्ष्म अवलोकन आणि दूरदृष्टी यांचे प्रतिक आहे तर मोठे पोट हे सहनशिलता आणि दुसऱ्यांचे अपराध पोटात घालण्याएवढे मोठे मन यांना दर्शविते. गणपतीचे मोठे कान दुसऱ्यांचे म्हणणे नीट ऐकून घ्यायची तयारी तसेच लांबडे



नाक आपसात घडणाऱ्या गोष्टींचा वास ताबडतोब लागण्याचा गुण याचे प्रतिक आहे.

दुसरा प्रवाद असा आहे की गणपती हा मूलतः अरण्यवासियांचा देव आहे. त्यामुळे त्यांनी रानातील सर्वात वैभवशाली प्राणी हत्ती याचे प्रतिक आपल्या देवाला केले असावे.

गणपतीचा प्रमुख मंत्र ''ॐ गँ गणपतये नमः'' हा असून बीजाक्षर आहे - गँ

# तीर्थ घेतांना श्रध्देने म्हणावयाचे मंत्र

अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्। विष्णुपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्।।१।। शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे। औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः।।



## तीर्थ तीन वेळा कशासाठी प्यायले जाते?

याच्या स्पष्टीकरणासाठी एक श्लोक आहे.

प्रथम कायशुध्यर्थ द्वितीयं धर्मसाधनम् ।
तृतीयं मोक्षलाभार्थम् एवं तीर्थ त्रिधा बिबेत् ।।

★—— ★

## २१ मोदक?

**श्रीगणेशाने एका घासात २१ मोदक खाल्ले होते म्हणून नैवेद्य दाखविताना २१ मोदकांचा दाखवितात.**




## गणपतीला किती अपत्ये आहेत...

याविषयी आपल्यापैकी अनेकांना माहिती नाही. गणपतीला सिध्दीपासून लक्ष्य तर बुध्दीपासून लाभ नावाचा मुलगा झाल्याचा उल्लेख आढळतो. पण खरतर ही नावे काही संकेत दर्शवितात. उदा.

सिध्दिचा अर्थ काम पूर्ण होणे. काम पूर्ण होण्यासाठी ''लक्ष्य'' असणे अतिशय आवश्यक आहे. तसेच काम पूर्ण होण्यासाठी बुध्दी आवश्यक असते. या बुध्दीमुळे सारासार विचार, ज्ञान यापासून होणारा लाभ मिळतो.

**गणेशोपासना ही सूर्योपासनेतून आली आहे** असे द्रविड लोकांचे मत आहे. त्यांनी गणपतीला सूर्य मानला. तसेच उंदीर हे दक्षिणेत रात्रीचे प्रतिक मानले जाते. सूर्य रात्रीवर आक्रमण करतो. त्यामुळे गणपतीचे उंदरावर आरूढ होणे याचे ही रूपक लक्षात येते. याशिवाय नेपाळातही सूर्यगणपती आहे. नेपाळ आणि तिबेटमध्ये बहुतेक सर्व बौध्द मंदिरांच्या प्रवेशद्वारात गणपतीची मूर्ती उभी करण्याची प्रथा आहे. त्याचे स्पष्टीकरण करताना एक कथा सांगितली जाते. वैशालीत द्वारपार असलेल्या एका माणसाने मृत्यूपूर्वी गावकऱ्यांना सांगितले, "मी मेल्यावर माझी मूर्ती बनवून माझ्या गळ्यात घंटाची माळ घाला. दु:खीकष्टी लोकांनी ती घंटा वाजवल्यास मी त्यांची संकटे दूर करीन त्याप्रमाणे गावकऱ्यांनी मूर्तीची स्थापना केली. त्या मूर्तीप्रमाणेच घंटाची माळ तेथील गणपतीच्या गळ्यात दिसते.



# उजव्या सोंडेचा व डाव्या सोंडेचा गणपती

उजव्या सोंडचा गणपती सूनाडीचा असून शक्तिशाली तेजस्वी आणि जागृत असतो. याचे सोवळे ओवळे कडक असते. मनात कोणत्याही प्रकारची आशा ठेवून या गणपतीची पूजा केल्यास कधीच त्याचे फळ मिळत नाही. निरपेक्ष मनाने याचे पूजन केल्यास जीवनात शांती आणि समृध्दी प्राप्त होते.

डाव्या सोंडेचा गणपती म्हणजेच वाममुखी गणेश हा चंद्रनाडीचा असतो. वाम याचा अर्थ डावी बाजु किंवा उत्तर दिशा. चंद्र हा शीतल तर उत्तर दिशा आध्यात्मिक असे मानले जाते म्हणूनच आनंद देणार, भौतिक सुखाची प्राप्ती करून देणारा हा वाममुखी गणपती नित्य आराधला जातो.



# अठ्ठाविस युगे ?

विठ्ठलाच्या आरतीच्या सुरूवातीला ''युगे अठ्ठाविस विटेवर उभा'' असे म्हटले आहे. हि अठ्ठाविस युगे कोणती हे जाणून घ्यायचे असेल तर धर्मकृत्यातील संकल्पात आरंभी आपण कालगणना म्हणतो ती जाणून घ्यायला हवी.



अद्य ब्रम्हणो द्वितीये परार्धे विष्णुपदे श्री श्वेतवाराहकल्पे वैवस्ततमन्वंतरे अष्टाविंशतितमे युगे कलियुगे कलि प्रथमचरणे...

या कालगणनेप्रमाणे आपण ब्रह्मदेवाच्या दुसऱ्या अर्ध्या दिवसाच्या ''श्वेतवाराह'', कल्पात, वैवस्वत मन्वंतराच्या अठ्ठाविसाव्या युगात म्हणजे कलियुगातील प्रथम चरणात आहोत. आपटे संस्कृत कोशाप्रमाणे कोष्टक पुढे आहे.

ब्रह्मदेवाचा एक दिवस - एक कल्प

एक कल्प - १४ मन्वंतरे

मन्वंतरे पुढीलप्रमाणे

१) स्वायंभूव २) स्वारोचित ३) औत्तमी ४) तापस ५) रैवत ६) चाक्षुष ७) वैवस्वत ८) सावर्णि ९) दक्षसावर्णि १०) ब्रह्मसावर्णि ११) धर्मसावर्णि १२) रुद्रसावर्णि १३) देवसावर्णि १४) इंद्रसावर्णि

एक मन्वंतर - ४ युगे, कृत - १७२८००० वर्ष

त्रैता -१२९६०००

द्वापार - ८६४०००

कली - ४३२०००

एकून - ४३२००००

सध्या सहा मन्वंतरे पूर्ण होऊन सातवे वैवस्तव सुरू असून कलियुग सुरू आहे. प्रत्येक मन्वंतराची ४ युगे या हिशोबाने सध्या २८ युगे सुरू आहे. अठ्ठाविसाव्या युगात म्हणजे कलियुगात विठ्ठल विटेवर उभा आहे.

★——————————★

# एका श्लोकात अठरा पुराणे कोणती?

''म'' द्वय ''भ'' द्वयं चैव ''ब्र'' त्रयं ''व'' चतुष्टयम् ।

ना - लिं - पा - ग्नि पुराणनि कू स्कं गारुडमेव च ।।

अर्थ - दोन म म्हणजे मत्स्य व मार्कंडेय; दोन भ म्हणजे भागवत व भविष्योतर, तीन ब्र म्हणजे ब्रम्ह, बम्हांड व ब्रम्हवैवर्त, चार व म्हणजे वामन, विष्णु, वराह व वायु, ना म्हणजे नारय, लिं म्हणजे लिंग, पाम्नि म्हणजे पदम, अग्नि कू, म्हणजे कूर्म व स्कं म्हणजे स्कंद शेवटी गारुड

एकून २ - २ - ३ - ४ उरलेली ७ - एकून १८ पुराणे



# साडेतीन मुहूर्त ?

आर्यानी सणात मुहूर्ताला महत्त्व दिलेले आहे. साडेतीन परममंगल दिवस खालीलप्रमाणे मानले जातात.

**चैत्रशुद्ध प्रतिपदा** - गुढीपाडवा, वर्षप्रतिपदा

**बलिप्रतिपदा** - कार्तिक शुद्ध प्रतिपदा - दिवाळी पाडवा

**अश्विन शुद्ध दशमी** - विजयादशमी

**अक्षय्यतृतीया** - वैशाख शुद्धतृतीया

कोणी दिवाळी पाडव्याला अर्धा मुहूर्त आणि अक्षयतृतीयेला संपूर्ण मुहूर्त मानतात.

**चैत्र प्रतिपदा** - शालीवाहन शकाची सुरूवात या दिवशी झाली. श्रीरामांनी रावनाचा वश करून विजय मिळवून अयोध्येत प्रवेश केला नव्या कार्ताचा संकल्प गुढी उभारून, एकमेकांना शुभेच्छा व्यक्त करून व सर्वांना हे नवे वर्ष सुखाचे जावो अशी प्रार्थना करण्याचा दिवस.

**बलिप्रतिपद -** विक्रम संवत्सराचा पहिला दिवस. व्यापारी लोकांचे नवे वर्ष या दिवशी वही पूजनाने सुरू होते. बलिराजाचे स्मरण करून सण साजरा करतात.

**विजयादशमी** – अश्विन शुद्ध दशमी नवरात्र संपल्यानंतर दसऱ्याचा मंगल दिवस उजडतो. या दिवशी शस्त्रे, पोथ्या, हत्यारे यांचे पूजन करून आपटा व शमी वृक्षांची पूजा करून सोने लुटून आणायचे व ते देवाला अर्पण करून सर्वांना वाटायचे. या दिवशी पती व मुले घरी आल्यावर त्यांना सुवासिनी ओवाळतात. विजय मिळविण्यासाठी निघण्याचाच हा मुहूर्त.

**अक्षय्यतृतीया -** वैशाख शुद्ध तृतीया चैत्र गौरीच्या सणाची समाप्ती होते या दिवशी दान देऊन पितरांचे तर्पण करतात. सुवासिनी हळदकुंकू समारंभ करतात. उन्हाळ्याची सुरूवात म्हणून पाणपोई घालून जलपानाची प्रथा या दिवसापासून सुरू करतात.

## षोडशोपचारी पूजा म्हणजे काय?

**या पूजेमध्ये पुढील सोळा उपचार देवास देतात.**

१. आसनः देवाचे आसन आपल्यापेक्षा उंच असते. २. पाद्य : म्हणजे पाय धुण्याकरिता दिलेले पाणी. ते शंखाने किंवा स्वतंत्र देतात. ३. अर्ध्य : पाय धुतल्यानंतर सत्कार करण्यासाठी अर्ध्य दिले जाते. अर्घ्य म्हणजे गंध,अक्षता घालून जलसमर्पण करणे. ४. आचमन : म्हणजे पिण्याकरिता किंवा चूळ भरण्याकरिता पाणी. ५. स्नान : दूध, दही, तूप, मध आणि साखर ह्या पाचांनी क्रमाने देवतेला स्नान घालतात. त्याला पंचामृतस्नान म्हणतात. पंचामृत नसेल तर नुसत्या दुधाने काम भागते. ६. वस्त्र : देवाला वस्त्र अर्पण करतात. ७. गंध, हळद-कुंकू, अक्षता. ८. पुष्प : पत्र म्हणजे फुले व पत्री. ९. धूप म्हणजे धूप जाळणे अगर उदबत्ती लावणे. १०. दीप म्हणजे निरांजन ओवाळणे. ११. नैवेद्य आणि फल अर्पण करणे. १२. तांबूल म्हणजे विडा. १३. दक्षिणा : रोजच्या पूजेत दक्षिणेची आवश्यकता नाही. १४. प्रदक्षिणा. १५. नमस्कार. मंत्रपुष्प आणि आरती व १६. प्रार्थना. हे सोळा उपचार. पुरुषसूक्तांतील एक एक ऋचा म्हणून एक एक उपचार देवाला अर्पण करण्याची बहुतेक पध्दत आहे. पुरुषसूक्तांत सोळा ऋचा आहेत. शिवाय पुराणोक्त मंत्र म्हणण्याची पध्दत आहे.

### पंचोपचारी पूजा म्हणजे काय?

देवाची पंचोपचारी पूजा करण्याचीही पध्दत आहे. पंचोपचार म्हणजे १. गंध, २. पुष्प, ३. धुप, ४. दीप व ५. नैवेद्य. यांची माहिती षोडशोपचारी पूजेत दिली आहेच.

बहुतेक कुटुंबात पंचायतन असतेच. पंचायतन म्हणजे पाच देवाचे एके ठिकाणी केलेले घर. हे पाच देव म्हणजे शंकर, विष्णू, सूर्य, गणपती व देवी. जे मुख्य दैवत असेल ते मध्ये व बाकीचे देव त्याभोवती एका ताम्हणात मांडतात. पंचायतन मांडण्याची पध्दत ठरावीक आहे .

# तांब्याच्या भांड्यात पाणी ठेऊन का प्यावे? पूजेची भांडी तांब्याची का असतात?

तांबे हा धातू सुवाहक आहे. विद्युतवाहक आहे. तांब्याच्या घागरीत, तांब्याच्या हंड्यात पाणी ठेवले; तर ते विकृत होत नाही. तांब्याच्या भांड्यात जंतूंचा प्रादूर्भाव लवकर होत नाही. तांबे हा धातू पवित्र मानतात. तो दोषरहित असून गुणांनी युक्त आहे.



तांब्याच्या धातूचा शरीराला स्पर्श करुन ठेवल्यास शरीराचे संरक्षण होते. रक्तभिसरण व्यवस्थित होते. तांब्याच्या तांब्यात पाणी उकळून ठेवून रोग्यास दिल्यास आराम पडतो. तांब्याची मारुतीची प्रतिमा, अंगठी, तांब्याचे वाळे, हातातील कडे, तांब्याच्या तारेच गोठवलेली जपाची माळ, असे तांब्याचे दागिने वापरले असता त्वचारोग होत नाहीत. इतर अनेक रोगांपासून शरीराचे संरक्षण होते म्हणून तांब्याची भांडी आणि दागिने वापरतात.


धूम्रकेतू
शूर्पकर्ण

# संदर्भ सूची


| पुस्तकांची नावे | लेखक |
|---|---|
| १) गणाधीशो जो ईश | ज्योतिर्भास्कर जयंत साळगांवकर |
| २) श्री गणेशकोश | अमरेंद्र गाडगीळ |
| ३) गणपती प्रमुख अवतार व आराधना | अनंत वासुदेव मराठे |
| ४) सुखकर्ता दु:खहर्ता | सी. ग. देसाई |
| ५) श्री गणेश उपासना | रामसिंह पाटील |
| ६) हे लंबोदर | संपादन गो. रा. दळवी |
| ७) गणपतीची गाणी | शांता शेळके |


# आभार


**'श्री'** हे गणेशपूजा आणि आरतीसंग्रहाचे संकलित पुस्तक तयार करताना अनेक पुस्तकांचे वाचन झाले आहे. त्यातील संदर्भ ही योग्य त्या ठिकाणी घेतले आहेत. त्या पुस्तकांचा आणि लेखकांचा नामोल्लेख आभारासहित आवर्जून करीत आहोत.

त्याचबरोबर या अंकाचे स्वागत मूल्य कमी व्हावे यासाठी अनेकांनी आर्थिक आणि सक्रिय हातभार लावला आहे. त्या सर्वांनी आमचे आभार मानू नये असे आवर्जून सांगितले आहे. पंरतु त्यापैकी माझे सन्मानिय मित्र श्री. मिलिंदकुमार देशमुख व श्री. अजित मराठे यांनी जे सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांच्या आभाराचा उल्लेख करायलाच हवा.